डॉ. आनंद नाडकर्णी

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ललित
सं. क्र. 3246

गाडगुंगायवेडी

REFBK-0025745

संकीर्ण निबंध
३२८७
२५७४५
२२१७८८

18 FEB 1990 17 JAN 1990
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 AUG 1991
13 NOV 1988
14 DEC 1988
21 DEC 1988
25 DEC 1988
4 JAN 1988
1 JAN 1989
3 SEP 1989
24 DEC 1989
8 FEB 1989
22 FEB 1989
17 MAY 1989
28 MAY 1989
21 JUN 1989
28 JUN 1989
5 JUL 1989
20 AUG 1989
14 SEP 1991

(क्र. मा. पहा)
५०००-११-८६

गद्यपंचविंशी

गद्धे पंचविशी

डॉ. आनंद नाडकर्णी

REFBK-0025745

पब्लिकेशन

प्रथमावृत्ती :
१२ जून १९८८
मूल्य : ४० रुपये

मुखपृष्ठ :
प्रभाकर भाटलेकर
मांडणी :
अरुण घाटे

©
सौ. अपर्णा आनंद नाडकर्णी
अ – ६, प्रांजली
डहाकेवाडी, कोपरी रोड, नौपाडा
ठाणे– ४०० ६०२

मुद्रक :
रवींद्र केशव कोठावळे
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

प्रकाशक :
सौ. नम्रता मुळे
३, कादंबरी सहवास
नौपाडा, वसई रोड स्टेशन (प. रेल्वे)
जि. ठाणे ४०१ २०२

I want to do with you;
what spring does...
... to the cherry trees
– Pablo Neruda.

या ओळी जिच्यासाठी
राखून ठेवल्या होत्या
त्या माझ्या पत्नीला...

कानात सांगायची गोष्ट

तीनचार वर्षांपूर्वी अचानक मूड आला अन् पाचसहा छोटे लेख, एका बैठकीत लिहून काढले. पंचविशीमध्ये प्रवेश करून स्थिरावलो होतो...विचार असा केला की 'धोक्याचं सोळावं' किंवा 'साठी, बुद्धी नाठी' अशा वाक्प्रचारांबरोबर आपण नेहमी 'गद्धेपंचविशी' हाही शब्द वापरतो. पण या अवस्थेतून जाता-नाची स्थित्यंतरं, त्यातले अनुभव याची कधी कुणी फारशी नोंद ठेवत नाही. तसं केलं तर...

लिहिलेले पहिले लेख, काही जणांना वाचून दाखवले. त्यांना ते आवडले देखील. पण नंतर ते मलाच आवडेनासे झाले. त्यातला फक्त 'मुर्दाड मैफल' हाच लेख ठेवला, बाकीचे अडगळीत टाकले.

'किर्लोस्कर'मधून लेख प्रसिद्ध व्हायला लागल्यावर त्यांना वाचकांकडून विलक्षण प्रतिसाद मिळाला. इतका चांगला प्रतिसाद मीही अपेक्षिला नव्हता. या सदराच्या आखणीचं व मागे लागून लिहून घेण्याचं श्रेय संध्या टांकसाळे व प्रवीण वाळिंबे यांना जातं.

'गद्धेपंचविशी'च्या सूत्रात बसणारे आणखी दोन दीर्घ लेख या संग्रहात समाविष्ट केले आहेत. ते त्याआधी 'किस्त्रीम'च्या दिवाळी अंकामध्ये प्रसिद्ध झाले होते.

प्रसिद्ध झालेल्या साहित्याची 'फाईल' करणे हे काम माझे वडील करतात. केव्हा तरी याचं पुस्तक चांगलं करता येईल अशी कल्पना त्यांच्या डोक्यात होती. तीच त्यांची, माझ्या लिखाणाला दिलेली दाद आहे हे आता तिशीच्या उंबरठ्या-वर लक्षात येतं आहे.

प्रत्येक व्यक्ती स्वतःभोवतीच्या वातावरणाच्या व संस्कारांच्या चौकटी घेऊनच जन्माला येत असते. या चौकटीच्या थोडं बाहेर पडून कुवतीप्रमाणे अनुभव सारेच जण घेतात. पण त्या अनुभवांकडे पाठी वळून पाहणे होतंच असं नाही. हा झाला एक भाग! दुसरं असं की, अनेकांच्या आयुष्यात घडणारे प्रसंग, सर्वसाधारणपणे 'कॉमन' म्हटले, तरीही ते त्या त्या व्यक्तीसाठी 'एक्सक्ल्युझिव्ह' असतात. असे 'कॉम–एक्स' अनुभव वाचायला आपल्या सगळ्यांनाच आवडतात.

आणि ज्याला पोक्त भाषेत 'आत्मचरित्रात्मक' लिखाण म्हणतात तसं लिखाण करायची हौस मला बऱ्यापैकी आहे. बऱ्याच वेळा, वैयक्तिक संदर्भामध्ये हा फेरतपासणीचा प्रयत्न असतो. तर कधी, तो प्रसंग–ती आठवण पकडून ठेवण्याचा प्रयत्न. पण त्या अनुभवामागचं सूत्र शोधण्याचा हेतू, लिखाणामुळे साध्य होत असतो.

माझ्या स्वतःच्या 'गढ्येपंचविशी' ने मला उदारपणे भरभरून अनुभव दिले. लिहिता लिहिता ते हळूहळू सर्वांचे होत गेले. वाचकांची पत्रे येतात, त्यांमध्ये हे जाणवतं. एका वाचक बाईंनी अगत्याने त्यांच्या मुलीच्या लग्नाची पत्रिका पाठवली व 'लाल ड्रेसवाल्या मुली' सकट (माझी पत्नी, संदर्भ 'मुलगी : एक पाहणे' हा लेख) यावे असं पत्रही लिहिलं.

माझे अनुभव जेव्हा एका 'जीवन टप्प्या'चे अनुभव होतात, तो सारा प्रवास मला गमतीदार वाटला आहे. म्हणूनच, 'गढ्येपंचविशी'तून बाहेर पडताना एकच वाटतं आहे; जीवनाबद्दल मी कृतज्ञ आहे!

आनंद नाडकर्णी

अनुक्रम

मुर्दाड मैफल | ९
हमलोग | १२
इनर्शिया आणि किडा | १६
ऑपरेशन ब्लिटझक्रिग | २०
माझी मध्यस्थी | २४
नकार | २९
आमचेही जोडो भारत | ३३
मैत्रिणीचं नातं | ३६
मला भेटलेली डूीमगर्ल | ४०
रिलेटिव्हिटी माझी
आणि आईन्स्टाइनची | ४३
मुलगी : एक पाहणे | ४७
कवितेचा जन्म | ५१
निर्णय | ५५
स्मॉल इज ब्युटीफूल | ५९
सर लोकांच्या आठवणी | ६३
बाजार | ६७
पपा फ्रॉईड झिंदाबाद | ७२
जगताना | ७७
अर्घ्य उगवतीला | ८२
प्लस– नॉन प्लस | ८८
थ्री चिअर्स फॉर हिप्पोक्रॅटिस | १२८

मुर्दाड मैफल

नऊ-दहा वर्षांपूर्वीची गोष्ट ! हॉस्टेलवरच्या आमच्या ग्रुपने एक धाडसी प्लॅन आखला. त्या प्लॅनवर नुसती चर्चा करतानाच आम्ही सारे भयंकर एक्साईट झालो होतो. आम्ही सारे तेव्हा नुकतेच खरचटून न घेता दाढी करायला शिकलेलो... सारी आखणी त्यामुळेच भयंकर दबक्या स्वरात झाली. एकाने कुठून तरी, कुठल्याशा सबबीवर एक प्रोजेक्टर मिळवला. दुसरा एक जिवाच्या कराराने कुठूनतरी त्या 'खास' फिल्म्स घेऊन आला. एकंदर खर्चाचा अंदाज काढून 'तिकीट' किती लावायचं यावर चर्चाही झाली. लाँड्रीतून नुकत्याच आणलेल्या चादरीचा पडदा भिंतीला लागला, आणि त्या पंधरा बाय बाराच्या खोलीत चक्क पन्नास डोकी जमली. प्रत्येक जण दुसऱ्याचा चेहरा चुकवत खोलीत आला होता. चेहऱ्यावरची उत्सुकता मात्र लपवता लपत नव्हती.

....तासाभराच्या 'शो' नंतर प्रत्येकाच्या अवस्था वेगवेगळ्या होत्या. पण काहीतरी नवीन केल्याची जाणीव, काहीतरी 'वाईट' केल्याची डाचणी आणि तरीही 'एकदा बघितल्या बुवा ब्ल्यू-फिल्म्स' हे समाधान प्रत्येकाच्या नजरेत होतं.

काळ जात राहिला आणि पुन्हा एकदा मित्राच्या घरी, एका ग्रुपबरोबर या ब्ल्यू फिल्म्स पाहिल्या. त्या कशा 'एक्सक्ल्यूझिव्ह' आहेत यावर आधी बरीच चर्चा झाली होती. का कोण जाणे, पण तरीही उत्सुकता वाटत नव्हती. नेहमीप्रमाणे एकेका फिल्मची दोनदोनदा पारायणं झाली. या फिल्म्स पहिल्यांदा पाहतानाच माझ्या जिवावर आलं होतं. सारंच किळसवाणं वाटायला लागलं. मला ती सारी मैफलच मुर्दाड वाटायला लागली.

माझी ही प्रतिक्रिया इतरांपेक्षा वेगळी आहे की काय, मला कळेना. दोन जवळच्या मित्रांना बोलून दाखवलं. एक म्हणाला, 'कदाचित असं

असेल, आपला कंट्रोल जास्त चांगला झाला असेल ! '

'नाही, तसं नाही....आपल्याला लैंगिक संवेदनांची प्रतवारी करायची सवय लागली असणार. त्यामुळे आपण चाळवले जात नाही आता.'

त्यानंतर थोडा वेळ आम्ही सारेच गप्प बसलो. गेलेल्या आठवणींचा पाठपुरावा करत....नववी-दहावीत असताना शाळेच्या वाटेवर कुत्र्यांच्या जोडीभोवती जमणाऱ्या घोळक्यात आपण मिसळलो होतो....मुद्दाम लॉंग-पँट घालून 'ए' पिक्चर पाहायचा यशस्वी प्रयत्न केला होता.... मित्रांमध्ये चावट जोक्स चवीने ऐकले-ऐकवले होते.... 'फ्रू बाई' पासून चालू होणारी गीतमालिका झिंग आल्यासारखी ऐकवली होती पिकनिकवर.... कँटीनमध्ये बसल्या बसल्या एखाद्या सुंदर चेहऱ्याकडे टक लावून बघितलं होतं, नको तितका वेळ. अगदी त्या चेहऱ्यावर कसनुसा भाव जमेपर्यंत.... हॉस्टेलच्या खोलीत कुणीतरी चोरून प्लेबॉय-पेण्टहाऊसचे अंक आणले तेव्हा त्यांच्यावर आपलीही उडी पडायची. वातावरणातल्या कोणत्याही चाळवणाऱ्या संवेदनेला आपण मानसिक पातळीवर किती लगेच बळी पडायचो ! मग हळूहळू त्या संवेदनांमधून मिळणारं थ्रील कसं कमी कमी होत गेलं....संवेदनांचे आघात होते तसेच होते. फक्त, आपण बदलत चाललो होतो....आपली दृष्टी बदलत होती....म्हणजे नेमकं काय होत होतं ?

लैंगिक नातं म्हणजे फक्त क्रिया नाही हे कधी उमजायला लागलं आपल्याला ? ते उमजलं म्हणून तर त्या फिल्ममधल्या यांत्रिक वासनेचा उबग आला नाही का ?.... 'समर ऑफ फॉर्टी टू' मधलं शेवटचं दृश्य मग आपल्याला नव्याने कळलं. या विषयावरची आपली उथळ चर्चा मग आपोआपच कमी होत गेली.

'माणूस' म्हणून डेव्हलप होणं म्हणतात ते असं असतं का ?.... लैंगिकतेमधली सर्जनशीलता आपल्याला कळायला कशी लागली–जाहिरातींचा रंगीतसंगीत मारा असतानाही ? मूलभूत जाणिवांना सुंदर करणं म्हणजे एक सृजनाच्या वाटेवरचाच प्रवास नाही का ?.... क्रिया या शब्दासाठी एक 'प्र' जोडला तर आपली लैंगिक मूल्यबैठकच बदलावी लागते. गद्धेपंचविशीत आता एका नव्या नात्याच्या शोधात असताना मनाला विचारलं, काय हवं ?....दोन उत्तरं आली. एक तर नात्याचं

एकमेवाद्वितीयत्व आणि दुसरं सुसंवाद....भावनिक, मानसिक सुसंवादातून आलेला शरीराचा सुसंवाद. आपला प्रत्येक अनुभव, प्रिय व्यक्तीच्या अस्तित्वाने द्विगुणित होत असेल तर त्यातून आनंदनिर्मिती होईलच आणि ती महत्त्वाची. कारण आनंदनिर्मितीतून नात्याचे बंध अधिक बळकट होत जाणार आहेत. हे नातं जर एकमेव असेल तर त्याचा शोधही सरळसोट असा असेल ? शेली एका कवितेत म्हणतो, " I never was attached to that great sect whose doctrine is that each one should select out of the crowd a mistress or a friend.' तर थोडक्यात काय, असं नातं जुळेपर्यंत थांबायला हवं.

निसर्गाने संपूर्ण मानवाची प्रतिमा करायची ठरवली तेव्हा ती कधीही 'एकाकी प्रतिमा' नव्हती. कारण त्यामुळे मानवी अस्तित्वाचा जीवशास्त्रीय हेतू साध्य होणार नव्हता. आणि मानवाने जेव्हा या जीवशास्त्रीय हेतूला प्रेमभावनेचा ओलावा दिला तेव्हा संस्कृतीने एक मोठा टप्पा पार केला असावा. शरीरसंबंधाचा हेतू फक्त 'लैंगिक ऊर्जेचा' (सेक्शुअल इन्स्टिंक्ट) उपशम करणं, एवढाच आहे का ? अंहं. जोपर्यन्त या नात्यामधले मानसिक बंधही पुरेसे बळकट होत नाहीत तोपर्यन्त ही 'इन्स्टिंक्ट' पूर्णार्थाने शमत नाही, शमणार नाही. आणि जीवनातला हा अनुभव पूर्णार्थाने उपभोगला नाही तर 'पुरुष' आणि 'स्त्री' म्हणून आपल्यात एक विशिष्ट कमतरता राहतेच. आपल्या घडणीतली ही कमतरता शेवटी, जगाशी-समाजाशी येणाऱ्या आपल्या संबंधांमधून दृग्गोचर होत असते, बाह्य जगाशी वागताना आपण दाखवत असलेली उदारमनस्कता आणि जवळीक, आपण व्यक्तिगत पातळीवर या नात्यातूनच मिळवतो किंवा गमावतो, हे जाणवलं.

....आणि थांबण्याचा काळ सुसह्य झाला. त्याला अपेक्षेची आशादायक किनार मिळाली. मग, येऊन आदळणाऱ्या, उत्तेजित करणाऱ्या संवेदनांची धार आपोआपच बोथट होत गेली. एकीकडे भविष्यातल्या रंगणाऱ्या मैफलीची कल्पना कळत-आकळत होती. दुसरीकडे त्या तशा मैफलीचं मुर्दाडपण जाणवत जायला लागलं....आणि मी माझ्या आता चांगल्याच राठ झालेल्या दाढीवरून समाधानाने हात फिरवला.

कालच लेस्ली आला होता. लेस्ली सव्वीस वर्षांचा आहे. गोरापान, दाढीवाला. व्यवस्थित असतो तेव्हा इंग्रजी चित्रपटातल्या हीरोसारखा दिसतो. 'व्यवस्थित' म्हणजे ड्रग्जवर नसतो तेव्हा. ऑगस्ट महिन्यात त्याची आई त्याला आमच्या के. ई. एम. रुग्णालयात घेऊन आली होती. तत्पूर्वी तेरा वर्षे ड्रग्ज सेवन करून लेस्ली शेवटी 'ब्राऊन शुगर' वर स्थिरावला होता. अमली पदार्थांच्या विरुद्धाचा उपचार-उपक्रम त्यावेळी आमच्याकडे नुकताच सुरू झाला होता. त्यातल्या काही पहिल्या पेशंट्सपैकी लेस्ली एक. या रुग्णांसाठी जे अनेक पद्धतीचे उपचार आम्ही करतो त्यात दर आठवड्याला एक गट-उपचार-पद्धती असते. या गट-उपचार-पद्धतीमधून रुग्णकार्यकर्त्यांचा एक गट तयार करायचा हा माझा हेतू. म्हणजे पुढे नव्या रुग्णांना मदत करण्यासाठी याच रुग्णांचा वापर करायचा. त्यातून त्यांचाही फायदाच होईल....तर त्यावेळी लेस्ली उपचारात सहभागी झाला. तो उत्साहाने प्रश्न विचारायचा, चर्चेत सहभागी व्हायचा. नव्या रुग्णांशी बोलायचा. दीड महिना झाला आणि तो भेटायला येईनासा झाला आणि आला तो एकदम काल.

'माझ्यावेळचे बाकीचे सारे कसे आहेत डॉक्टर?' तो म्हणाला. बाकीचे म्हणजे असेच विशी-पंचविशीतले तरुण. 'जे ग्रुपला नियमित येतात ते व्यवस्थित आहेत.' मी म्हटलं. 'मी येत राहिलो नाही ही चूक झाली डॉक्टर. एक चान्स द्या.' नजर खाली वळवत तो म्हणाला. आमच्याशी संपर्क तुटल्यावर त्याने पुन्हा ब्राऊन शुगर सुरू केली होती.

पुन्हा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होण्यासाठी मी त्याला तारीख दिली. औषधोपचार चालू केले, आणि तो गेल्यावर विचार करायला लागलो, अरे, कदाचित यावेळी लेस्ली दोन-तीन महिन्यांनी परत 'स्लीप' झाला तर? खरं तर माझ्या प्रत्येक ब्राऊन शुगरवाल्या रुग्णाबद्दल माझ्या मनात

ही अशी भीती असते. मंगळवारच्या ग्रुपला ते सकाळी जमायला लागले, एकेकाला बघितलं की अक्षरशः बरं वाटतं.... अजून एक आठवडा निभावला.

या 'गर्द'च्या आजाराची ताकदच अशी विलक्षण, की अगदी दोन-तीन 'कोरड्या' (ड्राय म्हणजे ड्रगशिवायच्या) वर्षानंतरही हा आजार उलटू शकतो. मग महिन्यांची काय कथा !....असे चुकलेले तरुण आले तर मी त्यांना तोडू शकत नाही. 'या, आलात परत.... एवढे प्रयत्न केलेत तरी सोडत नाही....' असं त्यांचं स्वागत मी करू शकत नाही. मला वाटतं, या वेळी तरी याचा प्रयत्न नक्कीच टिकाऊ असेल. मी पुन्हा त्यांच्या खांद्यावर थोपटतो.

माझा एक सहकारी मित्र मला म्हणाला, 'तू ऐकून कसं घेतोस यांचं ? पक्के डँबीस असतात ते ! ×× वर लाथ मारून सरळ केलं पाहिजे.' त्याच्या या तीव्र प्रतिक्रियेवर मी हसलो. बोललो मात्र नाही. त्याचं चिडणं एका अर्थानं बरोबर होतं. वॉर्डामध्ये, बाह्यरुग्ण विभागात या रुग्णांशी वागताना बरीच तारेवरची कसरत करावी लागते. आपल्या पेशन्सची ती परीक्षाच असते. ही मंडळी चिडखोर असतात, हट्टी असतात, जिद्दी, अविचारी वाटणारी, आक्रस्ताळेपणी वागणारी असतात. पण माझ्या असं लक्षात आलंय, की एवढं सारं असूनही ती 'वाईट' नसतात. पण किंबहुना इतरांना खुपणारं त्यांचं वाईटपण मला दिसतसुद्धा नाही.... 'तेरा टॉलरन्स बहोत ज्यादा है।' आणखी एक सहकारी डॉक्टर म्हणतो. मला माझ्या 'टॉलरन्स'चं कौतुक वाटत नाही. कारण तो आणण्यासाठी मात्र या रुग्णांच्या बाबतीत तरी 'सहनशीलता' तेव्हा असते, जेव्हा प्रथम राग, मनःस्वास्थ्य अशा भावना असतात. पण मला कधी या रुग्णांचा राग येत नाही.

मला राग येत नाही याचा अर्थ मी 'शांतिब्रह्म' झालो किंवा 'जितेंद्र' पदवीच्या एक पायरी जवळ पोहोचलो, असा मात्र नव्हे. हे असं का होतं याबद्दल मी जरा आत्मनिरीक्षण करायचं ठरवलं, आणि माझ्या अनेक रुग्णांच्या प्रतिमा फटाफट डोळ्यांपुढे यायला लागल्या. या सगळ्या ड्रग-ॲडिक्ट तरुणांची वयं थोड्याफार फरकाने माझ्याच

वयोगटातली होती.... पंचविशीतली सळसळणारी मुलं. हाडांचे सांगाडे होऊन समोर येणं यातली वेदना साऱ्या तरुणाईलाच व्यापणारी होती. साऱ्या तरुणाईपुढचं हे आव्हान होतं. अर्थातच माझ्यासमोरचंही. मग मला त्यांच्यातच मित्र दिसायला लागले. ते मला आदराने वागवतात, 'अहो डॉक्टर' म्हणतात. पण ते भेटायला येतात .गट–उपचार पद्धतीत कुठे औपचारिकता नसते. तीन रुग्ण घेऊन सुरू केलेल्या या गटात आता पन्नास–साठ रुग्ण दर आठवड्याला येतात. इथे फक्त गंभीरपणा नसतो. भरपूर गंमत असते. वादविवाद असतात, हास्यविनोद असतात. खुल्या दिलाने प्रश्नोत्तरे होतात. आपापले प्रश्न समोर मांडले जातात, उत्तरं शोधली जातात. आमचा ग्रुप अतिशय जिवंत असतो याचं कारण-सुद्धा कदाचित ग्रुपचा उपचारकर्ता नेता व ग्रुपला येणारे एकाच वयोगटातले असतात हे असू शकेल....आमच्यांतल्या 'रॅपो'चा धागा हा असा गद्धेपंचविशीचा असतो. हा धागा एकदा जुळला की त्या भकास आणि खोल गेलेल्या डोळ्यांमध्येही हळूहळू विश्वास उमळू लागतो. जमीन उकरणारी नजर सरळ होऊन स्थिरावू लागते. क्वचित् येणारे आणि तोल सावरायचा प्रयत्न करणारे शब्द; हळूहळू सलग आणि नंतर ओघवते बनतात. त्यांच्या चालीतही फरक पडतो.

'वर्षाच्या शेवटी यातले कितीजण बरे राहणार आहेत?' असा अत्यंत कुत्सित प्रश्न मलाही अनेक वेळा विचारला जातो. मी त्याचं उत्तर देत नाही. कारण विचारणारी व्यक्ती नेहमीच विचारानं 'प्रस्थापित' झालेली असते. जया-पराजयाच्या संभाव्य समीकरणांवर एवढी शक्ती घालवली तर लढण्यावरचं लक्ष कमी नाही का होणार? माझ्या रुग्णांमध्ये आणि माझ्यात आणखी एक समान धागा असतो. आम्हा दोघांनाही 'न लढणं' मान्य नसतं. आमच्याकडे आशावाद असतो. आमच्याकडे चुकांमधून शिकायची भावना असते.

एकदा ग्रुपच्या शेवटी एकंदर तासभराच्या चर्चेचं मी समालोचन केलं आणि म्हणालो, 'अगले हप्ते इसी समय, इसी दिन मिलेंगे.... हमलोग!'

ग्रुप संपल्यावर एकजण थांबला. मला म्हणाला, 'डॉक्टर, तुम्ही आज

शेवटी, काय म्हणालात ठाऊक आहे....हमलोग !' त्याने हात मिळविले. त्याच्या नजरेत विलक्षण काहीतरी मिळाल्याचा भाव होता. तो वळला आणि जाऊ लागला.... 'तुम ॲडिक्ट लोग' आणि 'हम जवान लोग' यात किती फरक होता !.... पाहण्याची दृष्टीच बदलत होती.

इनार्शीया आणि किडा

त्या दिवशी संध्याकाळी परळ स्टेशनवरून भरधाव जाणाऱ्या फास्ट लोकलच्या ड्रायव्हरने एक विचित्र दृश्य पाहिलं असणार. लांबवरून रोरावत येणारी लोकल जेव्हा प्लॅटफॉर्मच्या एका टोकाला प्रवेश करती झाली तेव्हा प्लॅटफॉर्मच्या दुसऱ्या टोकाला चार डोकी उभी होती. त्यातला एकजण प्लॅटफॉर्मवर उभा राहून रुळांवर वाकला होता. त्याच्या हातात एक टेपरेकॉर्डर होता. दुसऱ्याने प्लॅटफॉर्मवर उभे राहून पहिल्याच्या कमरेभोवती हातांचा संरक्षक विळखा घातला होता. लोकल जवळ यायला लागली तसा लोकलने कर्कश भोंगा दिला. अगदी शेवटच्या क्षणाला प्लॅटफॉर्मवरच्या दुसऱ्याने पहिल्याला मागे खेचलं. टेपरेकॉर्डर चालूच होता. ड्रायव्हर खिडकीतून डोकं काढून आश्चर्याने पाहत होता, तेव्हा ते चौघे एकमेकांच्या हातावर टाळ्या मारत होते... ट्रेनचा कर्कश भोंगा आणि फास्ट जातानाचा आवाज व्यवस्थित टेप झाले होते. हा सारा किडा निघायचं कारण, एकांकिकेमध्ये आम्हाला अशा तऱ्हेचा आवाज, एका प्रसंगामध्ये हवा होता. आणि ध्वनिसंयोजकाकडचे 'स्टॉक' मधले आवाज आम्हाला पसंत पडतच नव्हते. म्हणून मग हे अशा तऱ्हेचं 'लाईव्ह रेकॉर्डिंग.'

पुस्तके-परीक्षा-वॉर्ड आणि वैद्यकीय शिक्षणाचा एकूण धबडगा यात आम्हाला नाटकाच्या किड्याचा दंश हा असा वर्मी लागला आणि तो अजूनही उतरलेला नाही. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सारीच महाविद्यालयं नाटकं करायची– करतात. माझा नेहमीचा आक्षेप असा, की सादर होणाऱ्या नाटकातून, नाटकाच्या किड्याचा दंश फारसा कधी लक्षात येत नाही. कारण 'किडा' हा बॅकस्टेजवर काम करणाऱ्या माणसासारखा असतो. आमच्या एका एकांकिकेमध्ये आम्ही 'अँटी–एअरक्राफ्ट गन' करायची असं ठरवलं. नाटकाचा सेट डोक्यात आला.

तो तसा 'भारीपैकी' होता. त्यात अशी तोफ हवीच होती. कसं करावं ?.... शिवाय कमीत कमी पैशांमध्ये करणं हे आलंच.

कल्पना आली आणि आम्ही शोधपाहणीवर निघालो. आमच्या केईएम हॉस्पिटलचं 'भंगार–डिपार्टमेंट' हा मोठा गुप्त खजिना आहे. तिथे काय हवं ते मिळतं. तिथे फेकून दिलेले एअर कंडीशनर पाहिले. त्यांची पत्र्याची आवरणं काढली. अँटीएअरक्राफ्टगनची बैठक आणि सांगाडा तयार झाला. हॉस्पिटलला लागणारी मेणकापडं ज्यात गुंडाळतात तसे दोन मोठे पुठ्ठ्याचे लांबलचक नळे सापडले. तोफा मिळाल्या. त्यावर एनिमा देण्यासाठी वापरतात ती जुनी भांडी मिळाली; ती लावली. भंगार-मधली रिकामी पोती आणि त्यात भरलेला 'कार्पेंटर विभागा'चा भुस्सा, अशा आमच्या सँडबॅग्ज तयार झाल्या. आणि त्यावर जिमखान्यातलं कुजत पडलेलं जुनं टेनीसकोर्टावरचं नेट टाकलं. हिरव्या रंगाच्या छोट्या डब्याला जेवढा खर्च आला त्यात अक्षरशः डौलदार तोफ तयार झाली. असाच एकदा आम्ही स्टेशनवर पंधरा फुटांचा इलेक्ट्रिकचा खांबही तयार केला होता. बारा डोकी आणि एक संपूर्ण रात्र घालवून.

'राज्य नाट्य स्पर्धेमध्ये' आमच्या हॉस्पिटलतर्फे नाटक करायचा किडाही असाच आला. तर या नाटकाचं संगीत तयार करून ते रेकॉर्ड करायचं होतं. आता स्टुडियो किंवा वाद्यवृंद हा खर्च आम्हाला कुठून परवडणार ? हॉस्पिटलमधल्या एका मोठ्या वातानुकूलित हॉलचाच आम्ही स्टूडिओ बनवला. ध्वनिमुद्रण करणाऱ्याला त्याची मशीन्स घेऊन आणलं. हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेजमधले सगळे हौशी वादक एकत्र केले. त्यातले काही खरोखरच चांगले वाजवणारे होते. वाद्ये गोळा केली. त्या संध्याकाळी लॅबोरेटरीच्या यंत्रामध्ये, चक्क पाच व्हायोलिनीस्ट, एक गिटारवाला, हार्मोनियम–मेन्डोलीन–तालवाद्ये–बासरी वाजवणारे सारे, अशा सगळ्यांना संगीत दिग्दर्शकांच्या हातात दिलं. संध्याकाळी सहा ते पहाटे तीन या वेळात आम्ही सारं संगीत रेकॉर्डसुद्धा केलं. एक कळलं की तुमचा किडा जर सिन्सिअर असेल ना तर लोक नक्की मदतीला येतात. त्यांना पण जाणवतं. कुष्ठरोगावरची एक एकांकिका आम्ही स्पर्धे-मध्ये केली, ती खूप गाजली. या एकांकिकेमध्ये रंगमंचावर असायची तीन

पात्रे, पण बॅकस्टेजला सतरा. या एकांकिकेत रंगमंचावर बांबूचं कुंपण उभारलेलं असायचं. त्यावर ताज्या वेली दर वेळी आम्ही टाकायचो. कुष्ठ-रोग्यांच्या मेकअपला नाटकाआधी तीन तास लागायचे. अशोक पांगम हे व्यावसायिक रंगभूमीवरचे मेकअपमन. पण ते तीनतीन तास अगोदर, फक्त आमच्या तीन पात्रांसाठी हॉस्टेलच्या रूमवर यायचे.

नाटकाच्या निमित्ताने हे आणि असे अनेक किडे आम्ही केले. तेव्हा ते करत असताना, त्यातून मिळणाऱ्या सुरेख आनंदाशिवाय आम्हाला फार काही मिळालं नाही. तशी अपेक्षाही नव्हती. नाटकांना बक्षिसं मिळायची, नाटकं गाजायची. हे सारं होणंही फार महत्त्वाचं नव्हतं. खरा महत्त्वाचा मुद्दा आता ध्यानी यायला लागला आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यामध्ये 'इनर्शिया' घुसण्याचं एक वय असतं. 'आता काय राहिलंय. गेले आमचे दिवस....' हे या इनर्शियाचं घोषवाक्य असतं.

'इनर्शिया' एकदा आला की कोणती तरी सुस्थिर चाकोरी कवटाळणं सोपं जातं. वैद्यकीय शिक्षणासारख्या इतर कोणत्याही उच्चशिक्षणाच्या, सर्व तयारीमध्येच आपली सुस्थिर चाकोरी शोधण्याची धडपड नकळत सुरू होत असते. ती पूर्णार्थाने चुकीची आहे का हा वादाचा मुद्दा होऊ शकेल, पण ही धडपड करणं हे आपलं एकमेव ध्येय, निदान गद्धेपंचविशीत तरी नसावं. पण कधीकधी हे असं होतं. त्यातून आपण म्हटलं तर फार काही गमावत असतो. या 'इनर्शिया'च्या बरोबर विरुद्ध 'किडे' असतात. 'किडे' तऱ्हेतऱ्हेचे असतात. कुणाला नाटकाचा, कुणाला संगीताचा, कुणाला लेखनाचा, कुणाला वाचनाचा. ते आपल्याला निर्मितीक्षम बनवतात. बरं, त्यात प्रत्येक वेळी लौकिकार्थाने आपला फायदा असतोच असं नाही. बऱ्याच वेळा 'किडे' लहान मुलांच्या गमतीदार, निरागस खेळासारखे असतात. म्हणूनच त्यांच्यासाठी उनाडक्या हा पर्यायी शब्द होऊ शकत नाही. उनाडक्यांना ध्येय नसतं. उनाडक्यांना अध्याहृत गांभीर्य नसतं. आणि दिशा तर नसतेच नसते. ऐन पंचविशीत सुद्धा अनेक वेळा आपण 'इनर्शिया'च्या पाऊलखुणा ओळखायला विसरून जातो. अशा लोकांना किडे करणाऱ्याबद्दल एक सुप्त आदर आणि एक सुप्त असूयासुद्धा असते. पण बहुतेक वेळा ते काठावर उभं राहून

जितका मदतीचा हात देता येईल तितका देतात. यात दाद देण्याचा भास असतो आणि एक किडा जवळून पाहायला मिळाल्याचं समाधानही त्यांना होत असतं. मात्र किडा करताना त्यात झोकून जाण्याची वृत्ती असावीच लागते. त्याचबरोबर आवश्यक असते, किडा पूर्ण झाल्यावर त्यात न अडकता बाहेर पडायची वृत्ती. नाहीतर गोंधळ उडतो. एकंदर कॉलेजशब्दकोशाशी संबंध नसलेल्यांस किडा हा शब्द विचित्र किंवा कदाचित ओंगळही वाटण्याचा संभव आहे. काही तज्ज्ञ याला उपक्रमशीलता म्हणतील, तर काही जण 'अवांतर हालचाली' म्हणतील. कदाचित काही किड्यांना 'सामाजिक जाणिवे'तही बांधता येईल. पण हे काही संपूर्ण अर्थ नव्हेत. तर अर्थाचे भाग आहेत. 'किडा' हा एक स्वतंत्र, संपूर्ण शब्द आहे. आणि या शब्दाचं सौंदर्य शब्दार्थात नसून एकंदर संकल्पनेमध्ये आहे हे लक्षात घेतलं जात नाही. म्हणूनच तारुण्याच्या व्यवच्छेदक लक्षणांमध्ये 'किडे करणे' या शब्दाचा कधीच बापर होत नाही.

ऑपरेशन ब्लिट्झक्रिग

'हरण्याची खात्री असताना, लढाई लढायला जिगर लागते...' आमच्या हॉस्टेल मेसच्या मोठ्या हॉलमध्ये बसल्याबसल्या मी हे वाक्य मनाशी घोळवत होतो आणि झोप न मिळाल्याने, पेंगुळणाऱ्या डोळ्यांना, पुनः पुन्हा 'अटेन्शन' मध्ये आणत होतो. गेले सात दिवस हे असं चाललं होतं. सात दिवसांपूर्वी मी फार मजेत होतो. निवासी डॉक्टर म्हणून काम करताना दुर्लभ अशी सुट्टी संपाच्या रूपाने मिळणार म्हणून. मला संपामध्ये अडकायचं नव्हतं. नेता म्हणून तर मुळीच नाही. संपाचा पहिला दिवस मी चक्क पुस्तकांच्या दुकानांमध्ये, चांगली पुस्तकं धुंडाळण्यात घालवला होता. निव्वळ दोन दिवसांमध्ये संपाचं भवितव्य तसं नक्की झालं होतं. कॅपिटेशन वैद्यकीय महाविद्यालयांच्या विरुद्ध संपाचं हत्यार उचलताना आम्हा निवासी डॉक्टरांच्या संघटनेने काही वैचारिक तयारी केली नव्हती, त्यापाठची नैतिक भूमिका पक्की नव्हती. प्रसिद्धी माध्यमांना योग्य तऱ्हेने सांभाळलं नव्हतं. सर्वसामान्य जनतेमध्ये तर संपाविरुद्धची तीव्र प्रतिक्रिया होती. आणि कहर म्हणजे आमचे 'नेते' आम्हाला इथे सोडून दिल्लीत ठाण मांडून बसले होते.

आमच्या केईएम् रुग्णालयाचं हॉस्टेल तर ओस पडायच्या मार्गावर होतं....काहीही होवो, पण हा संप अभावाने मरता कामा नये असं वाटायला लागलं. हरायचं आहे तर निदान 'देणगी तत्त्वाचा' महत्त्वाचा प्रश्न साऱ्यांसमोर ठेवू आणि मगच हरू असा विचार केला. लोकांपर्यंत पोचायचं कसं?....'स्ट्रीट प्ले' करूया. 'तीस हजारांचा तमाशा' नावाचं लोकनाट्य लिहायला बसलो. माझा रूमपार्टनर डॉ. महेश गोसावी, दिग्दर्शक. मी एकेक पान लिहून त्याच्याकडे देत होतो. तो वाचत जात होता. एका रात्रीत गाण्यासकट स्क्रिप्ट तयार झालं. 'स्ट्रीट प्ले'च्या

तालमी चालू झाल्या आणि मेसला चैतन्य आलं. एकीकडं समांतर बाह्य रुग्ण विभागाची तयारी. दुसरीकडे येऊन पडणाऱ्या औषधांच्या सॅंपल्सची वर्गवारी करणं. एकीकडे रंगीत पोस्टर्सचा कारखाना. दुसरीकडे वर्तमानपत्रे आपल्या बाजूने वळवण्यासाठीच्या हालचाली. वाहनांची यादी झाली. प्रत्येक वाहनाला 'ड्युटी लिस्ट' मिळत असे. हिशोबाची व्यवस्था झाली. मदत गोळा करण्यासाठी पावती पुस्तकं घेऊन पथकं सुटली. 'स्ट्रीट प्ले' च्या गाड्या मुंबईत फिरू लागल्या. डॉ. जब्बार पटेलांनी समांतर ओपीडीचं उद्घाटन केलं. आम्ही आयोजित केलेल्या नागरिक सभेमध्ये मोरारजी देसाई, विजय तेंडुलकर वगैरे मंडळी बोलायला आली. हे सगळं ऑर्गनाईज करण्यामध्ये एक झिंग होती. एव्हाना वृत्तपत्रंदेखील आमच्या बातम्या ठळकपणे द्यायला लागली होती.

पाठिंबा देणारी पत्रके मिळवण्यासाठी वेगवेगळ्या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांबरोबर बैठकी सुरू होत्या. आमच्या ऑफिसमधून रोज 'प्रेस रिलीजेस' निघत होते. 'हेड लाईन' च्या आत सर्व वृत्तपत्रांपर्यंत पोहोचत होते. संपाचासुद्धा एक टेम्पो असतो.

आमचा 'इनर ग्रुप' जवळजवळ तीस जणांचा होता. शिवाय जवळजवळ शे–दीडशे स्वयंसेवक. ओस पडलेल्या मेसला तर उत्सवी वातावरण होतं. त्यातच एका बाजूला कायदेतज्ज्ञांबरोबर बैठकी, तर दुसरीकडे संप मिटवण्यासाठी अनेक मध्यस्थांबरोबर गुप्त बैठकी. अशा सगळ्या धमालीत आम्ही एक योजना आखली, 'ऑपरेशन ब्लिट्झक्रिग.' मुंबईतले एक प्रसिद्ध डॉक्टर, देणगी तत्त्वावर चालणाऱ्या एका महाविद्यालयाच्या कार्यकारी मंडळावर होते. त्यांना, त्यांच्या कन्सल्टिंग रूममध्ये घेराव घालायचा असं ठरलं. गुप्ततेमध्ये योजना ठरली आणि पंचवीस स्वयंसेवकांची निवड झाली.

त्या दिवशी दुपारी आमचे स्वयंसेवक गटागटाने व वेगवेगळ्या मार्गांनी निघाले. ज्या इमारतीत आमचं 'लक्ष्य' होतं त्याच्या आसपास पसरले. (त्या वेळी आमच्यावर प्लेनक्लॉथस्चं 'लक्ष' असे. म्हणून ही खबरदारी.) ठरलेल्या वेळी एकाने त्याच्या दुकानावरचे दोन फोन वापरून डॉक्टरांचे दोन्ही फोन एंगेज करून ठेवले. 'झिरो अवर' झाला तसं 'ऑपरेशन

को-ऑर्डिनेटर' ने बिल्डिंगच्या पायऱ्यांवरून खूण केली आणि एक स्वयंसेवक, डॉ. जयंत शहा या नात्याने कन्सल्टिंग रूममध्ये घुसला. मी डॉक्टर आहे व मला तपासणी करून घ्यायची आहे असं सांगितल्यावर सेक्रेटरीने त्याला आत सोडलं. दोन्ही फोन एंगेज झाल्यानं तीसुद्धा बऱ्यापैकी त्रासली होती. आतल्या वातानुकूलित खोलीत जाऊन डॉ. जयंत शहांनी, त्या डॉक्टरांशी बोलायला सुरुवात केली. एवढ्यात अजून दोन जण खोलीत घुसले. 'हू आर यू?' डॉक्टरांनी विचारलं. 'जयंतस् फ्रेंडस्' उत्तर आलं. दर तीन मिनिटांच्या अंतराने तीनतीनच्या बॅचेस आत घुसत होत्या. बघता बघता, ती वातानुकुलीत खोली जयंतच्या मित्रांनी भरून गेली. समोरच्या दुकानात एकजण टेलिफोनवरून निरीक्षण करत होता. त्याच्याकडे आमच्या वकिलाचा आणि वकिलाच्या ऑफिसवर एकजण, स्कूटर घेऊन तयार. रस्त्याच्या चारी कोपऱ्यांवर टेहळे पसरले होते. फूटपाथवरच्या को-ऑर्डिनरने, सगळे आत पोहोचल्याचे पाहून डोक्यावर टोपी चढवली. रीगलच्या समोरच्या कारंज्यासमोर उभी असलेली एक गाडी इमारतीसमोर आली. त्यातल्या स्वयंसेवकांबरोबर, आधीच जमा करून आणलेले पत्रकार आणि फोटोग्राफर होते. त्यांनाही नक्की काय होणार आहे हे त्यावेळेपर्यंत ठाऊक नव्हतं. पत्रकारही खोलीत शिरले.

खोलीतल्या स्वयंसेवकांच्या शर्टाच्या आत, मोठमोठी पोस्टर्स दडवली होती. ती ताबडतोब बाहेर काढण्यात आली. हा घेराव आहे याची पूर्ण कल्पना डॉक्टरांना देण्यात आली. मग कॅमेराचे फ्लॅशेस चकचकायला लागले व पत्रकारांच्या पुढ्यात त्या डॉक्टरसाहेबांना अडचणीत आणतील असे प्रश्न विचारणं सुरू झालं. 'तुम्हाला कोल्डड्रिंक्स देतो' डॉक्टरसाहेब म्हणाले.

'तुमच्या रूममध्ये आम्ही पाण्याचा थेंबही घेणार नाही–' एक आवाज. भरपूर झकाझकी झाली. मध्ये डॉक्टरसाहेबांनी काकुळतीने करंगळी वर करून याचना केली. ती अर्थातच लगेच मान्य केली गेली. मीसुद्धा तत्त्वतः या कॉलेजांच्या विरुद्धच आहे असं शेवटी ते म्हणाले. एव्हाना अडीच तास उलटले होते. नजरानजर झाली आणि दोन–दोन मिनिटांच्या अंतराने सगळे ग्रुप पटापट खोलीबाहेर आले. दहा मिनि-

टांच्या आत सगळे जण वेगवेगळ्या वाहनांमध्ये बसून पळाले देखील. उरली ती फक्त पोस्टर्सनी भरलेली खोली आणि घामाघूम डॉक्टरसाहेब.

दुसऱ्या दिवशी पेपरात फोटो झळकले, घेरावची बातमी आली. आमच्यासमोर केलेली विधाने मी दडपणाखाली केली वगैरे वगैरे असा त्या डॉक्टरांचा खुलासाही आला.

पण 'ब्लिटज्क्रिग' यशस्वी झाल्याचं समाधान आम्हाला होतं. तऱ्हे-तऱ्हेचे मार्ग वापरून आम्ही प्रश्न समाजापुढे आणला होता. आमच्या-तल्या नियोजनशक्तीचा, सुसूत्रतेचा एक अनुभव आम्हाला आला होता. संपाच्या त्या सगळ्या काळात आम्ही असे खूप अनुभव घेतले. त्यातून आमची 'ग्रोथ' नक्कीच झाली असं आता दोन वर्षांनी म्हणता येईल. त्या साऱ्या प्रक्रियेतून आमच्या वैद्यक व्यवसायातल्या नैतिक भूमिकांबद्दलही आम्ही खूप शिकलो....हरण्याची खात्री असताना, लढाई लढायला जिगर लागते. लढाई हरली तरी जिगर कायम राहत असते....आणि शेवटी युद्ध जिंकायला तीच तर कामाला येणार असते.

माझी मध्यस्थी

परीटघडीचा झब्बा, 'रेबॅन्' चा गॉगल लावून मी टॅक्सीमध्ये बसलो. मी ड्रायव्हरशेजारी आणि ती दोघे पाठी. ड्रायव्हरच्या आरशामधून दोन टेन्स चेहरे दिसत होते. एक होता आमच्या दोस्ताचा आणि दुसरा त्याच्या प्रेयसीचा. आतापर्यंत तर सारं सुरळीत झालं होतं. म्हणजे आमचे दोस्त रीतसर प्रेमात पडले होते. तिकडून प्रतिसाद मिळाला होता. चक्क गेटवे ऑफ इंडियाच्या पार्श्वभूमीवर आणाभाकाही झाल्या होत्या. आणि आता दोन्ही बाजूच्या, हेड-क्वार्टर्सकडे 'प्रपोजल' टाकलं गेलं होतं. दोस्ताच्या घरून एक 'नरो वा कुंजरो वा' असं, थोडीशी काळजी, थोडा राग, थोडा आनंद असं पत्र आलं. त्यामुळे तो अधांतरी. तिचे वडीलच त्या दिवशी मुंबईत थडकणार होते. दोघेही मूळचे मुंबईबाहेरचे. शिक्षणासाठी मुंबईत आलेले. शिक्षणाबरोबर जाताजाता हेही काम करून टाकलं.

तिचे वडील भयंकर दराऱ्याचे. त्यांना आम्ही कमांडर म्हणायचो. (आता म्हणत नाही.) त्यांना भेटायला जायचं होतं. ते दोस्ताला पारखणार होते. त्यांचा निवाडा देणार होते आणि बहुधा ते विरोध करणार याची तिला खात्रीच होती. आम्हाला पण. म्हणून मी तिला टॅक्सीत सांगत होतो, 'हे बघ, आम्ही तुझ्या मामाच्या घरून निघाल्यावर तुझी खरी कसोटी चालू होणार आहे. त्यावेळी तुला तुझ्या निर्णयावर घट्ट राहिलं पाहिजे. कुठलंही प्रेशर आलं तरी....शेवटी वडील मंडळी तशी मायाळू असतात. शेवटी चांगलंच होणार. पण ते तुला व्यवस्थित 'टेस्ट' करणार.' माझ्या लक्षात आलं की नकळतच मी वडिलकीच्या सुरात बोलायला लागलो होतो. आता हा भारदस्तपणा शक्य तितका वेळ ठेवायला हवा होता. कारण मुलाच्या बाजूचा बुजुर्ग म्हणजे मीच नव्हतो का?

तर तिच्या मामाच्या घरी पोहोचलो. ती लगेच स्वयंपाकघरात पळाली. त्यानंतर मधूनमधून अगदी शालीन मुलीसारखी दरवाजातून डोकावत होती. मामा ऑफिसातून यायचे होते. एक-दोन कुणी त्यांच्या ओळखीची मंडळी आली होती आणि अर्थातच दस्तूरखुद्द अण्णा. ओळखीच्या मंडळींबरोबर आमचा एक चहा झाला. तो अर्थातच, त्या मंडळींना कटवण्यासाठी होता. या पाहुण्यांसमोर तर काही मुद्याचं बोलणं शक्यच नव्हतं. पण अण्णांबरोबर थोडासा सुसंवाद साधायला संधी उत्तम होती. टॅक्सीतून येताना अण्णांचे काही 'सॉफ्ट कॉर्नर्स' ठाऊक करून घेतलेच होते. 'मराठी माणूस धंद्यामध्ये मागे का?' या विषयाने भोवानी केली. (अण्णांनी खडतर प्रयत्नांनंतर स्वतःचा धंदा उभारला होता. साहजिकच किल्ली बसली.) त्यानंतर लगेचच, कोकणच्या विकासाच्या ज्वलंत प्रश्नाला हात घातला. (हा तर कोकणातल्या कोणत्याही माणसाचा ज्वलंत विषय.) आणि लगेच हिंदु-मुसलमानसंबंधावर घसरलो. (ओळखलात ना, अण्णांचा राजकीय रंग?).... तर गप्पा झाल्या. पाहुणे कटले. आणि एक विलक्षण शांतता पसरली. अचानक दोस्ताच्या चेहऱ्यावर 'मनोवैज्ञानिक दबाव' आला आणि त्याने चक्क समोरचं वर्तमानपत्र उघडून 'छोट्या जाहिराती' वाचायला सुरुवात केली. त्याला कोपराने ढोसत मी दबक्या स्वरात म्हणालो, 'लेका, पेपर खाली टाक.'

तळहातावरची बडीशेप काळजीपूर्वक साफ करत अण्णांनी हुकमी डायलॉग टाकला, 'कठीण दिसतंय....'

दोस्ताच्या हातातलं वर्तमानपत्र आपोआप गळून पडलं. अभी ॲक्शनका टाईम था. मी माझं बुजुर्गपणाचं बेअरिंग सांभाळलं आणि जास्तीत जास्त परिपक्व आवाज काढत म्हणालो, 'काय कठीण दिसतंय अण्णा?'

'हेच....लग्नाचं.'

'म्हणजे लग्नाला तुमचा तत्त्वतः विरोध नाहीच तर....फक्त कधी करायचं असं ना....' मी एक झुकांडी मारायचा प्रयत्न केला.

'असं कुठं म्हणालो मी?' आमची नाकेबंदी. परत आणखी थोडी शांतता.

'पण अण्णा, विरोध का हे तर सांगा ना. नाही, म्हणजे तुमचा विरोध

असणं अगदी नैसर्गिक आहे. कुठल्याही वडिलांना असं वाटणारच की मुलीने आज्ञेप्रमाणेच वागावं, नाही का ? तरी पण विरोधाचं खास कारण ?' लोण्याचा अस्खा लेप लावत मी नवी 'ओपनिंग' शोधली. थोडा परिणाम झाला असावा.

'त्याचं असं आहे डॉक्टरसाहेब–' अण्णा थांबले. आता हे त्यांचं उलट लोणी लावणं की माझं बुजुर्ग बेअरिंग चांगलं जमण्याची पावती ? जाऊ दे, म्हणून ऐकायला लागलो.

'असं आहे डॉक्टरसाहेब; हिच्या मोठ्या बहिणीचं लग्न व्हायचं आहे अजून. त्याआधी हिचं लग्न म्हणजे....तुमच्या मुंबई-पुण्यात ठीक आहे. पण आमच्या लहान गावात चालत नाही. लोक बोलतात.'

वा ! झक्कास सापडलात अण्णा ! मी सावधपणे हल्ला चालू केला.

'अगदी बरोबर आहे तुम्ही म्हणता ते अण्णा. (घ्या, लोणी घ्या !) पण मुद्दा असा की लग्न ठरलं याचा अर्थ लगेच लग्न करायला पाहिजे असं कुठे आहे ? नाहीतरी या दोघांना 'सेटल' होण्यासाठी एक वर्ष लागणारच आहे. तोवर तिचं जमून जाईलच की !'

'म्हणजे वर्षभर यांचं लग्न जमवून ठेवायचं ?' शेवटच्या दोन शब्दांवर खोच देत अण्णा म्हणाले.

'अगदी नैसर्गिक प्रतिक्रिया आहे तुमची अण्णा. पण असं पाहा, आम्ही लग्न जमवलं आहे हे अजून वर्षभर यांनी तुम्हाला सांगितलंच नसतं तर ? म्हणजे लग्न जमवून ठेवलंच असतं. फक्त ते तुम्हाला ठाऊक झालं नसतं. पण या दोघांची मनं इतकी सरळ की निर्णय घेतल्याक्षणी त्यांनी वडिलधाऱ्यांकडे धाव घेतली. तुम्हाला अंधारात ठेवून त्यांना काहीही करायचं नव्हतं. त्यांच्या या सरळ वागण्याचं काहीच मोल नाही का अण्णा ?'

आतापर्यंत माझा 'बुजुर्ग' भूमिकेतला अगदी स्टॅनिस्लोव्हस्की झाल्याने या नाट्यपूर्ण वाक्याचं वजन अगदी व्यवस्थित पडलं आणि अण्णा थोडे गप्प झाले. आता पुढचा हल्ला.

'आणि दुसरं असं अण्णा, लोक-लोक म्हणजे तरी कोण ? वीस वर्षांपूर्वी तुटपुंज्या भांडवलाच्या जोरावर तुम्ही व्यवसायात शिरलात तेव्हा

याच लोकांनी काय म्हटलं होतं तुम्हाला? लोक वाऱ्यावरोबर पाठ फिरवतात अण्णा. (इथे आमचा अगदी, बाळ कोल्हटकरी थाट.) उद्या हेच लोक, डॉक्टर जावई मिळाला म्हणून तुमचा मान करतील पाहा.'

दरवाजाच्या पडद्याआड थोडी हालचाल झाली. इतका वेळ आत ऐकत असलेल्या आजींनी हळूच चेहरा बाहेर काढून आम्हाला बघून घेतलं. आजींच्या चेहऱ्यावरचे भाव काही पटल्यासारखे होते. त्याचं कारण लगेच समजलं. कारण ऑफिसातून मामा येऊन हजर झाले. त्यांचाही अंशतः प्रेमविवाह (ओळखीतला) असल्याची बातमी कळली आणि मग आतापर्यंत झालेलं सारं 'विचारमंथन' मी पुन्हा एकदा जोराने मामाच्या कानावर घातलं.

पुनरुक्तीने परिणाम अधिक खोल होतो.

एवढं सगळं झाल्यावर सांजा-चहा वगैरे खाऊन आम्ही उठलो. दोस्ताची जवळजवळ आळीमिळी–गुपचिळीच होती. बसस्टॉपपर्यंत आम्हाला पोहोचवायला अण्णा आणि मामा बाहेर पडले. मी दोस्ताला हळूच म्हटलं, 'मामा हे आपलं दोस्तराष्ट्र आहे. तू त्याला बाजूला घे. रस्त्यावर जाताना मी अण्णांशी एकट्याने बोलतो.'

अण्णांशी बोलताना इंग्रजी शब्द न वापरता प्राज्ञ मराठी बोलायचं हे तत्त्व आता छानच वळणी पडलं होतं. मी आता माझ्या दोस्ताविषयी बोलायला लागलो. गेली आठ वर्षे आम्ही जवळचे मित्र होतो. एका खोलीत राहाणारे. दोस्ताचा अभ्यासू स्वभाव. व्यवस्थित, टापटिपीने राहायची वृत्ती. भरपूर कष्ट करण्याची तयारी. आणि मुख्य म्हणजे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यावर मुंबईच्या मोहात अडकून न पडता गावी प्रॅक्टीस सुरू करण्याचा निर्णय. यावेळचं बोलणं खरोखर आतून येणारं, अगदी मनातलं होतं. मला वाटतं, त्याचा परिणाम अण्णांवरही झाला असणार.

स्टॉपवर अण्णा म्हणाले, 'दोन दिवसांनंतर इकडून निघालो की सरळ तुमच्या वडिलांनाच जाऊन भेटतो.'

आता आली का पंचाईत. आजच्या या भेटीचा वृत्तांत दोस्ताच्या आईवडिलांना प्रथम आमच्याकडून कळणं आवश्यक होतं. नाहीतर त्यांचा गैरसमज होण्याची शक्यता होती. आज रात्री जर दादरच्या मुख्य पोस्टात

पत्र टाकलं तर तिसऱ्या दिवशी ते मिळण्याची थोडीतरी खात्री. (सुदैव असं की अण्णा दोस्ताच्या घरी येण्याआधी काही तासच पत्र जाऊन पोचलं. ते असो.) तर हॉस्पिटलमध्ये परत आल्यावर दोस्ताला एक पत्र लिहायला बसवलं. आणि विचार आला की आपणही दोस्ताच्या आई-वडिलांना पत्र लिहावं.

'... आजवर कधीच तुम्हाला पत्र लिहिण्याची वेळ आली नव्हती. आज येत आहे ती एका विशिष्ट परिस्थितीत...'

अशी सुरुवात करून मी लिहीत गेलो. माझ्या दोस्ताबद्दलची माझी मतं, त्याच्या निर्णयाच्या ठामपणाबद्दलची खात्री, तो निर्णय विचार करून घेतला आहे याची खात्री आणि ते दोघे एकमेकांना अनुरूप असल्याची ग्वाही, असं ते पत्र होतं. (दोस्ताच्या आईने ते अजूनही जपून ठेवलंय.)

पत्र लिहून संपलं. दोस्ताला वाचून दाखवलं. भावनाविवश होऊन दोस्ताने हात मिळवले.

ता. क. : दोस्त गृहस्थाश्रमी तर बनला आहेच, पण कन्यारत्नाचीही प्राप्ती आत्ता तीन महिन्यांपूर्वीच झाली आहे. कळवण्यास आनंद वाटतो, की आमची पुतणी चांगली गोंडस आहे.

तिचा नकार मला कळला तेव्हा वरवर मी काहीच प्रतिक्रिया दाखवली नाही. आतून डोकं मात्र बधिर झाल्यासारखं झालं. कितीही नाकारायचं म्हटलं तरी पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव तुम्ही नाकारू शकत नाही हे प्रथम त्या क्षणी कळलं. खोलवर कुठेतरी आपण अपमानित झाल्याची भावना आलीच. अहंकार डिवचला गेलाच.

तिच्या नकाराचं कारण शोधायचं नाही असं ठरवलं. पण हे सारे निर्णय वरवरचे.... मी अतिआशादायी नव्हतो, पण सारा व्यवस्थित विचार (व्यावहारिक पातळीवरचा) करूनही असं जाणवत होतं की हे जमायला काही हरकत नसावी.

बरं, मी काही तिला मागणी वगैरे थोडीच घातली होती? माझा निरोप अगदी स्वच्छ होता, 'आपण एकमेकांना कितपत अनुरूप आहोत हे पाहण्यासाठी आपण एकमेकांशी बोलायला काय हरकत आहे?'

त्याला पण तिने नकार द्यावा? म्हणजे, आपणच या मुलीला ओव्हररेट केली की काय?....छे, असं कसं होईल? मी स्वतःला समजावलं. मग जाणवलं की इथेही माझाच अहंकार आडवा आला. आपण निवडलेली मुलगी योग्य असणारच याबद्दल मी स्वतःची आधीच खात्री करून घेतली होती. किंबहुना त्यामुळेच या नकाराचं दुःख मला जास्त झालं होतं.... दुःख असं तरी कसं म्हणायचं? माझ्या दुसऱ्या वागणुकीत दुःखाची छायासुद्धा नव्हती. आजही माझ्या डोक्यात तिचे विचार वगैरे अजिबात येत नाहीत. पण मध्येच केव्हातरी चालताना पायात काटा घुसावा, तसे तिच्या नकाराचे विचार येतात आणि कळ मस्तकात जाते. आणि नाही कसं, तिचे विचार येतातच. माझ्या डोक्यात एक ॲबस्ट्रॅक्ट आणि धूसर प्रतिमा होती....तिची भेट झाल्यावर या प्रतिमेला प्रथमच

एक आकार मिळाला. आता पुढे कधीही सहचरीच्या दृष्टिकोनातून मी एखाद्या मुलीकडे बघेन तेव्हा तुलनेसाठी म्हणून मी तिचीच प्रतिमा वापरणार आणि जर तिच्याहून एखादीची प्रतिमा सरस निघाली तरच पुढचा विचार. हासुद्धा तिच्यावर कुरघोडी करायचा पुरुषी अहंकारच. 'तू नाही तर तुझ्यापेक्षा चांगली मिळवून दाखवलीच की नाही' वगैरे वगैरे....तिच्या दृष्टीने तिचा निर्णय बरोबरच असणार. पण माझी तीव्र इच्छा आहे की आयुष्यात एकदा तरी तिला वाटावं की याला नकार देण्याचा आपला निर्णय चुकीचा होता म्हणून....कारण, पुन्हा माझा 'स्व!'

'मरने के बाद भी मेरी आँखे खुली रहेगी
आदत जो पड गयी है तेरे इन्तजार की'

असे शेर प्रत्यक्षात आणण्याइतकी काही माझी केस वाईट नाही. किंबहुना तिने नकार दिला हे 'ब्लेसिंग इन डिसगार्डस्' कसं आहे हे सांगणारी हजार कारणे मला मुखोद्गत आहेत, तरीसुद्धा....

दरम्यानच्या काळात, एका स्नेह्याने माझी आणि दुसऱ्या एका मुलीची भेट घडवून आणली. त्यांच्या मते आम्ही दोघे एकमेकांना फारच अनुरूप होतो. कोणत्याही त्रयस्थाच्या दृष्टिकोनातून त्यांचं म्हणणं बरोबरच होतं.

मी त्या मुलीशी बोललो. मुलगी खरोखरच चांगली होती. पहिल्या भेटीतच आपलं मत काही व्यक्तींबद्दल चांगलं होऊन जातं; अशांपैकी ती एक होती. किंबहुना, तिच्या वागण्या-बोलण्यातून जी मॅच्युरिटी आणि शालीनता जाणवत होती ती मी क्वचित एखाद्या मुलीमध्ये पाहिली होती. मला तिच्याबद्दल आदर वाटायला लागला. पण तिचा मी पत्नी म्हणून विचारच करू शकलो नाही. का ते मला अजूनही कळू शकलं नाही. मला या मुलीबद्दल यत्किंचितही शारीरिक आकर्षण वाटलं नाही हे याचं कारण असू शकेल का? हे आकर्षण तिच्या सौंदर्यावर अवलंबून नव्हतं. कारण ही मुलगी दिसायलाही चांगली होती. पण नाही वाटलं तिच्याबद्दल काही 'खास'! पति-पत्नींच्या नात्याला जो एक शारीरिक आकर्षणाचा अंडरटोन हवा, तो मला सापडला नाही. तरीही

मी तिला नकार दिल्याचं कारण अपुरंच राहतं. हा जो अपेक्षित अंडरटोन आहे तो सहवासोत्तर उत्पन्न झाला नसता कशावरून.... सवाल विनतोड आहे.... उत्तर माझ्याकडे नव्हतं आणि नाही. तरीही मी तिला नकार दिला.

त्या मुलीला माझा नकार घेताना काय वाटलं असेल....आणि अचानक या मुलीने माझ्यावर करून ठेवलेल्या डोंगराएवढ्या उपकारांची मला जाणीव झाली. 'तिने' मला नकार दिल्यावर जो भावनिक संघर्ष निर्माण झाला होता त्याचा या प्रसंगामुळे पूर्ण कॅथार्सिस झाला होता.... नकाराचं कारण अतिशय ॲबस्ट्रॅक्ट असू शकतं हे मला आता सर्वार्थानं जाणवलं होतं. प्रत्येक माणसाचं स्वतःचं असं एक तर्कशास्त्र असतं. त्याला अजिबात पर्याय नसतो. या तर्कशास्त्रावर आधारलेल्या निर्णयांवर अपील नसतं. आपण फक्त ते खिलाडूपणे स्वीकारायचे असतात.

मग मी एक काम केलं. आतापर्यंत लिहिलं आहे तशा प्रकारचं एक पत्र मी त्या स्नेह्याला पाठवलं. माझी खात्री आहे, ते पत्र तिने वाचलं असणार. आता तिचं आणि माझं नातं किती नितळ आणि पारदर्शक होऊन गेलं. किंबहुना मैत्रीचं एक युनिक नातं आमच्यात निर्माण झालं. आमच्या दोघांमध्ये भौगोलिक अंतर नसतं तर मी सारं तिला बोलूनही दाखवलं असतं. ते शक्य नव्हतं म्हणून पत्र लिहिलं.

असंच एक युनिक नातं आता मला 'तिच्या'कडूनही अपेक्षित आहे. तिने एकदा तिची कारणं किंवा कारणांचा अभाव, या दोहोंपैकी काय जे आहे ते भडभडा बोलून टाकावं. आम्ही दोघेही क्लिअर!.... पण हे ती कधी करणार नाही. किंबहुना अपवादात्मक धीट मुलगीच हे करील.

माझा मित्र परवा मला म्हणाला, 'मी तिला एकदा विचारणार आहे, तिने तुला का नकार दिला म्हणून...'

मी आत्मज्ञान झालेल्या ऋषीसारखा शांतपणे हसलो आणि म्हणालो, 'नकाराची कारणं विचारायची नसतात. तिला जर त्या संदर्भात काही सांगायचं असेल तर ती स्वतः येऊन सांगेल....'

ती असं काहीही करणार नाही. फार काय, येत्या काही महिन्यात

ती कुणाची तरी सौ बनूनसुद्धा जाईलच. पण तिच्याशी एक मोकळेपणीचा संवाद होऊन जावा असं वाटतंय खरं....यामुळे तिच्या नकाराचं रूपांतर होकारात होण्याची बारीकशी शक्यता आहे, म्हणून तर आपल्या मनात ही इच्छा नाही येत आहे?.... मी मनातल्या मनात हसलो. अगदी स्वतःलासुद्धा इतक्या प्रांजळपणे सवाल करू नयेत....

एक मात्र खरं, 'तो' घाव जरा खोलच बसला होता.

स्थळ होतं, एक लग्नाचा हॉल. माझ्या एका चुलतभावाचं लग्न. त्या निमित्ताने आमच्या कुटुंबातीलच माणसं एकत्र आली होती. बोलता बोलता विषय निघाला की आपण चुलत आणि आते अशी किती बहीण–भावंडं आहोत ?....

आपापले प्रत्येकाचे मित्र आहेत, प्रत्येकाचे उपक्रम आहेत, पण आपण एकमेकांना भेटतो ते फक्त अशा लग्नसमारंभातूनच.

आमचेही 'जोडो भारत'

हे काही खरं नाही. एकीकडे आपण राष्ट्रीय एकात्मतेबद्दल बोलतो. पण आपण सारे एकाच कौटुंबिक पार्श्वभूमीतले.

सारख्या संस्कारातून वाढलेले. आपल्यातली नाती दिवसेंदिवस का पातळ होत चालली आहेत ? जीवनाच्या वाढत्या गतीमुळे की स्वतःच्या आत्ममग्नतेमुळे ?

हे जरा तोडून नव्याने जोडणी करायला हवी. विचार तर सगळ्यांना पटला. मग माझा एक आतेभाऊ भरत, एका आतेबहिणीचा नवरा अजित आणि मी यांची एक 'सुसूत्रता समिती' स्थापन झाली. आम्ही, आठ-वड्याला एकदा भेटायचं ठरवलं. पंचविशीचं एक बरं असतं, या वयात, असलेल्या नात्यांची ऊब जोपासायला आणि नवी उबदार नाती जोडायला उत्साह असतो. चाळिशीतली स्थितीशीलता नसते. तर ते असो.

आम्ही तिघांनी कुटुंबवृक्षाची एक मांडणी केली. आमच्या आज्या व आजोबा यांची पहिली पिढी. आमच्या आईवडिलांची दुसरी पिढी. नंतर आम्हा भावंडांची पिल्लू कंपनी ही चौथी पिढी. तर पहिल्यांदा तिसऱ्या आणि चौथ्या पिढीचा काहीतरी उपक्रम करायचा. नावं काढली तर तिसऱ्या व चौथ्या पिढीचे आम्ही सत्तावन्न मेंबर्स निघालो. (हे सगळे माझ्या वडलांच्या बाजूचे बरं का. आजोळचे नाहीत.) आम्ही विचार असा केला की आपल्यातला प्रत्येकजण मित्रमैत्रिणींबरोबर सहलीला गेलाय. पण

कुटुंबाची सहल आपण काढलेलीच नाही. मग आम्ही हालचालींना सुरवात केली. लोणावळ्याचं एक हॉटेल बुक करण्यापासून ते सहलीचं आर्थिक नियोजन, दिवसांचं वेळापत्रक असं सारं केलं. मग एक पत्रक तयार केलं. ते साऱ्यांना पोस्टाने पाठवलं.

म्हटलं, पाहू या काय प्रतिसाद आहे ते. तीस-पस्तीस मेंबर जमले. बुकिंगजची सगळी व्यवस्था झाली. आणि आमची सहल सुरू झाली.

फक्त भेटण्यासाठी म्हणून, गेल्या कित्येक वर्षांमध्ये कधीच कुणी एकत्र आलं नव्हतं.

कुणाला गाणी म्हणता येतात, कुणाला नकला येतात आणि कोण उत्तम विनोद सांगतो हे कुणालाच ठाऊक नव्हतं.

चौथ्या पिढीतले बच्चेलोक तर असे एकत्र कधी हुंदडलेच नव्हते. सगळ्यांना काहीतरी वेगळं पण छान वाटलं. हे संमेलन काहीतरी खूप वेगळं आणि मस्त झालं हे खरं....कुटुंब नावाच्या संस्थेचे काही अनामिक बध आम्हा साऱ्या चुलतआते बहीण-भावंडात होते, म्हणून आम्हाला जास्त मजा वाटली का?...फक्त मित्रमैत्रिणींबरोबर धमाल करण्याची सवय झाली होती म्हणून आम्हाला हे वेगळं वाटलं का? कदाचित, हे असं करण्यामागचा विचारही काही जणांना पटणार नाही. जातं आहे कुटुंब मोडून तर जाऊ दे ना. दुसरी दुसरी नवी नाती आहेतच की, असाही एक विचार येईल. पण आमचा एक सामूहिक अनुभव सांगतो.... आम्हांला जाणवलं की आमच्यामध्ये सुप्तावस्थेमध्ये असलेली संवादाची बीजं आम्हाला जाणवली. फार न भेटतासुद्धा कुठेतरी असणारा एकमेकांबद्दलचा ओलावा जाणवला.

यात कितपत अर्थ आहे ठाऊक नाही. पण आम्ही आमचा उपक्रम, फक्त सहलीसारख्या धमालीपुरताच मर्यादित ठेवायचा नाही असं ठरवलं....

प्रत्येकाच्या कार्यक्षेत्राची माहिती दुसऱ्याला असेल तर ती सर्वांनी पाहिली पाहिजे. माझ्या माहितीतलं एक कुटुंब, त्यातल्या कुटुंबप्रमुखाचा स्मृतिदिन किंवा श्राद्ध एका वेगळ्या पद्धतीने साजरं करतं, ज्याच्याकडे सांगण्यासारखं बरंच काही आहे किंवा ज्याच्या निव्वळ सहवासातूनही

बरंच शिकता येण्यासारखं आहे अशा एका व्यक्तीबरोबर त्या दिवशी ते सारं कुटुंब सकाळ ते संध्याकाळपर्यंतचा वेळ व्यतीत करतं आणि हे सारं कुठल्या औपचारिक समारंभातून नाही तर चक्क अगदी घरगुती प्रकारे....असंच काहीतरी करायचा आमचा बेत आहे.

यामुळे काय होणार आहे ?

....निदान वेगवेगळ्या स्तरांवरच्या आमच्या जाणीवा निदान विस्तारित तरी होतील. त्यासाठी कुटुंबाचं व्यासपीठ का ?....तर ते सहज उपलब्ध आहे आणि ते जोडण्यातही एक गमतीदार आनंद आहे म्हणून.... आपल्याला दुसरा कोणताही 'सामाजिक उपक्रम' हाती घेता येत नसेल तर हा का घेऊ नये....येताजाता, 'इडियट बॉक्स' ला इडियट–इडियट म्हणण्यात कसला पुरुषार्थ आहे ?

मैत्रिणीचं नातं

एक काळ असा होता, जेव्हा आमच्या वर्गाच्या बरोबर मध्यभागी एक चीनची भिंत होती. एका बाजूला मुलं, दुसरीकडे मुली.... इकडून तिकडे बोलणं हे भयंकर लाजिरवाणं. पण म्हणून नजर वळायची थोडीच राहते ? आठवीचा वर्ग आमचा. आठवतंय की स्त्रीबरोबरच्या नात्याच्या आमच्या कल्पनांना तेव्हा तीनच डायमेन्शन्स होती. एक तर आईसारखी किंवा बहिणीसारखी किंवा....

त्यावेळी दुसऱ्या किंवा नंतरच्या नात्याला काय म्हणायचं ठाऊक नव्हतं. म्हणजे 'बायको' वगैरे म्हणणं फारच पलीकडचं होतं. ती फक्त निसर्गाची चाहूल होती इतकंच.

आमच्या टिपीकल मिडलक्लास पार्श्वभूमीने आमच्यासमोरचे मार्ग हे असे नियंत्रित केले होते....त्यामुळे व्हायचं असं की कॉलेजच्या दिवसांत सुद्धा मुलींशी बोलताना चोरटेपणाची झाक कधी जायची नाही डोळ्यातून....'ती काय अर्थ घेईल' अशी सगळी बाष्कळ भीती. सुदैवाने, स्त्रीबरोबरच्या नात्यांची परिमाणं, डायमेन्शन्स डोळ्यापुढे ठेवणारा एक रस्ता आमच्यापुढे होता, मैत्रिणींचा. बरेचजण स्वतःच्या हाताने हा रस्ता बंद करतात आणि नंतर पस्तावतात. पुरुष म्हणून आपल्या वाढीमधला एक सुरेख टप्पा मैत्रिणीच्या नात्याचा असतो हे काही पुरुषांना जाणवत नाही, कारण ते या नात्यालासुद्धा प्रस्थापित त्रिसूत्रीमध्ये बसवण्याचा प्रयत्न करतात.

मैत्रिणीच्या नात्याची गंमत कळायला तशा मैत्रिणी मिळायचं भाग्य मात्र लागतं. मैत्रिणी याचा अर्थ 'पोरी फिरवणं' असा घेतला तर मात्र सगळंच संपतं. मुलींवर 'इंप' मारणं असा घेतला तर त्यातली सारी नजाकतच जाते. सगळीच नाती उत्क्रांत होत जाण्याची एक प्रक्रिया

असते. त्या उत्फुल्ल प्रक्रियेचा एक भाग बनून जेव्हा येतं ना हे नातं तेव्हा त्यात मजा असतो... हा मजा आस्वादायचा असेल तर एक मात्र करावं. या नात्याला चौकटीत बसवू नये. 'मानलेली बहीण' वगैरे बनवू नये. मैत्रिणीच्या नात्यामधल्या सेक्शुॲलिटीच्या किनारीने आपण का धास्तावतो नेहमी? अशी किनार या नात्याला असणारच की! मला वाटतं या धास्तीचं एक कारण असं असावं की सेक्शुॲलिटीची म्हणजे लैंगिकतेची किनार असलेल्या प्रत्येक नात्याचा परिपाक समागमात व्हायला पाहिजे अशी आपली रूढ समजूत. पण ती तितकीशी खरी नाही. लैंगिकता आणि तिचे पदर हे फक्त समागमापुरते कधीच मर्यादित नसतात. दोन भिन्नलिंगी व्यक्तींमधलं आकर्षण फक्त, निव्वळ शारीर पातळीवरचंच असतं असं नाही. मी माधव ज्युलीयन पठडीतल्या प्लॅटॉनिक प्रेमाबद्दलही बोलत नाही आहे. तोही लैंगिकता नाकारायचाच एक प्रकार....लैंगिकतेच्या तरल किनारींना सामोरं जाण्यासाठीसुद्धा एक दिलखुलासपणा लागतो.... दोन्ही बाजूंनी.

एकदा माझी एक मैत्रीण गुलाबी रंगाचं सुरेख मॅचिंग करून आली होती की बोलता बोलता मी तिला म्हणालो, 'आज तू इतकी छान दिसते आहेस की मला तुला स्पर्श करावासा वाटतोय.' आणि मी थोडासा हसलो. तीसुद्धा हसली....बस्स....मला एका निखळ अभिव्यक्तीचं समाधान मिळालं. इतक्या सरळपणे मी दुसऱ्या एखाद्या सुंदर स्त्रीशी बोलू शकलो असतो? आणि तिने माझं बोलणं इतकं छानपणे स्वीकारलं असतं? शेवटी स्पर्श काय आहे? एक अभिव्यक्ती, एक एक्सप्रेशन, आणि शब्द काय आहेत? एक अभिव्यक्तीच, पण शब्दातून स्पर्शाचा संवाद साधणं हीसुद्धा एक छान गोष्ट आहे. म्हणजे, स्पर्श बाद समजायचा का? तसं नाही, प्रश्न त्या त्या प्रसंगी कुठल्या तऱ्हेची अभिव्यक्ती सर्वाधिक चपखल बसते त्याचा असतो. स्पर्शाला आपण घाबरतो. कारण प्रत्येक स्पर्श म्हणजे जणू शरीरसंबंधाचंच आमंत्रण. त्यामुळे स्पर्श आपणहून चोरटा आणि भित्रा बनतो. दोन भिन्नलिंगी व्यक्तींमध्ये मैत्रीचा आणि जवळीकीचा असा स्पर्श असूच शकत नाही हे प्रमेय कोणी सिद्ध केलं आहे?

मैत्रिणीचा स्पर्श आणि प्रेयसीचा स्पर्श यामध्येही एक नात्यांचा फरक असतो. ही दोन्ही नाती आपापल्या परीने अगदी एकमेवाद्वितीय असतात. माझी एक मैत्रीण मला एकदा म्हणाली, 'तुला नक्की कशी बायको हवी सांग. बघते कोण सापडते का?' मी म्हटलं 'सोप्पं आहे. मला स्वभावानं तुझ्यासारखी बायको हवी.' हे शब्द बोलताना माझी जीभ अडखळली नाही. तिनेसुद्धा 'मग मीच का नको?' असा प्रश्न विचारला नाही. आम्ही दोघांनीही आमच्या नात्याच्या पूर्णत्वाचा बिंदू निश्चित केलेला असतो. किंबहुना तो पूर्णत्वाचा बिंदू आपला आपणच निश्चित होत असतो.

मैत्रिणीच्या नात्यातून आपली स्वतःची नैतिकता पक्की होत जाते असा एक अनुभव आला. या वयात असं छान स्त्री-पुरुष नातं मिळालं की स्त्रीशरीराकडे हपापून पाहायची दृष्टी केव्हाच निवळते. स्त्रीकडे 'व्यक्ती' म्हणून पाहायची सवय आपल्याकडे फार कमी पुरुषांना असते. ही सवय लावून घ्यायचं आम्ही पुरुष नाकारतो. मैत्रिणीचं नातं आपल्याला ही सवय लावतं.

गंमत अशी की, आपण आपल्या व्यापात आणि मैत्रिणी त्यांच्या व्यापात असल्याने बरेच दिवस भेट झाली नाही तरी फरक पडत नाही. भेट झाली की अगदी काल भेटल्यासारख्या गप्पा चालू होतात. बऱ्याच वेळा फक्त फोनवरच मैत्रिणींबरोबरच्या भेटींना घड्याळात बसवून चालत नाही. सुदैवाने माझ्या जवळच्या मैत्रिणी उत्तमपैकी सुग्रण आहेत. चांगले पदार्थ करता येणं हे सुग्रणपणाचं एक लक्षण खरंच, पण असे पदार्थ तयार करून दुसऱ्यांना खाऊ घालण्यातला आनंद मिळवायला आसुसलेलं असणं हे दुसरं महत्त्वाचं लक्षण. माझ्या एका मैत्रिणीकडे जाण्याआधी मी फोनवर तिला फर्माईश देतो. मी विसरलो तर ती मागतेच. गंमत म्हणजे फोनवर बोलताना, आता आम्ही 'हॅलो, कोण बोलतंय' किंवा फक्त प्रश्नार्थक 'हॅलो?' सुद्धा करत नाही. फोनच्या दोन टोकांना आम्ही दोघे आहोत हे आम्हाला कसं कळतं कोण जाणे.

मानवी व्यवहारामध्ये बऱ्याच गोष्टी या 'रॅपोर्ट'वर चाललेल्या असतात. पण त्याची आपल्याला जाणीवच नसते. रॅपोर्ट किती पातळ्यां-

वर असतो हेही जाणवतं. अशा वेळी मैत्रिणीचं नातं म्हणजे तर नात्याचा एक कॅलिडोस्कोप असतो. प्रत्येक हेलकाव्याबरोबर बदलत जाणारा, पण प्रत्येक बदलाबरोबर लगेच स्वतःचा तोल आणि आकृतिबंध साधणारा. संधिकालच्या धूसरतेचं कुणी गणिती समीकरण मांडू नये. तसं मैत्रिणीच्या नात्यालासुद्धा नेहमीच्या मोजपट्ट्या लावू नयेत. नेहमीच्या मोजपट्ट्या जर लटक्या ठरवायच्या असतील तर मात्र या नात्यासारखं दुसरं नातं नाही.

मला भेटलेली ड्रीमगर्ल

....मासिकाच्या पानातून, टीव्हीच्या पडद्यातून किंवा रस्त्या-शेजारच्या मोठ्या होर्डिंग्जमधून जेव्हा तिचा चेहरा दिसतो तेव्हा पटकन जाणवतो तो त्यातला निष्पाप-पणा.... अगदी निरागस हास्य देणारा तो चेहरा सुंदर तर असतोच, पण अगदी सुखीसुद्धा वाटतो. कस-लीच चिंता नसलेली, दोन घट्ट वेण्या घालून अवखळपणे धावणाऱ्या शाळ-करी मुलीसारखी दिसते ती.... तारुण्याची एक सुरेख प्रतिमाच ती परावर्तित करत असते.... मजा, आनंद, उत्साह, ॲक्शन....असे सारे भाव.

प्रत्यक्षात मात्र तिच्या प्रतिमेपेक्षा ती वेगळी दिसते. केस पाठी बांधलेले, डोळ्यांवर चष्मा....त्यामुळे रस्त्यावरून चालताना तिला कुणी फारसं ओळखत नाही. तिच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहिलं की मात्र तिचे काळेभोर डोळे, सुरेख नाक, लिपस्टिक न लावलेले गुलाबी ओठ, हनुवटीखालचा छोटासा खळगा आणि दिसता दिसता लपणारी खळी, हे सारं रुपडं जाणवतं. मात्र या रूपामध्ये तिच्या प्रतिमेमधलं ते अवखळ-पण नसतं....ती खूप शांत वाटते. मॅच्युअरसुद्धा वाटते.

'तुझ्या ॲडव्हरटायझिंग फिल्डमध्ये तुझं देखणं रूप वापरलं जातं, एक्सप्लॉईट होतं असं नाही वाटत तुला?' एकदा मी तिला विचारलं.

'जगात एक्सप्लॉयटेशन अनेक पातळ्यांवर, अनेक वेळा होत असतं. ....हं, माझं एक्सप्लॉयटेशन एकदम वरवरचं, सुपरफिशीयल असल्याने जाणवतं इतकंच.' ती थांबली. 'एक्सप्लॉयटेशन होऊ न देण्याइतकी शक्ती माझ्यात नाही. पण आय नो व्हेअर टू ड्रॉ अ लाईन.... उदाहर-णार्थ, मला सिनेमात जायचं नाही. एखादी मुलगी सिनेमात जाईल, पण अंगप्रदर्शन करणार नाही. ती तिची लक्ष्मणरेषा. तर एखादी म्हणेल, फक्त स्क्रीनवरच मी देहप्रदर्शन करेन.... तीसुद्धा तिची लक्ष्मणरेषा. देहविक्रय

हीसुद्धा कुणासाठी एक्सप्लॉयटेशनची लक्ष्मणरेषा असू शकेल.... त्यापुढे राहतं काय?'

'पण तू या क्षेत्रात आलीसच कशी?' मी तिला अगदी मुलाखत घेणाऱ्याने करावा तसा प्रश्न केला. या क्षेत्रात गेल्या तीन वर्षांमध्ये ती एकदम टॉपला गेलेली.... तिच्या करियरचा ग्राफ माझ्या डोळ्यादेखत वाढत असतो.

'पैशासाठी....' ती एका वाक्यात उत्तर देते. नेहमीचं. आज मी तिला एवढ्या उत्तरावर सोडणार नव्हतो. प्रश्नार्थक नजरेनं मी तिच्याकडे पाहत राहिलो. आणि अचानक ती धो धो बोलायला लागली.... तिच्या आयुष्याबद्दल. शिक्षण चालू असतानाच ती गंमत म्हणून थोडं-थोडं मॉडेलिंग करत होती. विसाव्या वर्षी झालेलं लग्न.... परदेशामध्ये नवऱ्याबरोबर जाऊन राहणं.... दीड वर्षानंतर लग्न मोडून परत येणं, आईवडिलांकडे परत जाण्याला दिलेला नकार.... एक मोठी पोकळी, इनसिक्युरिटीची....त्यावेळी जुन्या मॉडेलिंगने दिलेला हात....

'मी फार इनसिक्युअर आहे रे स्वभावानं.' ती बोलून गेली. 'त्यावेळी मला आर्थिक सुरक्षितता पाहिजे होती आणि भावनिक सुरक्षिततासुद्धा.'

'आता आर्थिक सुरक्षितता तर आली आहे. आता भावनिक सुरक्षितता?....' मी विचारलं. तिच्याच क्षेत्रातल्या एका कलावंताकडे ती आकर्षित झाली होती. आज त्याच्या-तिच्यामध्ये एक वेगळं नातं आहे. पण त्या नात्यानं अजून पती-पत्नी नात्याचं रूप काही घेतलेलं नाही.... तिच्यासाठी पुन्हा एक इनसिक्युरिटी.

बोलता बोलता ती एकदम म्हणाली, 'मी तुला माझ्याबद्दलचं सगळंच सांगितलं रे....मी काही लपवून ठेवत नाही ना, मग माझी इनसिक्युरिटी ही अशी वाढते.. आपण कुणाजवळ काय बोललो?....पण मी तशी फ्रँक आहे.' शेवटचं वाक्य ती स्वतःलाच समजावण्यासाठी बोलली असावी.

तिला आता एक भावनिक आधार हवा आहे. तो मिळवण्यासाठी तिला त्याच्याबरोबरचं ते नातं हवंय. ते तुटू नये म्हणून ती जिवापाड जपते. ती दोघं बरोबर असली की फार जाणवतं हे.

'पाच वर्षांपूर्वी मी असं असुरक्षित नातं जपण्याचा प्रयत्न पण केला

नसता. पण आज करते आहे.... कदाचित या पाच वर्षांनी मला खूप शिकवलं आहे. आदर्श पुरुष ही शेवटी तशीच आदर्श कल्पना आहे की आवाक्याबाहेरची. आणि युटोपिया इज अ फिक्शन. तेव्हा जुळलेलं तोडण्यात काय अर्थ ?....दोनच पर्याय असतात. हँग ऑन ऑर क्विट... मी पहिला स्वीकारलाय....'

मी विचार करत होतो की ही जर रूढार्थाने मॅच्युअर बनत गेली अशी तर याचा तिच्या अवखळ प्रतिमेवर काय बरं परिणाम होईल ?.... तिची प्रतिमा ही तिच्या अंतर्गत संघर्षाची प्रतिक्रिया म्हणून येत असेल का ?.... आणि शेवटी सामोऱ्या येणाऱ्या त्या प्रतिमेच्या पाठी, वास्तवातली वेदना किती वेगळी असते. आज ती असेल चोवीस-पंचवीस वर्षांची. त्यातल्या गेल्या दहा वर्षांमध्ये तर वास्तवामध्ये तिने खूप धक्के पचवले.... तिच्या प्रवासात तिच्याबरोबर एकच गोष्ट कायम होती, तिची असुरक्षितता. सुरक्षितता मिळवण्यासाठीची धडपड. एक टप्पा पार केला की नवी असुरक्षितता.

'तुला एक सांगू, गेल्या पाच-सहा महिन्यांत माझ्याकडे मॉडेलिंगची नवी असाईनमेंटच नाही.... मला टाऊक आहे, माझी या क्षेत्रातली करियर काही फार काळ चालणार नाही. या फिल्डमध्ये असंच असतं. म्हणून तर मी फोटोग्राफी शिकले आहे, शिकते आहे....उद्याची आर्थिक सिक्युरिटी जरा पक्क्या पायावर तरी असावी !' तिचं पेटंट हास्य करत ती म्हणाली. आमच्या इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. आणि एकदम ती म्हणाली, 'माझं काय ॲनॅलिसीस करशील तू ?' मी हसलो आणि म्हणालो, 'विचार करून सांगतो.' तो विषय तिथंच संपला.

दोनच दिवसांनी एका मित्राबरोबर टॅक्सीने प्रवास करत होतो. सिग्नलपाशी टॅक्सी थांबली तर समोरच्या मोठ्या होर्डिंगवर तिचा हसरा चेहरा.

'काय सुरेख हास्य आहे बघ....किती आनंदी....एकदम इनोसंट !... लाइक ॲन ॲडोलेसन्ट गर्ल !'

मी मान डोलावली. वाटलं, प्रतिमा किती फसव्या असतात. सुखी माणसाचा सदरा, शोरूममध्येच पाहावा.

When you sit with a nice girl for two hours, you think it's only a minute. But when you sit on a hot stove for a minute, you think it's two hours. That's relativity.

रिलेटिव्हिटी माझी आणि आईन्स्टाइनची

वरचं वाक्य दस्तुरखुद्द आईन्स्टाइनसाहेबांनीच सांगून ठेवल्यानं त्याची लज्जत अधिक वाढली आहे. 'व्हॉट स्टोव्ह' चा प्रत्यक्ष अनुभव नाही, पण पहिला अनुभव मात्र निश्चित घेतलेला आहे. परंतु सापेक्षतावादाचं तत्त्व सांगणाऱ्या या वाक्यातलाच एक शब्द, भयंकर म्हणजे अगदी काहीच्या बाहीच सापेक्ष म्हणजे रिलेटिव्ह आहे....तो म्हणजे 'नाईस!' 'नाईस' म्हणजे 'छान.' मुलगी असल्याने आपण 'छानछान' असं म्हणू हवं तर....पण नाईस याचा अर्थ गोड, सुंदर, सुरेख, सुस्वरूप असा कसाही करू शकतो आपण. म्हणजे शब्दार्थापासूनच गोचीला सुरुवात.... भावार्थ तर फारच सापेक्ष!

एका मित्राच्या लग्नामध्ये, आमच्या ग्रुपमधल्या एकाने ऐन हॉलमध्ये, नववधूकडे पाहून शेरा मारला, 'अरे, तोंडाला पडवी आहे की!'.... वरचे दात पुढे आलेले असणं याला 'पडवी' असं म्हणण्याचा त्याचा प्रघात आहे. हा शेरा मारल्यावर त्याने, 'याहून सुंदर अनेक मिळाल्या असत्या याला' असे निराश उद्गारही काढले... एकाची मिठाई दुसऱ्याची मिठाई असेलच असं नाही.... असं आपण म्हणतो. 'छान'-पणाचं सापेक्ष समीकरण इतक्या सोपेपणी आपल्याला सापडत नाही.

मला जी 'छान' वाटते ती दुसऱ्याला वाटेलच असं नाही, हे का बरं होतं?....कदाचित 'छान' या शब्दामध्ये आपल्याला फक्त सौंदर्य अभिप्रेतच नसतं म्हणून. मग त्यात नक्की काय अभिप्रेत असतं? सौंदर्याचे आपले निकष तसे ठरलेलेच असतात की. मधुबाला, वहिदापासून ते

रेखापर्यंतची उदाहरणं घेतली तर त्यांच्या सौंदर्याबद्दल कोणाचं दुमत असणार?... पण ते सौंदर्य वेगळं. ते फक्त निरीक्षणाच्या पातळीवरचं. जेव्हा सौंदर्य नात्याच्या जाणीवेतून, साथसंगत शोधण्याच्या उर्मीतून आणि संवादाच्या ओढीतून पाहिलं जातं तेव्हा त्याचं स्वरूप खूप बदलतं. किंबहुना निरीक्षण-सौंदर्यातले नियमच त्याला लागू पडत नाहीत.... ते 'छान' असतं. आणि हे 'छानपण' त्या व्यक्तीसाठी असतं. तुमच्या-आमच्यासाठी असेलच असं नाही. माझा एक दोस्त दिसायला अतिशय 'सुंदर' आहे. त्याची पत्नी मात्र त्या मानाने फारशी 'सुंदर' नाही. पण त्याने तिला पाहिल्यावरोबर त्याला ती 'छान' वाटली. आमच्या कॉलेजातल्या कित्येक सुंदरी त्याला 'छान' वाटल्या नव्हत्या.

कित्येक वेळा व्यक्तीला तिच्या, आवडत्या कामामध्ये गुंतलेली असताना पाहिलं की तिचं छानपण खूप भावतं. परवा मी माझ्या एका मैत्रिणीला भेटायला गेलो होतो. ती मंदबुद्धी मुलांच्या शाळेत काम करते. डोळ्यांमध्ये एक वेगळी झाक असणाऱ्या त्या मुलांच्यामध्ये खेळताना, त्यांच्याशी संवाद साधताना, बोलताना ती इतकी 'छान' दिसत होती की बस्स! मी तिच्याकडे नकळत टक लावून पाहतोय हे तिच्या लक्षात आलंसुद्धा!

हे असं सापेक्ष 'छान' वाटण्यामागची प्रक्रिया काय बरं असावी?... बऱ्याच वेळा ती अमूर्त असते. म्हणजे ती जाणीवेत अमूर्त असली तरी नेणीवेत अगदी मूर्तरूपात असणार. बऱ्याच वेळा अगदी ओझरता क्षणसुद्धा कायमच्या 'छान' वाटण्याला पुरेसा असतो...'तोच क्षण का?' हे क्षण अनुभवणाऱ्यालाही नंतर मुद्देसूद सांगता येत नाही. माझ्या एका भावाने, त्याच्या सध्याच्या पत्नीला जेव्हा पहिल्यांदा पाहिलं त्या क्षणाचं तो वर्णन करतो. ती पाठमोरी उभी होती. तिचा चेहराही त्याला प्रथम दिसला नाही. फक्त बांधा, कांती, आणि केस.... तो म्हणतो, 'त्याच क्षणाला मला ती 'छान' वाटली.' सुंदर असणं आणि छान वाटणं यात हृदयाच्या चुकलेल्या ठोक्याचा फरक असतो असं एकाचं अनुभवसिद्ध सुभाषित आहे.

आता, 'छान वाटणं' म्हणजे 'प्रेम जमणं' का? मला वाटतं,

प्रेम जमण्याच्या वाटेवरचा पहिला मैलाचा दगड म्हणजे 'छान वाटणं.' पण तेवढंच ! प्रेम नावाचा प्रोसेस असतो. त्याला हिरवा कंदील मिळतो तो छान वाटण्याचा. पण काही जण 'छान वाटणं' यातच अधिकाधिक प्रेम आलं असं म्हणतात. (म्हटलं नव्हतं, रिलेटिव्ह आहे शब्द शेवटी). रॉबर्ट फ्रॉस्टच्या 'कलेक्टेड पोएम्स' च्या प्रस्तावनेत तो लिहितो, 'एखादी कविता अमरत्वाचं लेणं घेऊन आली आहे की नाही हे पाहण्याचा एकमेव मार्ग म्हणजे कालौघात ती टिकून राहण्याची वाट पाहणं, असं समजणं मूर्खपणाचं आहे. उत्तम कवितेचा योग्य वाचक, कविता भिडल्याक्षणीच सांगू शकतो की ही जखम अक्षर आहे, ती कधी भरून येणार नाही. प्रेमाचंही अगदी असंच आहे. त्याचं अमरत्व जाणवण्यासाठी काळ जाण्याची वाट पाहवीच लागत नाही. एखादी कविता माझ्या फार काळ लक्षात राहिली यापेक्षा, वाचताक्षणीच मला जेव्हा पक्कं वाटतं की ही कविता मी विसरणंच शक्य नाही, तेव्हाच ती कविता अमर ठरते.'

'छान वाटण्याचं' फ्रॉस्टसाहेबांचं स्पष्टीकरण हे असं आहे. मला वाटतं की प्रेम वगैरे जमो न जमो, तो 'छान वाटण्याचा' अनुभव अतिशय जपून ठेवावा असा असतो. काही दिवसांपूर्वी माझ्याकडे एक मुलगी भेटायला आली. तिला तिच्या विषयावरच्या संशोधनात माझी मदत पाहिजे होती. मी तिला पाहिलं मात्र....ती मला 'छान वाटली.' त्यामागे 'कॉस्मिक रेंज' पासून ते 'एक्ट्रॉ सेन्सरी पर्सेप्शन' पर्यंत जे काय स्पष्टीकरण असेल ते असो. बोलण्याच्या ओघात तिची एंगेजमेंट झाल्याचं कळल्यावर चुटपुट जरूर लागली, पण प्रेमभंग झाला नाही. आता कळलं, मी 'छान वाटणं' ही एक वेगळी क्रिया आहे असं का म्हणतो ते.... नुसत्या 'पक्षी-निरीक्षणापेक्षा' ती कशी वेगळी आहे तेही लगोलगच कळलं. ती केबिनमधून बाहेर पडली तेव्हा समोरच्या हॉलमध्ये दोन सहकारी बसले होते. मी बाहेर आल्यावर एक जण सूचक हसत म्हणाला, 'गुड लुकिंग फिमेल !'...म्हणजे तो फारच आदीम पातळीवर होता. दुसरा म्हणाला, 'तिचं नाक पाहिलंस....अपरं नाक आहे. म्हणजे नकटंही नाही आणि धारदारसुद्धा नाही.... मुमताजसारखं.' म्हणजे हासुद्धा कोरड्या ॲनॅलिसिसमध्ये गुंतलेला. मुमताजसारखं अपरं नाक हे

कॉम्प्लिमेंटस् तिला दिल्याने उगीचच्या उगीच मला बरं वाटलं....मग विचार केला की मघा तिच्याशी बोलताना हे पृथक्करण कसं आठवलं नाही आपल्याला ? आत्ता तिचा चेहरा आठवला तर जाणवतंय त्याच्या शेऱ्यामधलं तथ्य.... 'छान वाटतं' असताना पृथक्करण जमत नाही. 'द होल इज ग्रेटर दॅन द सम ऑफ इटस् पार्टस्' असं म्हणतात. म्हणजे आपल्याला 'छान वाटतं' ते व्यक्तीचं समग्र अस्तित्व....फक्त चेहरा नाही, बांधा नाही, बुद्धी नाही. वाणी नाही....या साऱ्याचा एक मिलाफ. म्हणून तर मग दोनदोन तासांचं एक मिनीट होऊन जातं. पण त्याचवेळी आपल्या अस्तित्वामुळे त्या व्यक्तीला 'हॉट स्टोव्ह' चा अनुभव येत असेल तर....मग कठीणच आहे. म्हणजे, रिलेटिव्हिटीची थिअरी मान्य करूनसुद्धा, दोन व्यक्तींची सापेक्षता केव्हातरी समान निघण्याची अपेक्षाच धरायची नाही, हे काही आपल्याला मान्य नाही बुवा....मग त्यासाठी अनेक प्रकाशवर्षे (म्हणजे सापेक्षतेने काही महिने) थांबायची वेळ आली तरी बेहेत्तर....जय रिलेटिव्हिटी !.... माझी आणि आईनस्टाइनची देखील !

मुलगी : एक पाहणे

दादरला खोदादाद सर्कलच्या ऐन कोलाहलात 'फार्मर ब्रदर्स' नावाचं एक शांत हॉटेल आहे. 'मुलगी पाहणे' या कार्यक्रमासाठीची माझी ती आवडती जागा होती. घरी जाऊन 'चहा-पोहे' कार्यक्रम करणं हे मला फारच मागासलेपणाचं वाटायचं. तेव्हा पुरोगामी भूमिकेतून, हॉटेलमध्ये भेटावं असा विचार असायचा. पुढे कळलं की पोह्यांच्या जागी मिल्कशेक येतो व पडद्याआडच्या चेहऱ्यांच्या जागी टिप मागणारा वेटर येतो एवढाच काय तो फरक! पूर्वी म्हणे, मुलीला चालायला बोलायला सांगायचे आणि आम्ही इथे बसून, अमुक पुस्तक–नाटक–चित्रपट, संगीत, कला अशा क्षेत्रांची 'क्विझ कॉन्टेस्ट' घेणार. आणि जोडीदार निवडण्यामागची समानता वगैरे फारच दूर. अगदी स्मार्ट–स्मार्ट मुलीसुद्धा वाडवडिलांच्या दबावाखाली, भयंकर सहजतेने परंपरागत स्त्रीभूमिका स्वीकारतात. एखादा धीट प्रश्न विचारतानाही त्यांना करावी लागणारी पूर्वतयारी तर जाम जाणवत असते. वडील किंवा भाऊ किंवा आई, अर्ध्या तासाने मुलगा-मुलीला एकटं सोडणार. मग आम्ही तिला घरी सोडणार. त्या तासाभरात 'एकमेकांच्या आवडीनिवडी' पाहण्याच्या गोंडस नावाखाली गंभीर चेहऱ्यानं चर्चा करायच्या....या चर्चाही अशा रुटीन असायच्या. तुम्ही करीयरकडे कसं लक्ष देणार....? मला माझ्या आईवडिलांसोबत राहायचं आहे....घर आणि करीयर यातला सुवर्णमध्य साधायला हवा वगैरे वगैरे. नवऱ्याबद्दलची 'तुमची कल्पना काय, यावर स्टँडर्ड उत्तर म्हणजे, 'समजून घेणारा हवा.' प्रश्न आणि उत्तर दोन्हीही सारखेच निरर्थक.

मुलीचं सोडा, पण मलाही फार अवघडल्यासारखं व्हायचं. मग मी गंभीरपणे प्रस्तावना करायचो, 'हा असा प्रसंग आहे की आपण फार रिलॅक्स होऊच शकत नाही....ओळख झाल्यानंतर पंधरा मिनिटांत

डायरेक्ट जगण्याबद्दल बोलायचं हे खरं नाही. पण नाऊ विकॉज वुई आर इन इट....आपण गप्पा करू या.'

गप्पा असं म्हटलं की स्वतःलाच जरा धीर यायचा. पण तुमचं शिक्षण, कुटुंब, पार्श्वभूमी वगैरे फजूल गोष्टीत इतका वेळ जायचा की, व्हॅन-गॉगचा पिवळा रंग, लिओनार्डोचं 'लास्टसपर', हेब्बरची लाईन, नेरूदाच्या कविता, गावसकरचा बोलर्स बॅक डूईव्ह, मार्क्स-जेनीचं नातं, 'दवात आलीस भल्या पहाटे' म्हणणारे मर्ढेकर, आरती प्रभूंची नक्षत्रे, आयन रॅन्डचं 'फाऊंटनहेड', बॅटलशिप पोटेम्किनचे शॉटस्, पॉटमधलं आईस्क्रीम, चिकनचे विविध प्रकार, या आणि अशा साऱ्या महत्त्वाच्या विषयांवर कधी बोलणंच व्हायचं नाही.

'संगीताची आवड असेलच तुम्हांला?'

'हो, भीमसेन म्हणजे ग्रेटच....मी गेल्या वर्षी सवाईला गेलो / गेले होते ना....' अशी सारी बाष्कळ बडबड. अशा वेळी भीमसेनचं गाणं म्हटल्यावर नेहमी आठवणारी एक गोष्ट मला कधीच सांगावीशी वाटली नाही. रवींद्र नाट्य मंदिरातल्या एका गुणीदास संमेलनात मी, बाल्कनीत टाकलेल्या, घडीच्या एक्स्ट्रॉ खुर्चीवर बसलो होतो. राग जसा रंगात आला तसा प्रेक्षकांचा प्रतिसाद वाढला. मी बाल्कनीतून खाली पाहिलं. भीमसेनच्या समेवरोबर, शेकडो पक्षी हवेत झेपावावे तसे असंख्य हात पलटी मारून समेवर येत...प्रत्येक लाईनीतले, प्रत्येक कोपऱ्यातले. त्यानंतरची सारी मैफल मी खालच्या प्रेक्षागृहातला हाताचा बॅले पाहात, सूर कानात साठवत होतो....आता ही आठवण कुठे सांगणार, एक-मेकांच्या आवडीनिवडीत.

'तुमचं वाचन बरंच आहे असं ऐकलं—' एक-दोघींनी दबून प्रश्न विचारला. वाचनाच्या मुद्यावर का कोण जाणे, पण काहीसा छद्मीपणे वागायचो या मुलींशी. म्हणजे ती जर फिल्म-मासिकं वाचणारी असेल तर तिला सार्त्र काम्यू-रसेलच्या आडरानात धोपटून आणायचं, अव्वल मराठीची एम्. ए. असेल तर क्रोनिन, मॉम् वगैरेना आवर्तन द्यायचं. आणि इंग्रजी तोडत असेल तर मराठी लघुकथेतल्या प्रवाहाबद्दलच बोलायचं....चित्रपटाबद्दलही तसंच. 'मी फक्त चांगले पिक्चर पाहाते' असं

म्हटलं की चॅप्लीनपासून अँतोनिओनीपर्यंत साऱ्यांची हजेरी. बर्गमनची शैली, कुरोसावाचं टेकिंगपासून ते पोलान्स्कीच्या सिम्बॉलिसपर्यंत आणि 'रुटीन हिंदी' पाहणारी असली तरीसुद्धा, ये हवा, ये रात, ये चांदनी' या गाण्याचा म्युझिक डिरेक्टर सज्जाद होता किंवा 'शिवरंजनी' रागात बांधलेली हिंदी गाणी, जॉनी वॉकरवर पिक्चराईज केलेली गाणी असे शिरीष कणेकरी प्रश्नही मला भरपूर यायचे.

....हा असा आसुरी आनंद मी नकळत अनुभवायचो. यातून मला सिच्युएशनवरचा सूड उगवायचा होता की काय नकळे. पण बोलताना माझा स्वर अदबीचा, समजावण्याचा असायचा. मला शेवटी, समोरच्या मुलीलाही दुखवायचं नसायचं....काय आहे, या प्रकारातून एकदा गेल्यावर 'लेट अस पार्ट ॲज फ्रेंड्स्' हे म्हणणं सोपं असतं, पण वागणं कठीण.

एकंदरीत हा प्रकार मला असह्य झाल्यावर मी गेल्या जूनपासून तो सोडूनच दिला. आणि आता आपण चक्क फार्फार प्रतिगामी बनून 'थ्रू प्रॉपर चॅनेल' म्हणजे आईवडिलांच्या द्वाराच मुली पाहाव्या असं ठरवलं. माझं लग्न असल्याने मुलगी प्रथम मी पाहणार, या माझ्या आधीच्या घोषणेला आता 'सपशेल माफी'चं स्वरूप आलेलं होतं.

अशी एखादा अपॉइंटमेंट असली तर चकाचक दाढी करा, इस्त्रीचे कपडे, तोंडाला थोऽडीशी पावडर वगैरे हे सारं मी न चुकता करायचो. आशा असायचीच की न जाणो यावेळी 'ट्रिंग' करून बेल वाजली तर....हं, तर एवढ्या साऱ्या अनुभवातून गेल्यावर कळलेलं सत्य एकच. बाकीचे मुद्दे काहीही असोत. 'ट्रिंग' व्हावं लागतं....आता हे 'ट्रिंग' काय असतं ते झाल्याशिवाय कळत नाही. पण ते चित्रपटाएवढं भडकपणे नसलं तरी मानसिक पातळीवर होतंच होतं. 'ट्रिंग' झाल की प्रेम जमतंच असं नाही. पण प्रेम जमायचं असेल तर 'ट्रिंग' व्हावंच लागतं.

हा अनुभव मुलगी 'पाहण्या'च्या प्रसंगातही एखाद्याला येऊ शकतो. पण मला काही तो आला नाही. नुसते मुद्दे पाहून तडजोड करावी आणि विवाहोत्तर प्रेम होईलच अशा घायकुतीला येण्याइतपत जरी परिस्थिती नव्हती तरीसुद्धा आता, लवकर कुणीतरी सामोरं यावं बुवा असं वाटायला लागलं होतं....आजवर अनेक प्रेमप्रकरणांमध्ये

(इतरांच्या) संस्कृत नाटकातील विदूषकाची भूमिका उत्कृष्ट वठवल्यावर आता 'फिजीशियन हील दायसेल्फ' असं म्हणत होतो...

दिवस चाललेच होते. काम भरपूर असल्याने वेळ भरगच्च जायचा. जीवनाच्या आस्वादातही कुठे खंड नव्हता. सव्वीस ऑगस्टच्या सकाळी वॉर्डात गेलो. भरपूर पेशंटस् पाहायचे होते. 'फॉलो अप'च्या केसेस होत्या. भेटणाऱ्यांची गर्दी होती. लाल पंजाबी ड्रेसमधली एक मुलगी समोर आली अन् म्हणाली, 'मला जरा तुम्हाला भेटायचंय...' तिने आमच्या हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या तिच्या एका नातेवाईकांची ओळख सांगितली. मी माझ्याच तंद्रीत होतो. म्हटलं, 'एक अर्धा-पाऊण तास थांबाल का, प्लीज' (मुलींशी मी नेहमीच सौजन्याने वागतो. तर ते असो.) ती बाहेर थांबली.

गर्दी संपवली अन् तिला आत बोलावली. ती एम. ए. करत होती आणि तिच्या एका प्रजेक्टमध्ये तिला माझं मार्गदर्शन हवं होतं....ती समोर बसून दोन मिनिटेही झाली नसतील आणि....

'ट्विंग' म्हणतात ते असंच असणार. हा एक 'आद्य अनुभव' असतो 'युरेका' सारखा. आतापर्यंत 'ॲबस्ट्रॅक्ट' राहिलेल्या पेंटिंगचा अर्थ क्षणार्धात कवेत यावा तसा. मला तर काही अजून शब्द सापडलेले नाहीत. बरं, हे सारं होत असताना माझा चेहरा, आवाज, कृती यामध्ये कुठलाही बदल होत नाही. अतिशय खोल डोहात चाललेली असते सारी प्रक्रिया. तिच्याशी प्रास्ताविक बोललो. नकळत (नाही, कळतच) पुढल्या भेटीची तारीख–वेळ ठरली. ती बाहेर गेली, आणि माझा एक सहकारी डॉक्टर आत घुसला, 'यार, कौन थी ये लडकी?' मी म्हटलं, अशी–अशा होती म्हणून.

तो म्हणाला, 'माय इन्स्टिंक्ट टेल्स मी, धिस इज युवर गर्ल!'

मी क्षणभर, चोरी पकडल्यासारखा, भेलकांडलो. पण मला त्याची गंमतही वाटली. मी काय किंवा त्याने काय, या मुलीला कधी पाहिलेलं पण नाही....मी हसलो, त्याच्या पाठीवर थाप मारत म्हणालो, 'माझीही इन्स्टिंक्ट मला नेमकं हेच सांगू लागली आहे....' आणि का कोण जाणे, मला आत्मविश्वासाने वाटलं की 'मुलगी पाहणे' हा प्रकार आता आपल्या आयुष्यातून कायमचा गेला....सुटलो बुवा!

कवितेचा जन्म

तसा मी स्वतःला बऱ्यापैकी कवि-हृदयाचा समजायचो. आणि वयाच्या सोळाव्या वर्षी कविता करण्याचे धोक्याचे प्रयत्नही करून झाले होते. पण नंतर कवितांची ती डायरी अडगळीत पडली, ती कायमचीच..... म्हणजे कवीलोकांबद्दल मला आदर नाही असं नाही. पण कविता लिहिण्यातला चार्म तसा गेलाच होता आयुष्यातला.

कदाचित असं असावं की जीवनातली उत्स्फूर्तता थोडी कमी झाली होती. किंवा कविता एखाद्या व्रतस्थ ज्वालामुखीसारखी, आतच धगधगत असावी. पण काहीही झालं तरी ती सुचत नव्हती. आणि कुठलाही लेखन-फॉर्म जोपर्यंत 'इनएव्हिटेबल' होत नाही तोपर्यंत त्यात लिहू नये असं माझं मत. त्यामुळे ते राहिलंच. वर्षे उलटत गेली....

कथा-कवितेतल्या रोमँटिकपणाबद्दल मला तशी फारशी आस्था नसायची. पण खोटं कशाला सांगा, आपल्याही आयुष्यात काहीतरी रोमँटिक घडावं अशी एक अस्पष्ट आशा असायची...दिवस जात होते तसतशी ही आशा काही सबळ होत नव्हती.

त्या दिवशी, तिला मुद्दाम सांगितलं होतं की बरोबर दीड वाजता, अमेरिकेच्या झेंड्याखाली मला भेट. न्यू मरीन लाईन्सवर अमेरिकन कौन्सुलेटच्या इमारतीबाहेर हा झेंडा आहे. बरोबर दीड वाजता जावं, की दहा मिनिटं उशिराच जावं, यावर मी निघताना बराच खल केला.... उत्तर काही मिळालं नाही, पण एक वाजून दहा मिनिटांनी मी त्या फूटपाथवर पोचलो खरा.

विचार असा आला, की आपण या मुलीला एवढा भाव का देतोय बरं? मातोश्री म्हणतात, 'एवढ्या मुली जीव टाकतात तुझ्यावर, तरीही तू म्हणतोस सापडत नाही म्हणून....' मी फक्त हसायचो. 'मी'

आवडणं आणि माझी 'प्रतिमा' आवडणं यातला फरक, मी आईला सांगायचो नाही....मी स्वत:लाच दटावलं, तू गेले काही दिवस करतोहेस काय?....स्वत:ची प्रतिमाच जास्तीत जास्त कलरफुल करून तिच्यासमोर ठेवतो आहेस. तुझी पुस्तकं-लेख वाचायला देतोहेस तिला....फार काय, आतासुद्धा तुझ्या बॅगेमध्ये, तुझ्या लेखांची फाईल आहे. ती तिला तू आज देणार आहेस....लगेच सावरून म्हटलं, हो. पण हे सारं तिला टेस्ट करायला. तिची या सर्वांवरची प्रतिक्रिया काय?....ती माझी क्रिएटिव्ह प्रोसेस लक्षात घेतेय का? हे सारे प्रश्न सोडवायचे नाहीत का?

शेवटी मी निर्धारानं हे विचार बाजूला करत होतो. एवढ्यात पुन्हा आतला आवाज खिजवून गेलाच. सोडून दे यार. तू क्लीन बोल्ड झालाहेस.

आता सुज्ञांच्या लक्षात आलंच असेल की हे सारे विचारमंथन मी काही 'संकेतस्थळी' करत नव्हतो. मी संकेतस्थळापासून थोडं लांबवर आडोशाला उभा होतो. बरोबर एक वाजून पंचवीस मिनिटांनी ती आली. तिच्या पिशवीतून काहीतरी काढून वाचू लागली. शाब्बास पठ्ठे. 'गद्रे-पंचविशी'तल्या लेखांचीच फाईल. हिंदी पिक्चरमधल्या डायरेक्टरचा 'टच' हा असा प्रत्यक्षात पाहत मी तिच्याजवळ गेलो.

माझं एक भाषण होतं त्या दुपारी. आणि तिला मी ते ऐकायला बोलावलं होतं. तिच्या दृष्टीने, त्या भाषणाला येणं किती महत्त्वाचं तेही छान विशद करून सांगितलं होतं....भाषण होतं, 'लहान मुलांच्या मानसिक समस्या' या विषयावरचं. भाषण सुरेख रंगलं. अर्थात ती होतीच प्रेक्षकवर्गात. नंतर त्याच संस्थेत काम करणाऱ्या माझ्या एका मैत्रिणीच्या ऑफिसात जाऊन बसलो. त्यातला सुज्ञ हेतू असा की मैत्रिणीला पण तिचं 'असेसमेन्ट' करता यावं....

जेव्हा एखाद्या लहान मुलाचं एखाद्या व्यक्तीवर आटोकाट प्रेम असतं आणि ती व्यक्ती काही कारणानं त्या मुलापासून तुटते, तेव्हा त्या मुलाची मानसिक उलघाल कशी होते, याचं एक उदाहरण मी भाषणात सांगितलं होतं. मैत्रिणीच्या ऑफिसमध्ये ती मला म्हणाली, 'मोटेपणी असं घडल तर काय होईल?'

मी म्हटलं, 'त्यावेळच्या मानसिक उलघालीचं स्वरूप वेगळं असेल....'

'पण उलघाल होणारच.'

'अर्थात....व्यक्तीच्या संवेदनक्षमतेच्या प्रमाणामध्ये.'

तिने कळश्यासारखी मान डोलावली आणि ती गप्प झाली. ती माझ्या भाषणामध्ये. तिच्या टपोऱ्या डोळ्यांमधून इतक्या खोलपणे 'रिॲक्ट' होत होती, तेव्हा मला काहीतरी जाणवलं होतं. ते या बोलण्यानंतर एकदम गडद झालं.

मैत्रिणीबरोबर आम्ही दोघं खाली उतरलो. आम्ही चर्चगेट स्टेशनकडे चालत होतो. आता तिच्या आत काहीतरी वादळ चाललं होतं. म्हणजे ती बोलत होती व्यवस्थित. पण काहीतरी, अगदी तिचं स्वतःचं असं तिला सांगायचं होतं. ते सांगण्यासाठी मी योग्य व्यक्ती आहे हा विश्वास तिला वाटत होता आणि नव्हताही. मानसिक शास्त्राच्या भाषेत 'अटॅचमेंट फिगर' नात्याची एक संज्ञा आहे. प्रत्येक व्यक्तीला मानसिक पातळीवर स्वतःची ऊर्जा केंद्रित करायला अशा व्यक्ती लागतात. किंबहुना कोणत्याही मानवी नात्यामागची ही मूलभूत बैठक आहे. वयाप्रमाणे हे केंद्रबिंदू बदलतात. या मुलीच्या आयुष्यातली एक 'अटॅचमेंट फिगर' गेली असावी, आणि त्यातून तिच्या हळवेपणाची अगदी वैयक्तिक प्रतिक्रिया तिनं जपून ठेवली असावी....ती प्रतिक्रिया ती सहसा कुणालाही दाखवणार नाही. कारण, काही पण अगदी स्वतःशीच, स्वतःने जपायचे असतात. समाजात वावरताना मेकअपचे थर चढतातच. आणि दुसऱ्या कुणासाठीही त्या व्यक्तीच्या आठवणींचं तेवढं महत्त्व नसतं, इतक्या त्या व्यक्तिगत असतात.

स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर आम्ही गाडीची वाट पाहत उभे होतो. ती अजूनही तिच्याच आवर्तात होती. अचानक तिने, एक पॅड काढून माझ्या हातात दिलं, 'हे वाचा.'

माझ्या हातात तिची एक दीर्घ कविता होती. आतापर्यंत मी बांधलेले आडाखे खरे होते. लहानपणापासूनच तिच्या आयुष्यातलं विलक्षण श्रद्धास्थान असलेल्या आणि काही वर्षांपूर्वी गेलेल्या तिच्या आजीबद्दल ती एकदा बोलली होती. त्याच संदर्भातली ती कविता होती. पण

कवितेतली आर्तता तिने कधी सांगितली नव्हती. अगदी तिची, स्वतःची एक साठवण तिनं ठेवली होती स्वतःजवळ. दुसऱ्या कुणाला त्याच तांव्रतेने ते जाणवणार नाही म्हणून कदाचित....म्हणजे अगदी आत, खोलवर जाणवतं तेव्हा कवितेचाच फॉर्म जन्म घेत असावा. कदाचित कविता आणि आपला संज्ञाप्रवाह यांचा उगम एकाच ठिकाणावरून होत असावा. तिला ही कविता का एकदम दाखवावीशी वाटली मला.... (या 'का ?' चं उत्तर ती अजूनही देऊ शकत नाही.) एवढं मात्र झालं की एखादी व्यक्ती आपल्या एकदम जवळ येण्याचा जो अनुभव असतो तो आम्हा दोघांनाही आला.

'तुम्ही करता कविता ?'

'छे....गेल्या बारा वर्षांत एकही नाही.'

त्या रात्री हा सारा छोटुकला प्रसंग आठवताना पटकन लिहून गेलो. मेकअपपाठचा माणूस शोधायला, नेहमी फार प्रयास पडतात. क्वचित मात्र माणूस आपला, मेकअप करणंच विसरून जातो....ही साली सिच्यूएशनच बेकार !

एखादीचे डोळे आपल्याला, इतके काही खिळवतात.
मेकअप करशील, खबरदार ! सारखं सारखं बजावतात.
आपण म्हणतो ठीक. यही सही है !
उघडी करू आता आपण. हिच्या पुढे आपली वही.
असेल खूप खाडाखोड. फुटली असेल भरपूर शाई,
हळुवार उलटेल ती पानं, शिवण जरा फाटणार नाही.
कुठून येतो हा विश्वास, तेवढं मात्र कळत नाही.
तिच्यापुढं मेकअप करायचा, धीर काही होत नाही.

जवळजवळ प्रत्येक कॉलेजच्या वार्षिकात दरवर्षी, प्रेमाच्या सफल किंवा असफल कहाणीची एखादी लघुकथा पाडलेली आढळते. कथांचा शेवट नेहमी पाहण्यासारखा असतो... उदास नजरेने त्याने खिडकीबाहेर नजर टाकली. ट्रांझिस्टरवरून सूर येत होते, 'लाख चुका असतील केल्या'.... गाणं बदलतं. कधी हिन्दी तर कधी गझल वगैरे. पण नेमका असाच शेवट शे-पन्नास वेळा तरी वाचल्याचा मला आठवतोय.

निर्णय

प्रॉब्लेम असा होता की त्यावेळी रात्रीचा दीड वाजत आला होता. रेडिओ तर केव्हाच बंद झाला होता. सगळीकडे चिडीचूप होतं. क्वार्टर्सच्या बाहेरच्या कट्ट्यावर मी एकटाच बसून. चंद्र होता आकाशात, पण फार रोमँटिक काही दिसत नव्हता. खरं तर, आजच्या या रात्री मला अतिशय सुखाने झोप यायला पाहिजे होती....आज आम्ही एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. मी आणि तिने लग्न करायचा निर्णय....म्हणजे मी हवेवर तरंगत, ढगांवर बसूनच परत यायला हवं होतं. ते राहिलं बाजूला, ढग आकाशात आणि मी जमिनीवर....निर्णय घेतल्यावर आता विचार करत होतो, आपला निर्णय 'नक्की बरोबर' आहे ना? एखादा 'फॅक्टर' आपण डोळ्याआड तर नाही केलेला?....आयुष्यभराच्या निर्णयाचं ओझं का काय म्हणतात; ते माझ्या झोपेला कुरतडत होतं.

या नात्याच्या प्रवासाला सुरवात झाल्यापासून कधीही वरती न आलेली हिशोबी-गणिती वृत्ती आज डोकं चांगलंच वर काढत होती. म्हणजे आतापर्यंत सारं कसं अगदी उलगडल्यासारखं घडत होतं. आमची पहिली भेट झाल्यापासून नंतरच्या नियमित भेटी, क्रमाक्रमाने परिचय-मैत्री-प्रेम अशा कालातीत पायऱ्या पार करत होत्या. गेला आठवडाभर तर मी खुल्या 'हिंटा' देत होतो. पण ती काही उघडउघड बोलत

नव्हतीच. पण एकंदरीत तटस्थ दृष्टीने पाहतानाही आमची प्रगती स्पृहणीय होती....पण अजूनही 'निर्णय' असा झालाच नव्हता....घरी मी आईवडिलांकडे अशी अशी एक मुलगी माझ्या परिचयात आल्याचं हळूच सांगून टाकलं होतं. शिवाय तिचं मोजकं, पण परिणामकारक वर्णनही मी क्रमाक्रमाने करत होतो. पण अजूनही निर्णय असा झालाच नव्हता.... ती ओळखीची झाल्यापासून एकंदर स्त्री या व्यक्तीकडे पाहायच्या माझ्या दृष्टिकोनातही फरक पडलेला मला जाणवत होता. पण अजूनही 'निर्णय' असा झालाच नव्हता....तिला भेटण्यासाठी आणि पाहण्यासाठी जीव कासावीस झाला, तर मला स्वतःलाच माझ्या 'तथाकथित' मॅच्युरिटीची जाणीव करून द्यावी लागत होती. तिला यायला दहा मिनिटं उशीर झाला तरी 'ॲनझायटी' वाढायला सुरवात झाली होती. गॉगलमधून तिच्या चेहऱ्याकडे पाहण्याची सवय पक्की झाली होती. पण अजूनही 'निर्णय' असा झाला नव्हताच.

मी मधूनच विचार करायचो, असं नेमकं काय पाहिलं आपण हिच्यात? खूप डोकं खाजवूनही सांगता यायचं नाही. 'इ होल इज ग्रेटर दॅन द सम ऑफ इटस् पार्टस्' हे सत्य मात्र जाणवायचं. तिच्या अस्तित्वातच काहीतरी असावं. लोक ज्याला वेव्हलेंग्थ जुळणं म्हणतात त्यात आवडी-निवडी जुळण्यापेक्षा अधिक खोल अर्थ असावा. 'आपण आपल्याही नकळत, दुसऱ्या व्यक्तीचे प्रतिसाद किती प्रमाणात यशस्वीपणे हेरू शकतो,' यालाच वेव्हलेंग्थ जुळणं म्हणतात अशी माझी आता अनुभवसिद्ध व्याख्या आहे.

मग मला हेही जाणवलं की या व्यक्तीचा सहवास ही गोष्ट आपल्यासाठी अपरिहार्य बनू पाहते आहे....हे असं का? पुन्हा, तो सहवास आपला हक्कच आहे असं आपण फुकटच वागत असतो, आणि गंमत म्हणजे, ती व्यक्ती याचा त्रास करून घेते आहे असं मात्र आपल्याला वाटत नाही. याच सुमारास एक मोठी धाकधुक मनी जन्म घेते की या मोकळेपणाचा अर्थ असा तर नव्हे, की दुसरी व्यक्ती 'ऑलरेडी बुक्ड्' आहे....

मग थोडेसे तिरके प्रश्न विचारून ती माहिती काढणं...त्यानंतर

लगेचच जीव कसा पातेल्यात पडतो. हे सारं एवढ्याचसाठी की या व्यक्तीच्या सहवासात आपल्याला अशी काही 'खासियत' सापडते की बस्...

यालाच कदाचित 'प्रेमात पडणं' म्हणत असावे सुज्ञ लोक.

याच काळात आणखी एक गमतीदार सवय लागली मला. डोळ्यासमोर वेगवेगळे प्रसंग आणायचे, भावी आयुष्यातले आणि अर्थातच काल्पनिक. त्या प्रसंगांमध्ये तिला 'ठेवायचं' आणि निरीक्षण करायचं आपण.... म्हणजे मी, आईवडील आणि ती असे चौघेजण जेवायला एकत्र बसलो आहोत असा एक प्रसंग....आता जाणवतं की माणसाची मानसिक मापं घेण्याचा तो एक चांगला प्रयोग होता माझा.

आता हे सारं घडत असताना एकीकडे ते गुप्त राहावं असं वाटत होतं आणि त्याच वेळी कुणाला तरी अगदी सविस्तर सांगावं असंही वाटायचं. हे असं घडायला लागलं की समजावं, काहीतरी 'गोची' आहे. अगदी जवळचे दोन मित्र आहेत. त्यांच्याबरोबर खलबतं व्हायला लागली. दुसऱ्यांच्या प्रेमात आपण उत्कृष्ट सल्लागार असू शकतो, परंतु स्वतःवर आलं की मदतीची गरज लागतेच. तर अशा एका बैठकीत माझा सख्या मित्र मला म्हणाला, 'जरा सबुरीने घे....एकदम धाडकन विचारून टाकू नकोस. कुणी मध्यस्थ असेल तर पाहा. मध्यस्थाकरवी गेलं आणि मग जरी तुटलं तरी मित्र-मित्र राहाता येईल तुम्हाला....'

हा समंजस विचार मला पटत होता. पण असंही वाटत होतं की या साऱ्याची काही गरज राहिलेली नाही....दुसरा वास्तवातला महत्त्वाचा मुद्दा असा की भावी मध्यस्थ म्हणून मी ज्यांच्याकडे पाहत होतो, ते आम्हा दोघांनाही जवळून ओळखत होते; पण तूर्तास ते अमेरिकेच्या दौऱ्यावर होते. ते येईपर्यंत वाट पाहावी असा निर्णय मी व मित्राने घेतला. इकडे आमच्या भेटीगाठी सुरू होत्या. त्यात फरक असा पडला होता की आता मला या भेटीची मानसिक 'कीक' बसायला लागली होती. म्हणजे पुरते फसले होते अस्मादिक...बोलता बोलता अचानक 'आता विचारू का?' असं वाटायचं. मी पुन्हा स्वतःवर नियंत्रण करायचो.

भावी मध्यस्थ ज्या रात्री अमेरिकेहून परत येणार होते, त्या संध्याकाळी मी

म्हणून गेलो, 'आज...येणार अमेरिकेहून. उद्या सकाळी फोन करतो....'

'....ना शॉक बसेल ना ऐकून!' ती म्हणाली.

गेला बाजार हजार व्होल्टस्‌चा एक शॉक क्षणभर मलाही बसला. पण लगेच म्हटलं, 'क्या बात है, वेव्हलेंग्थ!' उघडपणे म्हटलं, 'आता हा शॉक एकट्यानं द्यायचा की दुकट्यानं....'

'मी नाही. तुम्हीच फोन करा प्रथम....'

एक क्षण शांततेत गेला.

आणि मग मला 'ट्रान्स' मधून एकदम बाहेर आल्यासारखं वाटलं. निर्णय तर घेऊन झालाच. आणि रोमँटिक असं फार काही झालंच नव्हतं. कुठे शपथा, आणाभाका वगैरे वगैरे....वा! एवढं साधं सोपं असतं हे आधी कळलं असतं तर....आतापर्यंत या क्षणासाठी रचलेल्या तमाम 'ट्रॅटेजीज' आणि डावपेच वापरायलाच लागले नाहीत. इतका सुबोध आणि सोपा असतो हा 'निर्णय' चा धडा?....पण मग त्यामागची गेल्या कित्येक दिवसांची सोडवलेली, जागृत-अजागृत, समीकरणं आठवली.

असं माझं जगणं कधी एका व्यक्तीभोवती भिरभिरलं नव्हतं याआधी....खरं म्हणायचं तर निर्णय कदाचित फार आधीच झाला असेल एवढंच. मला तर आता असं वाटायला लागलंय की मी निर्णय आधीच घेतला होता. तो 'जस्टिफाय' करण्यासाठी मी सामग्री जमवत होतो. ही सामग्री ज्याक्षणी मिळवून पूर्ण झाली त्याक्षणी सुप्त निर्णय उघड झाला इतकंच....

....हुश्श!....म्हणजे आपण जे केलं ते अविचाराने नाही तर पूर्ण विचारांतीच. मी स्वतःला समजावलं. आजूबाजूची रात्र तशीच होती. पुन्हा एकदा चंद्राकडे पाहिलं....चटकन विचार आला, या क्षणाला ती काय बरं करत असेल? आणि चंद्र लगेच रोमँटिक झाला. मग मी स्वतःलाच म्हटलं, 'चल बेटा, चल. अभिनंदन! आणि आता पुढच्या तयारीला लाग.'

निर्णयाचं ओझं चांदण्यात उतरवून मी परत आलो आणि शांतपणे झोपी गेलो.

....खांद्याला पर्स, हातात बॅग आणि हिरवीगार साडी नेसलेली तिची आकृती वळणावर अदृश्य होण्याआधी थबकली. मी हात उंचावला. तिने देखील. आणि मग ती झटक्यात दृष्टिआड झाली. दरवेळी ती जाताना काही खुणा सोडून जाते माझ्यासाठी....आज ती लिओनार्दो द व्हिन्सीवरचं एक पुस्तक सोडून गेली होती. पुस्तक हातात घेतलं....

स्मॉल इज ब्युटीफूल !

लिओनार्दो, बऱ्याच वेळा आरशाच्या लिपीत लिहायचा– म्हणजे, आरशासमोर धरलं तरच ते वाचता येतं. पहिल्या पानावर तिने माझ्यासाठी लिहिलेला मजकूर असाच उलट्या, आरशाच्या लिपीत लिहिला होता. अशा छोट्या गमतीदार पण अर्थपूर्ण गोष्टी करण्याची सवयच आहे तिला !

अगदी पहिल्या दिवशी तिला आमच्या घरी 'दाखवायला' आणत होतो तेव्हाची वेळ आठवली. आईवडिलांची संमती गृहीत धरून, त्यांनी कधीही न पाहिलेल्या–ऐकलेल्या एका मुलीला, 'ही तुमची सून' म्हणून पुढे आणून उभी करायची. त्यात पुन्हा प्रेमात असलो तरीही मी तिला त्यावेळी एकशे एक टक्के ओळखत होतो की नाही याची मलाच खात्री नव्हती. तेव्हा ती पारंपरिक अर्थाने 'पुरोगामी' म्हणजे सासू–सासऱ्यांना आधीच शत्रू पक्षात टाकणारी नसावी अशी मी प्रार्थना करीत होतो....'ती तशी नाही रे मूर्खा....' हे दुसरं मन सांगत होतंच. त्या आधीचे दोन दिवस मी या भेटीची मानसिक पूर्वतयारी दोन्ही बाजूंनी करत होतो. आमच्या आई–वडिलांसमोर तिचे सर्व चांगले मुद्दे ठसठशीतपणे, पण हळुवारपणे (हे कठीण असतं, पण जमतं.) मांडत होतो. मात्र हे करताना तिच्या दिसण्याबद्दल ढोबळ विधानेच करत होतो. कारण दिसण्याबद्दलच्या अपेक्षा कधीही उंचावू नयेत, दिसणं 'अंडरप्ले' करावं. कारण, त्यामुळे मग प्रत्यक्ष भेट

झाल्यावर खोटे अपेक्षाभंग होत नाहीत. तिलाही मी घरातल्या, माझ्या आईवडिलांच्या बारीक सवयी सांगत होतो. या 'टिप्स' जरा जास्तच खोलात जायला लागल्यावर ती म्हणाली, 'घरात गेल्यावर, वाकून नमस्कार करायचा, हे सांगू नका....ते मला ठाऊक आहे.'....चला, म्हणजे ही अशी प्रतिगामी आहे ते बरंच आहे, एकाअर्थी.

ही पहिल्यांदाच घरी येणार म्हणून, दादर स्टेशनला तिला आणायला मी गेलो. माझा रोजच्या प्रवासाचा दादर-ठाणे प्रथम वर्गाचा पास आहे....म्हटलं, बायकोला प्रथम घरी न्यायचं ते सेकंड क्लासनं?.... नकोच. खिशाला चाट बसली तरी चालेल, पण फर्स्टचं तिकीट काढू. तिच्या पर्समधल्या, तिच्या आठवणींच्या म्युझियममध्ये तिनं ते तिकीट जपून ठेवल्याचं पाहून नंतर बरं वाटलं.

घराची ओळख करून द्यायला म्हणून वडिलांनी आतापर्यंत कालानुसार लावलेले सारे फोटो-आल्बम काढले. ते आल्बम पाहताना जणू आमच्या साऱ्या कुटुंबाबरोबर तिची सचित्र ओळख करून दिली जात होती. मी आणि आई मधेमधे आमचे मौलिक शेरे देतच होतो. ते बाराचौदा आल्बम संपल्यावर वाटलं, नव्या माणसाला आपलं करायची ही आल्बमची आयडिया काय मस्त आहे!.... अशा सगळ्या बारीकसारीक फुटकळ घटना.... आईचे पाय फुटतात हे लक्षात आल्यावर तिने न सांगता पुढच्या वेळी औषध आणावं. वडिलांचा स्वेटर पाहिल्यावर हळूच त्यांच्यासाठी एक स्वेटर विणायला घ्यावा.... वरवर फारच 'कुटुंबवत्सल' वाटणाऱ्या या वृत्तीच्या मागे दोन्ही बाजूंचा एकमेकांना आपलंसं करायचा गोड प्रयत्न जाणवतो. ती दुपारी घरी आली अन् आईच्या कुशीत झोपली की आई नंतर मला म्हणते... 'अगदी माऊसारखी आहे रे मुलगी! ऊबेला झोपायला आवडतं तिला.'... आणि मला उगीचच बरं वाटतं.

मी घरी नसताना, ती घरी आली तर तिच्या आणि आमच्या आई-दादांच्या होणाऱ्या गप्पा ती मला नंतर रंगून सांगते. माझे आईवडील त्यांच्या आठवणींची साठवण तिच्यासमोर उघडतात याचं मला वाटणारं कौतुक मी तिला सांगत नाही. ती आमच्याबरोबर बाहेर येते तेव्हा, ती

आईचा हात धरून सांभाळत, तिच्या गतीने चालते त्यावेळी पुढे धावणाऱ्या मला वाटणारा विश्वासही मी मनातच ठेवतो. मी तिला माझ्या पत्रव्यवहाराची एक फाईल सहज वाचायला म्हणून दिली, तर ती परत आली तेव्हा त्यात पत्रलेखक व पत्ते यांची सूचीही करून लावलेली होती.... या छोट्या गोष्टींची दाद छोट्या दृष्टिक्षेपातून अन् छोट्या स्पर्शातूनच द्यायची असते.

बसमधून एकत्र जाताना अचानक, दोघांनीही एकच गाणं गुणगुणावं, हा एक सर्वसाधारणपणे फिल्मी वाटणारा प्रकार तिच्या-माझ्या बाबतीत अनाहूतपणे घडला, तेव्हा प्रथम मला गंमत वाटली. एखादा प्रश्न विचारण्याच्या आधीच दुसरी व्यक्ती त्याचं उत्तरही घेऊन टाकते या गमतीला काय म्हणावं?.... विचार करताना उत्तर मिळालं. आपण जसा 'भाषिक संवाद' करत असतो तसेच अभावित म्हणजे 'नॉनव्हर्बल' सिग्नलही देत घेत असतो....हे छोटेछोटे सिग्नल बरोबर उचलले गेले तर त्यामधून एकत्र सम साधल्याची गंमत येते.

अगदी पहिल्या भेटीपासूनच ती आमच्या घराला 'आपलं घर' म्हणू लागली. मलाच 'माझं घर' च्या ऐवजी 'आपलं घर' म्हणायला थोडा त्रास झाला. अर्थातच माझ्या (नव्हे आमच्या) आई-दादांच्या लग्नाचा एकेचाळिसावा वाढदिवस आपण छानसा साजरा करायचा ही कल्पना तिचीच. या कल्पनेला मी तत्त्वतः पाठिंबा देताच तिने धाडधाड योजना आखायला सुरुवात केली.

त्या दिवशी सकाळी ती घरी डेरेदाखल झाली, भावी सासू-सासऱ्यांच्या लग्नाचा वाढदिवस साजरा करायला. आम्ही एक छान ग्रीटिंग कार्ड तयार केलं होतं. दादांच्या पर्सनल म्युझियममधली त्यांची चाळीस वर्षांची जुनी लग्नपत्रिका हळूच नकळत बाहेर काढली. या पत्रिकेची झेरॉक्स प्रत, कार्डाच्या पार्श्वभागी लावली. त्यावर शेला व शाल यांच्या कापडाची एक गाठ आणि दोन्ही बाजूंचे पदर चिकटवले. लिहिलं, 'रेशीमगाठीची चार दशके'....तिने आईसाठी एक छानशी शाल विणून आणली होती आणि बकुळीचा गजरा. वडिलांसाठी आणलं होतं, तिनेच ऑईलमध्ये केलेलं एक लॅण्डस्केप आणि गुलाबाची फुलं. शिवाय श्रीखंड; सुतरफेणी

वगैरे आम्ही आणलंच होतं. मी घरी जेली तयार केली होती. ती चायना-ग्रास घेऊन आली. त्यानंतर मग सकाळचा सगळा स्वयंपाक आम्ही दोघांनी केला. अर्थातच फायनल टच द्यायला आई होतीच.... सकाळ-पासून संध्याकाळपर्यंत आम्ही चौघांनी अक्षरशः धमाल करत सगळा दिवस घालवला.

सकाळी, जेवायला बसताना कार्डावर लिहिलेला मजकूर मी वाचून दाखवला—

लग्न नावाची संकल्पना
जिला मराठीत म्हणतात,
कन्सेप्ट.
आम्हाला कळायला लागल्यापासून

पहिलाच वाढदिवस हा असा.

जेव्हा, वादळवारे-चांदताऱ्यातून तावून सुलाखून पार पडलेल्या वानप्रस्थातल्या प्रेमाने,

—नुकत्याच अंकुर धरलेल्या डोळ्यांतलं बुजरेपण न लपलेल्या प्रेमा-भोवती—

—आश्वासक मिठीची घरून उब एवढंच म्हणावं,
मूळातली ओढ जपली ना, तर दिवस सारे छान जातात.
इवल्या रोपाचं बनून झाड
त्यावर पक्षी गाणी गातात.

संध्याकाळी निघताना, ती मला म्हणाली, 'तुम्ही सकाळी वाचून दाखवत होतात, तेव्हा दादांच्या डोळ्यांत पाणी तरारलं एकदम.'

मी हळूच म्हटलं, 'कळलं मला....'

घरातून पाय निघत नसतानाही शेवटी ती निघाली. अजून कायमचं इथं यायला अवकाश आहे. खांद्याला पर्स, हातात बॅग आणि हिरवीगार साडी नेसलेली तिची आकृती वळणावर अदृश्य होण्याआधी थबकली. मी हात उंचावला. तिनंदेखील. आणि मग ती झटक्यात दृष्टिआड गेली. दर-वेळी जाताना ती काही खुणा सोडून जाते, माझ्यासाठी....आज तिच्या-मुळे, मला मी आणि माझे आईवडील या नात्यातल्या पूर्णत्वाच्या खुणा गवसल्या होत्या....खरंच, 'स्मॉल इज ब्युटीफूल!'

'सर' लोकांच्या आठवणी

परवा नेहमीप्रमाणे वर्गावर गेलो. प्लॅटफॉर्मवर चढलो. टेबलापाठची खुर्ची उचलली आणि कोपऱ्यात ठेवली. मला खुर्चीवर बसून शिकवायला आवडत नाही. खुर्ची कोपऱ्यात टाकली की मस्त इकडेतिकडे फिरत, साऱ्या वर्गाला कवेत घेत, बोलता येतं.... पाठचा फळा अगदी स्वच्छ, व्यवस्थित पुसून काळाभोर केला. आणि डस्टर खाली ठेवत असताना अचानक थबकलो.... आपल्या नैसर्गिक कृतीची अचानक संगती लागण्याचा एक क्षण असतो. थरारून टाकणारा असतो तो. गेली तीनचार वर्षे वैद्यकीय आणि इतर कोर्सेसच्या विद्यार्थ्यांना शिकवताना वर्गात आल्यावरची कृतींची साखळी हीच असायची....आज मला एकदम जाणवलं, खूप वर्षांपूर्वी माझे वडील मला कॉलेजात शिकवायचे तेव्हा ते वर्गात आल्यावर नेमकं असंच करायचे. हे आजवर कसं जाणवलं नाही आपल्याला....आपली विषय समजून सांगायची पद्धत, फळ्याचा वापर या साऱ्यांमध्ये आपण वडिलांचे निश्चित अनुकरण करत असतो. म्हणजे माझ्या 'वडील सरां'कडून मी खूप काही शिकलो. मैफल सुरू करण्याआधी गायक आपल्या गुरूला मनोमन नमस्कार करतात. माझी खुर्ची उचलण्याची क्रियासुद्धा, एकाग्रतेची लय साधण्याचा असाच एक विधी असतो.

काही 'सर' हे असेच असतात. ते आपल्याला अभ्यासाव्यतिरिक्त कायकाय देऊन जातात हे कळायला खूप काळ जावा लागतो. औपचारिक शिक्षण संपलं त्याला फार काळ लोटला नाही. पण आता अचानक त्या साऱ्या आठवणी गर्दी करायला लागतात...इयत्ता पाचवीमध्ये, आम्हाला इंग्रजी हा नवीन विषय सुरू झाला तेव्हा आमचे इंग्रजी अन् चित्रकलेचे सर एकच होते. वर्षाच्या सुरुवातीचे तीन महिने आमच्या वर्गात कुणी नवा माणूस आला असता तर त्याला नक्की

कोणता तास चाललाय हे कळण्याची शक्यताच नव्हती. कारण या सरांनी पहिले तीन महिने इंग्रजीचं पुस्तकच उघडलं नाही. फळ्यावर झरझर उमटणाऱ्या चित्रांमधून आम्ही इंग्रजी शिकत गेलो. 'गुंड्याभाऊ इज गोईंग टु पोस्ट ऑफीस' हे जामचं वाक्य कोरसमध्ये पूर्ण व्हायच्या आधीच फळ्यावर, धोतर सावरणारा- गंध लावलेला गुंड्याभाऊ आणि पोस्ट ऑफीस जिवंत व्हायचं..... शिकवताना 'व्हिज्युअल एडस्' वापरण्यापेक्षा हातातल्या खडू-पेन्सिलीचा वापर केला तर त्याचा जास्त परिणाम होतो हे मला तेव्हापासूनच 'कळलं' असावं. आता मी माझ्या पेशंटस्ना त्यांच्या आजाराबद्दल ज्ञान देताना कागद-पेन्सिल आणि त्या वरच्या चित्र-आकृत्यांचा वापर का करतो ते मात्र आज 'कळलं'....

...परवा एके ठिकाणी भाषणानंतर, एक गृहस्थ स्टेजजवळ आले आणि म्हणाले, 'तुमचे डोळे बोलत असताना हॉलमधल्या प्रत्येक व्यक्तीचा वेध घेतात. प्रत्येकाला वाटतं तुम्ही त्याच्याशीच बोलता आहात'....हीसुद्धा एका सरांचीच किमया. बऱ्यापैकी धीटपणा आणि स्पष्ट शब्दोच्चार या बळावर शाळेत असताना वक्तृत्व करायचो. पण नववीमध्ये गेल्यावर या सरांनी मला 'ट्रेन' करायचा विडा उचलला. दुपारची शाळा असेल तर लवकर शाळेत जायचं. सर कुठला तरी विषय देत. त्यावर पाच मिनिटं विचार करायचा. आणि मग या वर्गाला 'ऑफ' तास असेल तर त्या वर्गापुढं जाऊन भाषण करायचं. भाषण झाल्यावर संध्याकाळी ते भाषण लिहून काढायचं. हळूहळू सरांनी समोरचा प्रेक्षकवर्ग वाढवायला सुरुवात केली. दोनतीन तुकड्या एकत्र यायच्या. साठसत्तर विषय झाल्यावर, आत्मविश्वासही यायला लागला. संपूर्ण आठवीसमोर भाषण करायचं होतं. अर्धी मुलं-अर्ध्या मुली. भाषण संपल्यावर सर म्हणाले, 'तुझे डोळे कुठे होते? फक्त मुलांकडे पाहूनच बोलत होतास....प्रेक्षकवर्ग एकसंध असतो. प्रत्येकापर्यंत डोळे पोहोचायला हवेत तुझे.'

....असंच एका सरांनी मला, पेशंटसशी कसं बोलावं ते शिकवलं. मेडिकल कॉलेजमध्ये शिकताना, या सरांच्याबरोबर वॉर्डात राउंड घ्यायला जाणं हा प्रकार मला का आवडायचा हे आता मला, मी जेव्हा राउंड

घेतो तेव्हा समजतं. सर वॉर्डात आले की वॉर्डातलं वातावरण एकदम बदलायचं. कॉटस्‌च्या रांगेच्या सुरुवातीला सर असले तरी अगदी शेवटच्या कॉटवरचा पेशंट, तयारीत उठून बसून जवळ सरकणाऱ्या आकृत्यांना नजरेत साठवत असायचा. पेशंटस्‌ना सर इतके का आवडतात हे तेव्हा मला कळायचं नाही. पण सर पेशंटसच्या खांद्यावर थाप मारायचे. हात हातात घ्यायचे. त्यांच्या स्पर्शात आणि डोळ्यांत माया असायची. सर, पाच मिनिटे जरी एका पेशंटबरोबर असले तरी पाच मिनिटांत ते पेशंटला इतकं काही भरभरून द्यायचे की त्यावर पेशंटचा पूर्ण दिवस गोड व्हायचा....परवा आमच्या वॉर्डातले दोन पेशंट खाली येऊन म्हणाले, 'तुम्ही राउंड घ्यायला वरती या डॉक्टर....' मी म्हटलं, 'अरे, दुसरी डॉक्टरमंडळी आहेत की....'

'त्यांच्यात मजा नाही.' तो म्हणाला. मीही हसलो, त्याच्या पाठीवर थाप मारली आणि सरांचं ऋण चुकतं केलं.

दहावी आणि अकरावीची दोन वर्षे ज्या सरांनी मला शिकवलं त्या वृद्ध सरांकडे गेली कित्येक वर्षे मी नेमानं दसरा आणि संक्रांतीला जातो. सर आता अतिशय थकलेत. त्यांना दिसतंसुद्धा कमी. सरांकडे जाण्याचा माझा नेम चुकत नाही. कारण मला त्यांच्याशी गप्पा मारायला आवडतात. एकदा त्यांच्या जिन्यातून उतरताना विचार आला, आपल्याला या सरांनी असं काय बरं दिलं?.... स्वतंत्रपणे व्यवसाय सुरू केला त्याच्या पहिल्या दिवशी सर, कन्सल्टिंग रूममध्ये आले. माझ्या हातात गुलाबाची फुलं ठेवून म्हणाले, 'उमलत्या कळ्या आहेत....इथं उमलू देत.' सरांना नमस्कार केला. सर गेल्यावर कुणीतरी विचारलं, 'कोण हे?'

'माझे सर....त्यांनी मला ताठ मानेने चालायला शिकवलं!' मी बोलून गेलो....

आणि त्यानंतर जाणवलं, माझ्या प्रश्नाचं उत्तर, मीच देऊन टाकलं होतं.

शिक्षकांची नाती खडूफळ्याच्या पलीकडे जाण्याची प्रक्रिया मोठी विलक्षण असते....नात्याचे नवीनच पदर गवसतात त्यामुळे. एम.डी.च्या परीक्षेच्या आधी 'फ्लू'ने आजारी पडलो तर आमच्या एक मॅडम,

स्वतःच्या घरून डबा घेऊन हॉस्टेलच्या रूमवर आल्या.... माझे एक मेडिकलचे सर माझ्या 'क्रिएटिव्ह लिखाणा'बद्दल सतत आत्मीयतेने बोलत असतात, नवीन काही लिहिलं नाही बऱ्याच दिवसांत, तर चक्क गृहपाठ न केल्यासारखं ओरडतात.

मला वाटतं, प्रत्येक व्यक्तीत नातं टिकवून धरण्याची एक क्षमता असते. आपल्याला जर स्वतःची ही क्षमता पडताळून पाहायची असेल तर 'सर नाल्या'चा निकष लावावा. जगण्याच्या रणधुमाळीत पूर्णांशाने उतरल्यावरही किती 'सर–नाती' आपण वर्षानुवर्षे टिकवू अन् जपू शकतो?....किती तीव्रतेने टिकवू शकतो?....ही नाती जपणं आवश्यक आहे ते एवढ्याचसाठी की आपण आज उभे आहोत ते कुणाच्या तरी खांद्यावर ही जाणीव हरवू नये. नम्र बनवणारी रोजच्या आयुष्यातली नाती विस्कळीत झाली, की बळेच नम्र बनण्यासाठी, गुरू–स्वामी अशा मंडळींकडे जावं लागतं....त्यापेक्षा 'सर' लोकांशी सतत संपर्क असला तर आपली ओंजळ सदा फुलांनी भरलेली राहते. त्या सुगंधामुळे प्रदूषित श्वासही निर्मळ बनतात. आणि मुख्य म्हणजे, ओंजळीत असेपर्यंत त्यांचं कधी निर्माल्यही होत नाही.

मसालेदार मालवणी कोंबडी, कोलंबीबहार; वडे नि आमसोलाची कढी हाणावी म्हणून मी आणि दोस्त मंडळी नेहमीच्या हॉटेलात गेलो. गल्ल्यावरचे शेठ नेहमीप्रमाणे रंगात होते. आम्ही जेवणाची ऑर्डर देणार एवढ्यात आमच्यापाशी आले, आणि म्हणाले, 'काय फिरायला येणार का बाहेर....'

'आत्ता, रात्री दहा वाजता?' काहीसा अविश्वासाने मी म्हणालो.

'आत्ता तर मजेला खरी सुरुवात होते.... मात्र जे पाहाल त्यामुळे तुमच्या कोवळ्या मनावर भलतासलता परिणाम होऊ द्यायचा नाही बरं का!'

बाहेर शेठसाहेबांची गाडी उभी होती. आम्ही चौघं आणि शेठ असे बसलो. गाडी चालू झाली आणि गल्ल्यावर बसून नेटका व्यवसाय करणारे शेठ कुठेतरी लुप्त झाले.

'मी तुम्हाला दाखवतो ते सगळं फक्त पाहायचं,' ते म्हणाले, 'त्यामुळे जरी चकित झालात तरी तसं दाखवायचं नाही.'

एव्हाना रात्रीचे साडेदहा गाजले होते. बांद्रा भागातल्या अगदी हमरस्त्यावर, एकीकडे गाडी थांबवत शेठ म्हणाले, 'त्या फ्लॅटमध्ये धंदा चालतो....' एवढ्यात नवरा-बायकोच वाटावे, असे दोन जण आमच्याजवळून चालत गेले. त्यातल्या तरुणीने शेठला पाहिले मात्र....त्या तरुणाचा हात टाकून ती धावत गाडीकडे आली. तिची खुशाली विचारून तिची पाठवणी करत शेठ आम्हाला म्हणाले, 'तो....तो मुलगा पाहिलात....' इनशर्ट केलेला एक स्मार्ट मुलगा अर्धवट अंधारात उभा होता. 'हा इथला मध्यस्थ.' मुद्दाम 'रिस्पेक्टेबल' भाषा वापरत शेठ म्हणाले, 'सकाळी बी. कॉम. करतो कॉलेजात....'

एवढ्यात आणखी एक तरुणी समोर आली. कुठल्याही मध्यमवर्गीय

वस्तीमध्ये नोकरी करणारी मुलगी म्हणून खपून गेली असती ती. गाडीच्या काचेतून शेठशी बोलताना तिने आम्हाला डोळा घातला. तसे शेठ भडकले. 'अपने दोस्तोके साथ अदबीसे पेश आना....' ते तिला म्हणाले. तीही चक्क 'सॉरी' म्हणाली.

शेठचा कायापालट थक्क करणारा होता. एका कोपऱ्यावर गाडीचा वेग कमी होताक्षणीच समोरच्या दुकानातला पोऱ्या, पान घेऊन धावत गाडीकडे आला. रात्री जिवंत होणाऱ्या हातगाड्यांच्या अड्ड्यांवर शेठना सलाम झडले.

'आता या हॉटेलात नेतो तुम्हाला.... तिथे गाडी उभी केल्यावर दरवाजा उघडायला दोन गार्डस् येतील बघा....'

एका पाचमजली हॉटेलच्या आवारात गाडी थांबली आणि नेमकं तसंच झालं. आम्ही गाडीतून उतरतोय तर एक तिशीची तरुणी किंवा बाई शेठना येऊन बिलगली. हिंदी चित्रपटात शोभेल अशा एका जिन्याने आम्ही भुयारात गेलो आणि.... अक्षरशः डोळे दिपले. रंगीबेरंगी दिवे उघडझाप होणारे, कर्कश संगीत आणि मधल्या स्टेजवर पन्नास-शंभर मुलं मुली बेभानपणे नाचत होते. रात्री अकराच्या पुढे या तळघरात एवढी गर्दी असेल हे वरच्या शांत रस्त्यावर कुणाला कळलंच नसतं. राजरोसपणे चरसच्या चिलमी पास होत होत्या.

आम्ही कोपऱ्याल्या खुर्च्यांवर बसलो आणि त्या ठणठणाटातून सुन्न होत असताना, शेजारी दोन मुली येऊन बसल्याचं जाणवलं. सुरेख इंग्रजीत एकजण म्हणाली, 'नाचायला ये ना.' एवढं म्हणून ती अधिकच जवळ सरकली. शेठच्याभोवती तर गराडा. पण ते सगळ्यांच्या फक्त चौकशा करत होते. आमचं अवघडलेपण ओळखून शेठ म्हणाले, 'चला, आपण वर खोलीत जाऊ या.' आम्ही लिफ्टमधून वर जात असताना दोनतीन मुली आम्हाला चिकटल्याच. बऱ्यापैकी आलीशान खोलीमध्ये आम्ही त्यापैकी एका मुलीशी बोलू लागलो. एव्हाना त्यांनाही कळलं होतं की आम्हाला त्यांच्यात 'तसा' इंटरेस्ट नाही म्हणून. त्यातल्या एकीला शेठ म्हणाले देखील, 'तू हमारे साथ रहके टाईम क्यूं बरबाद करती है?' तर ती म्हणाली, 'सेठ, आपने हमारे लिए इतना किया तो

क्या हम दो-चार घंटा आपके साथ नही बिता सकते.'

आम्ही तिच्याशी बोलू लागलो. वरवर तरी तिने तिच्या व्यवसायाबद्दल तिला वाटणारी वाटणारी खंत किंवा घृणासुद्धा, अगदी सफाईदारपणे दडपून टाकली होती. 'मेरेसे कोई जब पूछता है के इस धंदेमें बूरा नहीं लगता क्या....तो मैं उसे बोलती, तू शादी करता क्या बोल मेरेसे.... सब साले ×××' या सगळ्या भागात हिंदी हीच व्यवहाराची भाषा. कारण त्यामुळे माणसाची मुळं कळत नाहीत. 'देखो साब, हम लोग, डिसेन्ट कॉलगर्लस् है। रास्तेकी लडकियाँ नहीं!' ती म्हणाली, 'थोडी लडकीयाँ आयी होंगी फसाबिसाके, लेकीन बहोत सारी आती है फास्ट-मनीके लिए!' ती म्हणाली.

अर्धा तास उलटला तरी आमची ऑर्डर येईना, तसे शेठ चिडले. त्यांच्या पाठोपाठ आम्ही सुद्धा रिसेप्शनकडे आलो...सगळीकडे गोंधळ उडाला. 'सॉरी. गलती हो गयी' वगैरे डायलॉग्ज झाले. आणि पूर्ण इंप्रेस्ड झालेल्या आमच्यासहित शेठ पुन्हा पाचव्या मजल्यावर....तिथे खात-पीत असताना त्यांनी दोन फोन फिरवले. 'थेट जुहूपर्यंत जाऊ आज....' ते म्हणाले.

जुहूच्या रस्त्यावर आमची गाडी होती. इतक्यात एक रिक्शा पाठून आली आणि गाडीपुढे थांबली. झगमगत पंजाबी ड्रेस घातलेली एक मध्यमवयीन बाई त्यातून उतरली अन् आमच्या गाडीजवळ येऊन शेठना म्हणाली, 'मुझे मिले बगैर जा रहे थे... तो मैं पीछा करके आयी!' मग त्या दोघांच्या गप्पा झाल्या. कुणाचं घरभाडं, कुणाचं रेशनकार्ड, अशा त्या गप्पा. ती सलाम करून निघाली तर शेठनी रिक्शाचे दहा रुपये तिच्या खिशात कोंबले. 'उमर गेली तेव्हा आता फक्त कमिशनचा धंदा करते. हिच्या दोनतीन पोरींच्या अडचणी आहेत...' शेठ म्हणाले.

'ये शेठने आजतक, किसी लडकीके साथ कुछ काम नहीं किया!' गाडीत आमच्याबरोबर आलेली मुलगी म्हणाली. एका पॉश हॉटेलात गाडी गेली. सगळीकडे आमचं राजेशाही स्वागत व्हायचं. आम्ही गोलाकार बेड बघितला, फिरणारा पलंग, वॉटरबेड, छताला आरसा व खाली पलंग....प्रत्येक हॉटेलात तारुण्याचा तसाच बाजार. रात्रीचे बारा

वाजताहेत असं सांगूनही खरं वाटत नव्हतं.

आम्ही शेठना हळूच सुचवलं की आम्हाला आता भूक लागलीय. हॉटेलच्या एका खोलीत व्हिडिओ पाहत पाहत आम्ही फ्राईड राईस, चिकन वगैरे चापलं. आमच्या बरोबरची मुलगी मित्राला म्हणाली, 'तू बहोत हॅन्डसम है रे। मेरेको अच्छा लगता है।' तसे शेठ घडघडा हसले आणि दोस्त लाजला. ती मुलगी बोलण्यावरून, उत्तर भारतातली वाटत होती. तिला त्याबद्दल विचारायला लागलो तर शेठ हसले, 'तुम्हाला कधीच खरं सांगणार नाहीत या मुली.'

परतताना, वाटेत 'नाकाबंदी'च्या पोलीसगाड्या उभ्या होत्या. आमची गाडी मंदावली आणि जवळ येणारे सबइन्स्पेक्टर, शेठचे मित्रच निघाले. 'मुंबई दाखवतोय रात्रीची, या मंडळींना....नवखी पोरं आहेत.' शेठ म्हणाले. शेठशेजारी बसलेल्या मुलीला पाहूनही इन्स्पेक्टरनी काहीच विचारलं नाही.

दादरपर्यंत गाडी आल्यावर, शेठनी आम्हाला विचारलं, 'तुम्हाला इथे सोडून दिलं तर चालेल का?'

आम्ही म्हटलं, 'चालेल.'

'मग टॅक्सीतून जाता जाता जरा हिला घरी पोचवा ना! रात्र खूप झालीय. एकटी नको जायला.'

तशी ती हसली, 'हर रात अकेली तो जाती हूँ। उसमे कौनसी नयी बात...'

शेठच्या सूचनेची आम्हाला गंमत वाटली होती. पण आम्ही तिला टॅक्सीत घेऊन तिच्या घराकडे निघालो. अँटॉप हिल भागातल्या, अगदी मध्यमवर्गीय सहकारी सोसायटीमध्ये आमची टॅक्सी गेली. जाताजाता ती सांगत होती, 'मैं हर शनिवारको पिकेट रोडके मारुती को जाती हूँ.' काय मागत असेल ही देवाकडे? रस्त्यावर थांबलेली टॅक्सी व तिची इमारत यामध्ये थोडीशी अंधारी वाट होती. आम्ही तिला तिच्या इमारतीपर्यंत सोडली. आमच्याकडे पाहून ती वेगळंच हसली अन् म्हणाली, 'आज बिझिनेस हुआ नहीं, तो भी आज की रात बहुत अच्छी गयी....थँक यू

अॅन्ड गुड नाईट....' ती झर्रकन वळून इमारतीत गेली. आम्ही परतलो. इमारतीच्या जिन्यावर वाजणाऱ्या चपलांचा आवाज, रात्रीच्या शांततेत मोठा भासत होता...त्या रात्रीत, तेवढी पाचच मिनिटं, आम्ही बाजारातून बाहेर पडलो होतो.

पपा फ्रॉईड झिंदाबाद

'इथे येण्याला तसा माझा विरोध असायचं काही कारणच नव्हतं.... सायकिॲट्रिस्टकडे मदत मागायला जाणं म्हणजे काहीतरी कमीपणाचं आहे असं मी अजिबात मानत नाही...' माझ्यासमोर बसलेला 'तो' सव्वीस वर्षांचा होता. त्याच्या बोलण्याला, बुद्धिमत्तेचं पाणी दिलेलं होतं. इंजिनियरिंग, मॅनेजमेंट या क्षेत्रातल्या उत्तम पदव्या त्याच्याकडे होत्या. ज्या कंपनीमध्ये तो नुकताच कामाला लागला होता, तिकडची मंडळी याच्या 'इंटरव्ह्यू'वरच इतकी खूष झाली की त्याच क्षणी त्यांनी याला सांगितलं, उद्यापासूनच कामावर हजर हो, म्हणून!

तरीसुद्धा, त्याचे वडील जेव्हा प्रथम माझ्याकडे आले तेव्हा त्यांचा चेहरा चिंतातुर होता. या मुलामध्ये मला काहीतरी 'ऑड' वाटतं आहे, विचित्र वाटतं आहे, असं त्यांचं म्हणणं.... मनोविकारतज्ज्ञाकडे जायची कल्पना तो स्वीकारेल की नाही याची भीती! मला ते म्हणाले, 'काही तरी युक्ती वापरून त्याला आणला पाहिजे तुमच्याकडे....'

'युक्ती वापरून फसणाऱ्यांपैकी तो वाटत नाही मला. तुम्हीच दिलेल्या माहितीवरून.... आपण त्याला सरळच सांगावं की तुझ्या वर्तणुकीमध्ये काही त्रुटी आहेत. त्या काढण्यासाठी जर तुला मदत केली तर ती तू स्वीकारशील का?....' सुदैवाने प्रस्ताव समोर मांडताच त्याने अनुमती दर्शवली होती आणि मग तो मला भेटायला येऊ लागला.

'माझा सगळ्यात मोठा 'वीकनेस' म्हणजे पैसा.... माझ्या हातात पैसे असले की मी ते वाटेल तसे खर्च करतो.... बस किंवा टॅक्सी हा पर्याय माझ्यापुढे कधी नसतोच. कुणाबरोबरही हॉटेलात, तेही उत्तम प्रतीच्या, गेलो तरी बील मीच भरणार....इट इज गोईंग आऊट ऑफ हॅण्ड नाऊ. कळतंय मला, पण जमत नाही आहे बदलायला....' तो म्हणाला.

त्याच्या वडिलांचं **मतही तसंच** होतं. त्यांच्या मते याची 'खर्च करायची सवय' अगदी शाळेपासूनची. हॉस्टेलमध्येही तसंच. वडिलांकडून पैसे मागवायचे. कितीही पुरवले तरी मागणी आहेच. आता नवीन नोकरी लागली होती, यापुढे मिळणारा पैसा संपूर्णपणे त्याचा स्वतःचा असणार होता.

'मला आठवतंय, मी पाचवीत होतो. शाळेत जाताना, मी मुद्दाम आई कामात असताना पैसे मागायचो. मग आई सांगायची, कपाटातले घे... मी पाचाच्या ऐवजी पंधरा घ्यायचो. का ते कळायचं नाही मला. मी ते पैसे खाण्यावरच उडवायचो....मग पुढे हॉस्टेलमध्ये गेल्यावरही तसंच. तेव्हा सिगारेटसाठी म्हणून जास्त पैसे लागायला लागले...आणि मग चैन करतो आहोत याची जाणीव असूनही, बोच असूनही चैन चालूच राहिली... असं का होतं डॉक्टर?' तो घडघडा बोलत होता.

अतिरिक्त खर्च करण्याची त्याची सवय, हा जणू त्याच्या व्यक्तिमत्त्वाचाच भाग बनला होता आणि त्यातून त्याला बाहेर पडता येत नव्हतं.

उपचाराच्या एका सत्रामध्ये मी त्याला विचारलं, 'तू घरातून पैसे घेतोस. वेळप्रसंगी उचलेगिरीही करतोस...बाहेरच्यांशी तुझे आर्थिक संबंधही असेच असतात?'

'नॉट ॲट ऑल, डॉक..मी माझे वडील सोडून दुसऱ्या कुणालाही पैशाच्या बाबतीत टोपी लावलेली नाही...'

'अगदी पहिल्यांदा तू पैसे चोरलेस त्यावेळची घटना आठवते आहे?...' मी म्हटलं.

तो विचारमग्न झाला. थोडं थांबून म्हणाला, 'हो....मी साडेचार वर्षांचा असेन. वडिलांचं पाकीट टेबलावर पडलं होतं....आठ आण्यांची दोन नाणी उचलली होती मी....मला आठवतंय, या जुन्या नाण्यांच्या एका बाजूला वाघाचं चित्र असायचं.'

एव्हाना, वडील आणि तो यांच्यामधल्या नात्यांच्या गुंतागुंतीची मला कल्पना आली होती....'यू नो, एका तऱ्हेने त्यांनी त्यांचे निर्णय कधी माझ्यावर फोर्स नाही केले. पण ते इतक्या चतुराईने त्यांची बाजू

मांडायचे की मला त्यांच्यासारखाच निर्णय घ्यायला लागायचा....अन् का कोण जाणे, आय हेटेड इट. ॲक्च्युअली डॉक, मी आणि माझे वडील यांच्यामध्ये एक 'लव्हहेट रिलेशनशिप' आहे....तो मला म्हणाला होता.

त्याचे वडील मला एकदा म्हणाले, 'या मुलाने माझी कोणतीही आज्ञा मोडलेली नाही. कुठल्याही तऱ्हेचा प्रकट विरोध तो करायचा नाही. पण मला जाणवायचं की माझं म्हणणं मान्य करणं त्याला फारसं आवडत नाही आहे.'

तर तो मला भेटायला यायला लागला होता. ते त्याला आवडतही असावं. तो आणि त्याचे वडील यांच्या नात्यात काहीतरी खास होतं. ते काहीतरी 'खास' आहे याची जाणीव व्हायची; पण नक्की काय हे कळायचं नाही.

तो आता वडिलांबद्दलच्या आठवणी मोकळेपणी सांगायला लागला होता. त्याच्या बालपणाबद्दल बोलायला लागला होता. शालेय जीवनापासून अतिशय हुशार असणारा हा मुलगा शाळेच्या पहिल्या वर्षी म्हणजे शिशुवर्गात मात्र विलक्षण त्रास द्यायचा. त्याच्या तीन शाळा बदलल्या गेल्या. एका शाळेतल्या बाईंनी तर त्याला खुर्चीला बांधून ठेवलं होतं....

'वडील सांगायचे की शाळेत जायलाच हवं....मी आरडाओरडा करायचो...त्या दिवशी..' एका श्वासात अनेक श्वास भरून घेण्यासाठी थांबावं तसा तो थांबला. 'मी शाळेतून पळालो....परत कधीही तिथं न जाण्याच्या निश्चयाने. बाहेर आलो तर रिक्शा उभी होती. मी चार वर्षांचा, पण तसा स्मार्ट होतो. रिक्शावाल्याला सांगितलं की रस्ता चुकलोय म्हणून....त्याने घरी आणून सोडलं. वडिलांनी मला उतरवलं. रिक्शावाल्याचे पैसे दिले. मला घरात आणलं...आणि....भरपूर मारलं.... अगदी दणकून....आय रिमेंबर. मी तसाच रडत स्वयंपाकघरात गेलो होतो....' त्याचा चेहरा वेगळाच दिसत होता त्यावेळी. जणू काही, ती सारी घटना, त्याच वेळी, त्याच्या डोळ्यासमोर घडत होती....

'मी सुरी उचलली....बाहेर आलो....आणि वडिलाच्या अंगावर

चालून जात म्हटलं, आय विल किल यू....' का कोण जाणे, त्यांच्या डोळ्यांत पाणी जमा व्हायला लागलं होतं....

....शांतता तोडत मी म्हणालो, 'वॉज दॅट द लास्ट टाईम यू शोड ओपन डिफायन्स टु युवर फादर?....असा उघड-उघड आक्रमक पवित्रा घेऊन वडिलांविरुद्ध उभं रहायची ही तुझी शेवटची वेळ होती?....'

'आय गेस सो....येस, इट वॉज सो....'

'आठ आण्यांची दोन नाणी तुझ्या खिशात आली ती यानंतर किती महिन्यांनी?' मी अगदी शांतपणे विचारलं.

अन् अचानक, माझा आणि त्याचा चेहरा विजेचा लखलखाट झाल्यासारखा चमकला. जणू काही, त्याच्या शैशवाचे, पंचविशीचे असलेले सारे बंध त्या क्षणी स्पष्टपणे, त्याच्यापुढे उलगडले होते.

'आय गेट एव्हरीथिंग, दॅट यू वॉन्ट टु से डॉक....थँक यू.' तो म्हणाला.

त्याच्या दबलेल्या आक्रमकतेला आणि द्वेषाला, अभिव्यक्तीचा मार्ग हवा होता. 'वडील' या नात्यामध्ये अशी आक्रमकता खपणार नव्हती.... परंतु वडील म्हणजेच अर्थसत्ता. त्याच्या व्यक्तिमत्त्वामध्ये, पैसे उडवण्याचा गुणधर्म अशा प्रकारे मूळ धरू लागल्यावर, जेव्हा जेव्हा वडील व तो यांच्यात ताण निर्माण झाले तेव्हा तो कधी उघड चिडला नाही. पण 'वडिलांचे पैसे' उडवण्याची त्याची सवय अधिकधिक घट्ट होत गेली. होता होता या सवयीचं रूपांतर 'पैसे उडवणं' यामध्ये झाल्याचं त्याला स्वतःला नोकरी लागल्यावर खऱ्या अर्थाने कळू लागलं....पण हे असं कसं झालं हे त्याला समजायचं नाही.

त्या दिवशी माझ्याकडून निघताना तो प्रसन्नपणे हसला. मी त्याच्या पाठीवर थाप देत म्हणालो, 'आपल्या वर्तणुकीमागचा खोल अर्थ कळणं ही पहिली पायरी असते. त्या अर्थानुरूप कृती करणं ही त्यानंतरची.'

'आय विल ट्राय माय बेस्ट, डॉक....' ऊबदारपणे हात मिळवून तो गेला. मानवी मनोव्यापाराचं आणखी एक कोडं आपल्यासमोर उलगडल्याच्या समाधानात मी होतो....आणि अचानक थबकलो. आपल्या रुग्णांविषयीच्या निरीक्षणावरून, जागृत-अर्धजागृत मनाचं अस्तित्व, धीटपणे

मांडणारा फ्रॉईड आठवला. बालपणीच्या संवेदनांचे व्यक्तिमत्त्वावर होणारे दूरगामी परिणाम सांगणाऱ्या अनेक शास्त्रज्ञांची निरीक्षणे आठवली.... किती जणांच्या खांद्यावर उभा आहे मी, तेव्हा कुठे क्षितिज नजरेच्या आवाक्यात येऊ लागलंय....पपा फ्रॉईडला मनोमन दंडवत घातला.... मन एकदम नम्र झालं.

जगताना

टेलिफोनच्या घंटीने झोपमोड झाली.... सवयीने हात शेजारच्या रिसीव्हरकडे गेला आणि थबकला. 'तो' फोन तर नसेल? गेले चार-पाच दिवस हे असंच चाललं होतं.... कुणाचा तरी फोन यायचा, वेळी-अवेळी. उचलला की डिसकनेक्ट व्हायचा. किंवा पलीकडच्या बाजूने फक्त घड्याळाची टकटक ऐकायला यायची.... मी रिसीव्हर उचलला. तात्काळ फोन डिसकनेक्ट झाला. हात जडपणे रिसीव्हर खाली ठेवत होते तेव्हा खोलीत येत मोठा भाऊ हसत म्हणत होता, 'काय महाशय, कशी काय लागली झोप? उद्या चतुर्भुज होणार तुम्ही....एकटं झोपायची शेवटची रात्र बरं का तुमची....'

मी पटकन् खळाळून हसायचा प्रयत्न केला. ते हसणं जवळ जवळ नॉर्मल जमत होतं, एवढ्यात पुन्हा फोन वाजला.

'हॅलो, मी डॉक्टर बोलतोय....'

'डॉक्टर,....माझ्या मुलीला मारलंत हो तुम्ही.' पलीकडून एक तारस्वरातला आवाज बोलत होता. 'कसं तुम्हाला समजलं नाही हो डॉक्टर....सोन्यासारखी गुणी पोर माझी....हसरी खेळती हो....'

मी आवाजावर कमालीचा ताबा ठेवत म्हटलं-

'आई, मी तुम्हाला भेटायला येतो घरी. आपण शांतपणे बसून बोलू या....'

'आता काय बोलायचं राहिलंय डॉक्टर...पण या तुम्ही....निःशंकपणे या. आम्ही देवावर श्रद्धा ठेवणारी माणसं आहोत....पण तुम्ही....' पुन्हा त्या आवाजाला भावनावेग अनावर झाला.

रिसीव्हर जागेवर ठेवला. छोटी पुतणी पायाभोवती मिठी घालत म्हणत होती, 'काका, आता काकी काय करत असणार रे....?' आतमध्ये बहीण आणि वहिनीचा उद्याच्या वेशभूषेवर विचार-विनिमय चालला होता.

मी नित्यक्रम आटोपले आणि वडिलांना म्हटलं, 'जरा एका पेशंटकडे जाऊन येतो.' वडिलांना काय ते कळलं असावं. ते म्हणाले, 'एकटा जाऊ नकोस. मोठ्या डॉक्टरांना बरोबर घेऊन जा.'

मी मोठ्या डॉक्टरांच्या हॉस्पिटलमध्ये आलो. पंधरा दिवसांपूर्वी याच हॉस्पिटलमध्ये मी त्या मुलीच्या उशाशी बसून बोलत होतो. विशीची ही मुलगी. 'स्किझोफ्रेनिया' या रोगाची शिकार होती. अनेक डॉक्टरांनी तिच्यावर उपचार केले होते. पण म्हणावं तसं यश मिळालं नव्हतं. ती घरामध्ये उन्मादी अवस्थेत असायची. तिला आवरणं अशक्य व्हायचं. कधीकधी ती तिच्या आई-वडिलांवरही धावून जायची.

मी आणि मोठे डॉक्टर त्यांच्या हॉस्पिटलमधून बाहेर पडलो त्यांच्या घराच्या दिशेने चालायला लागलो....याच रस्त्यावरून मी प्रथम तिच्या घरी गेलो होतो. बेभान अवस्थेत तिला आवरली होती. इंजेक्शन देऊन शांत केली होती. नंतर ती हॉस्पिटलमध्ये यायला तयार नव्हती म्हणून मीच तिच्या खांद्यावर हात ठेवून, तिची समजूत घालून तिला हॉस्पिटलमध्ये घेऊन आलो होतो.

गोळ्या-इंजेक्शन्स-लाईटस् यांच्या उपचाराचं पहिलं सत्र पूर्ण झाल्यावर तिच्यामध्ये अंशतः सुधारणा झाली होती. आई-वडील म्हणाले, 'आता आम्ही तिला हवा बदलण्यासाठी गावी घेऊन जातो. तुमच्या गोळ्या चालूच ठेवू.' मीही म्हटलं, 'हरकत नाही.'

वडील म्हणाले, 'डॉक्टर, तुमचं लग्न ना पुढच्या आठवड्यात? गावाहून तार तर जरूर पाठवू आम्ही तुम्हांला....'

मीही हसून त्यांना पत्रिका दिली होती. दुर्दैवाने ते गावाला जायच्या आधीच दोन दिवस तिची लघवी बंद झाली. आई-वडिलांनी तिला ताबडतोब मोठ्या डॉक्टरांच्या हॉस्पिटलमध्ये दाखल केलं....रुग्ण ठाण्याला. मला दादरच्या दवाखान्यात पेशंटच्या वडिलांनी फोन केला. मी मोठ्या डॉक्टरांशी बोललो. त्यांनी आणखी दोन स्पेशालिस्टस् बोलावले. आणीबाणीचे उपचार केले. शेवटी 'किडनी फेल्युअर' म्हणून केईएममध्ये न्यायचं ठरलं. पण ॲम्ब्युलन्सच्या स्ट्रेचरवरच ती मुलगी गेली. मी ठाण्याला पोहोचेपर्यंत सगळं संपलं होतं.

आम्ही घराची बेल वाजवली. हॉलमधल्या दोन खुर्च्यांवर मी व मोठे डॉक्टर बसलो. समोर जमिनीवर मुलीचे आईवडील, आजोबा, अजून चार माणसं भकासपणे बसली होती. दरवाजाच्या वर देवांच्या तसबिरी होत्या. तिथे इलेक्ट्रिकचा एक दिवा मिणमिणत होता.

थिजवून टाकणाऱ्या शांततेला चिरत एक मोठी वेदना उमटली, 'गेली हो माझी मुलगी....' मुलीचे वडील म्हणाले आणि एकच उमाळा फुटला.

आम्ही फक्त शांतपणे बसून होतो.

'निव्वळ निष्काळजीपणा आणि हलगर्जीपणा....त्यात आमची मुलगी गेली....'

आजवरच्या अनेक केसवर उपचार करताना शंभर टक्के यश कधीच मिळालं नव्हतं. ते तसं मिळतही नाही; त्याचा कुणी दावा पण करू नये. परंतु इथे तर प्रयत्नांबद्दलच शंका घेतली जात होती.

'तुमच्यावर लाखो रुपये आणून ओतले असते हो....तुम्ही का नाही अजून स्पेशालिस्ट बोलावले....पैसे पाहिजे होते ना तुम्हाला. घ्या आता पैसे....'

आरोपांची उतरंड चालूच होती. मी त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला की मनोविकारावरच्या उपचाराचा तातडीचा भाग केव्हाच संपला होता. अशा तऱ्हेची 'रिॲक्शन' केव्हाही, कुठेही येऊ शकली असती. रुग्णाला कुठलीच 'नवीन' औषधं चालू नव्हती. मोठ्या डॉक्टरांनी त्यांना सांगितलं, 'अहो, आम्ही गप्प बसलो होतो का....' त्यांनी केलेल्या धावपळीची माहिती त्यांनी दिली.

मी म्हटलं, 'अहो, तिच्याबद्दल मला काहीच वाटत नसतं तर मी तिच्या उशाशी बसून तिला थोपटत राहतो का? ....मी कशाला तिच्या बेभान अवस्थेतही तिच्याबरोबर राहिलो असतो?....डॉक्टर म्हणजे काही देव नाही. आपल्या हातात होतं ते सगळं आपण केलं. आणि दुसरं म्हणजे तिचा मनोविकार आणि तिचा मृत्यू यांचा काहीच संबंध नाही....'

तरीही मारा चालू होता. मी सुन्न झालो. मोठ्या डॉक्टरांकडे बोट

दाखवून ते म्हणाले, 'तुमच्या मुलांनाही असलं काहीतरी होणार.... तुम्हांला पचणार नाही....तेरा दिवस संपले की मी तुमच्या हॉस्पिटल-समोर येऊन ओरडत बसणार की यांनी माझ्या मुलीला मारली.'

प्रत्येक बेताल आरोपागणिक मी अधिकाधिक सुन्न होत जात होतो. आजवर असं कधीच कुणी बोललं नव्हतं. जिवापाड जपलेल्या तत्त्वांवर हा असा वस्तरा चालू असताना कुठेतरी खूप चिडावं असं वाटत होतं.... खूप उसळावं असं वाटतं होतं...मी फक्त त्यांचेकडे पाहत राहिलो. आणि अचानक मी त्यांना 'माणसं' म्हणून स्वीकारून टाकलं. त्यांच्या उद्रेकाला स्वीकारून टाकलं आणि जाणवलं, हे सारे आरोप आमच्यासमोर करण्यामधून त्यांना मिळणारी सुटकेची भावना नाकारण्याचा आम्हांला हक्क नव्हता. कुठल्याही तर्कशुद्ध वैज्ञानिक स्पष्टीकरणाला तिथे वावच नव्हता. मी वडिलांच्या शेजारी बसलो अन् म्हणालो, 'जे झालं ते फारच वाईट झालं. आम्ही कदाचित प्रयत्नातही कमी पडलो असू. पण आम्हांला तिला मारायचं होतं! तेवढा आरोप आमच्यावर तुम्ही करू नका!'

तासभरच्या सरबत्तीनंतर त्या घरातून बाहेर पडलो....रस्त्यावरच एक जुना सुधारलेला अल्कोहोलिक रुग्ण भेटला. 'डॉक्टर, आता एकदम मस्त! दारूची इच्छाही होत नाही.... त्यावेळी तुम्ही नसतात तर डायरेक्ट वरच पोचलो असतो. आमचे देव आहात तुम्ही....'

त्याच्या पाठीवर थोपटत मी हसलो. एकटाच एका शांत हॉटेलात जाऊन चहा पीत बसलो.

सकाळचे अकरा वाजत आले होते. उद्या याचवेळी मी गृहस्थाश्रमी असणार होतो. एका व्यक्तीला मी आणि ती व्यक्ती मला पूर्ण स्वीकारणार होती...फोनची बेल वाजली....खूप महिन्यापूर्वी भावी पत्नीबरोबर बसून रंगवलेली स्वप्नं आठवली...तो स्पर्श आठवला. ...घडयाळाची, फोनवरची टक् टक् घुमायला लागली....घरातली लग्नाआधीची चेष्टा-मस्करी-हसणं भोवती फेर धरायला लागलं.

माझ्या भोवतालचं संवेदनांचं, भावनांचं हे समुद्रमंथन मी खूप काळ तसंच चालू दिलं...त्याला अजिबात विरोध न करता....आणि ते शमायलाही लागलं. कदाचित विरोध न केल्यामुळेच....आघातांचे ओरखडे

आणि सौख्याची पखरण, यांना एकाच वेळी सामोरं जाण्याची पक्वता, पहाटेसारखी फुलू लागली....अचानक !

....थोडा वेळ तसाच थांबलो आणि गृहस्थाश्रमाला सामोरा जायला निघालो. बिनसलेले तोल साधायचं कसब साधायलाच हवं होतं, जगताना !....

अर्घ्य उगवतीला

....त्या रविवारी शाळेचे मुख्याध्यापक चिटणीस सर सहज म्हणून घरी आले होते. मी त्यांच्याच शाळेचा माजी विद्यार्थी. दरवर्षी आमच्या शाळेतर्फे दहावीच्या परीक्षेत पहिल्या नंबरांमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. त्या निमित्ताने, वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या नामवंत मंडळींचा सत्कार आणि त्यांच्या मुलाखती असा भरगच्च कार्यक्रम असतो. त्यासाठी शाळा, गडकरी रंगायतनसारखं, सुसज्ज थिएटर भाड्याने घेते. नववी–दहावीची सहाशे मुलं, पालक व आमंत्रित यांच्यासाठी हा कार्यक्रम असतो.

मी म्हणालो, 'सर दरवर्षी आपण हा सत्कारसमारंभ टेबलं–खुर्च्या मांडूनच करतो. थिएटरचा वापर आपण करतच नाही....या समारंभातला तोचतोचपणा घालवायला हवा.'

सर म्हणाले, 'तुझ्या डोक्यात काय आहे ते तर सांग....'

'सर....ऑस्कर समारंभ असतो तसा समारंभ करायचा....टाळ्या वाजवायला हात आपोआप उठले पाहिजेत.' बोलतांबोलता माझ्या आवाजाला येणारी उत्तेजना माझी मलाच जाणवायला लागली होती. 'शिवाय, ज्या व्यक्ती बोलवायच्या त्यामध्येसुद्धा एक 'थीम' ठेवायची.'

सर म्हणाले, 'तू सगळी जबाबदारी घेतोस का?...माझ्याकडून सगळं सहकार्य आहे.'

एव्हाना तो कार्यक्रम माझ्या अंगामध्ये भिनायला लागला होता. सारा कार्यक्रम डोळ्यापुढे दिसत होता. नकळत मी कार्यक्रमाचं शीर्षक लिहून गेलो, 'अर्घ्य उगवतीला....'

आजच्या तरुण पिढीच्या पत्रिकेवर दुष्ट ग्रहांची खास मर्जी असावी. नजिकच्या भूतकाळात, आकाशाला भिडणाऱ्या व्यक्तींची पखरण असली की खुरटलेल्यांचं खुरटेपण जास्तच जाणवतं, त्याचप्रमाणे भरारीमागचं

अवसानही थोडं कमीच लेखलं जातं.

त्यात काळ हा असा, 'जैसे थे' चा; म्हणजे 'काहीही करा हो, पण परिस्थिती काय बदलणार आहे....आपण असेच राहणार' असा निराशावादी सूर लावायचा. साहजिकच, कुठे नवं पाऊल रोवायचं म्हटलं तर तिथे अस्तित्वातही नसलेल्या दलदलीच्या, आक्रस्ताळ्या वर्णनांनी, पावलांमध्ये मुंग्या आणायला अनेक जण टपलेले.

मग, 'आजकाल आदर्शच राहिले नाहीत हो' असा हुंदका दाटवायचा अन् आशेची खिडकी घट्ट लावून घ्यायची.

आम्हांला, गगनाला भिडणारी आदर्श माणसं नकोतच असं नाही. पण बऱ्याच वेळा, त्यांच्यातलं माणूसपण विसरलं जाऊन त्यांच्या विभूती बनतात. आम्हाला हवीत, अगदी आमच्या आजूबाजूची, वाटलं तर सहज ज्यांच्यापर्यंत पोहोचता येईल अशी, आणि मुख्य म्हणजे आम्हाला अधिक डोळस बनवतील अशी धडपडणारी माणसं. यशाइतकंच किंबहुना त्याहून अधिक महत्त्व धडपडीला आहे, हे आम्हाला कळलं तरच या स्थितीशील वास्तवाला, गती देता येणं शक्य आहे हा आमचा विश्वास वाढीला लागणार आहे.

जीवनाच्या विविध क्षेत्रामध्ये, अतिशय तरुण वयामध्ये काहीतरी निर्माण करण्याची क्षमता दाखवणाऱ्यांना दाद देण्याचा हा समारंभ असेल. दहावीच्या परीक्षांमध्ये यश मिळवलेले गुणवंत विद्यार्थी तर सत्कारमूर्ती म्हणून प्रेक्षकांपुढे येतीलच. परंतु या समारंभातून, प्रेक्षकांतील विद्यार्थी व पालक यांच्यापुढे व्यवसायाभिमुख शिक्षण व जीवनाभिमुख शिक्षण या संदर्भातले विचार यावेत ही अपेक्षा आहे.

दुसऱ्या दिवशी सरांच्या समोर बसलो होतो. लिहिलेली कार्यक्रमाची भूमिका सरांपुढे ठेवली.

'छानच लिहिलं आहेस. आता तू स्टेजवर काय काय करणार सांग!' सर म्हणाले.

स्टेजवर चक्क धुमाकूळ घालायचाच माझा बेत होता. नेहमीचं टेबल–खुर्च्या–तांब्या–भांडं–फुलं हे नेपथ्य मोडून मला एक सुबक नेपथ्यरचना करायची होती. मी तसं एक स्केच तयार केलं आणि तडक

विजय जोशी या मित्राला गाठलं. तो नाटकवाला. त्याला कार्यक्रमाची कल्पना देतादेता मला जाणवत होतं की त्याच्यातसुद्धा लस भिनायला लागली होती. अगदी स्वस्तामध्ये गडकरी रंगायतनमधली उपलब्ध सामग्री वापरून कसा परिणाम साधता येईल यावर आमची चर्चा झाली. विजय म्हणाला, 'राऊत सरांकडे जाऊ या. ते मदत करणार.'

शांताराम राऊत हे ज्येष्ठ कलादिग्दर्शक. त्यांच्याकडे जाऊन आमची नेपथ्यरचना दाखवली. मी एकूण चार प्रतीकं वापरायचं ठरवलं होतं. उगवता सूर्य–डोंगर–इंद्रधनुष्य आणि फुलपाखरू! राऊत सरांनी या सांगाड्याला स्वतःचा 'रिफाइन्ड' टच दिला....एक काम मार्गी लागलं.

लाईटवाल्या सुरेश मगरकरांना गाठलं, साउंडसाठी उमेश आठवले पकडला. बॅकस्टेजचं काम करायला 'कलासरगम' या हौशी नाट्य संस्थेची मुलं आवडीने आली. श्रीनिवास महाशब्दे नावाच्या मित्राकडे स्लाइडस् बनवायला टाकल्या....दरम्यान, वेगवेगळ्या सत्कारमूर्तींना संपर्क साधून त्यांची निमंत्रणे 'कन्फर्म' करणे; चिटणीस सर व इतर शिक्षकांबरोबर संपर्क ठेवणे ही कामं सुरू होती. शाळेची सगळीच यंत्रणा पाठीशी होती. चिटणीस सरांनी आश्वासन दिल्याप्रमाणे, प्रत्येक गोष्ट ते अक्षरशः मला विचारात घेऊन करायचे. हा त्यांचा मोठेपणा.

आमचे सत्कारमूर्ती पक्के व्हायला लागले. 'षटकार,' 'चंदेरी' या मासिकांचा प्रकाशक निखिल वागळे, झुणकाभाकर चळवळ 'गणपती बचाव' मोहीम चालवणारा संजीव खांडेकर, 'कामेट' शिखर सर करून आता 'कांचनजुंगा' वर स्वारी करणारा वसंत लिमये, उगवती गायिका पद्मजा फेणाणी, पारितोषिकविजेती स्त्री उद्योजिका मंजिरी चुणेकर, समाजशास्त्रज्ञ व समाजकार्यकर्ता प्रवीण पाटकर, उगवता नाट्यदिग्दर्शक कुमार सोहनी, क्रिकेटपटू सुलक्षण कुलकर्णी अशी वेगवेगळ्या क्षेत्रांतली धडपडी मंडळी होती.

या समारंभाला प्रमुख पाहुणाही तशाच ताकदीचा हवा. महानगरपालिका आयुक्त श्री. तिनईकरांचा नंबर फिरवला. पहिल्यांदा ते म्हणाले, 'सत्कार समारंभासाठी म्हणून एवढं लांब ठाण्याला यायचं....तुम्ही जवळचं कुणीतरी पाहा....' परंतु कार्यक्रमाची योजना सांगितल्यावर ते

म्हणाले, मी नक्कीच येईन म्हणून. जीव भांडयात पडला!

राऊत सरांनी या कार्यक्रमासाठी, खास 'बॅचेस' तयार केले. आमच्या रात्रीच्या मिटींग्ज्ना ते न चुकता हजर असायचे. विजय जोशीने, संपूर्ण कार्यक्रमाचा 'मिनीट् टू मिनीट' आराखडा तयार केला केला. लाईट व संगीताचे 'ॲक्शन प्लॅन्स' तयार केले. कोणी कधी उठायचं, कोणी कुठून 'एंट्री' घ्यायची याचे 'क्यू शीटस्' तयार केले. ते सायक्लोस्टाइल्ड करून सर्वसंबंधित विद्यार्थी-शिक्षकांना देण्यात आले....या निमित्ताने, चिटणीस सर, 'सेतू' नावाचा एक शालेय अंक काढतात, त्याच्यासाठी येणाऱ्या व्यक्तींचा परिचयात्मक ललित लेख लिहून झाला. माझ्याबरोबर कार्यक्रमाचं निवेदन करणाऱ्या दहावीतल्या एका मुलीची तालीम घेणं सुरू झालं....माझ्या स्वप्नातल्या एका कार्यक्रमाला रंग भरत होता.

कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी रात्री, गडकरी रंगायतनवरून दमून परतलो, तर फोन आला की, कार्यक्रमासाठी आधी येण्याचं कबूल केलेला एक उगवता अभिनेता-स्टार येणार नाही म्हणून! रात्रीचे साडेअकरा वाजले होते. आता आयत्या वेळी कुणाला बोलवायचं....विचार करतच झोपलो. सकाळी सहाला उठलो आणि चुटकीसरशी कोडं सुटलं...'टिळक आगरकर,' 'चाणक्य' या नाटकांमुळं प्रसिद्धीला आलेला प्रमोद पवार, चांगला मित्र आहे. त्याला झोपेतून उठवलं. आणि सांगितलं, आज सकाळी नऊ वाजता तू मला रंगायतनवर हवास....पुढचं तिकडे सांगतो. प्रमोदने होकार दिला.

कार्यक्रमाच्या मांडामांडीत साडेनऊपर्यंतचा वेळ पाखरासारखा उडून गेला....रंगायतन फुल्ल भरलं होतं. मुलं-पालक-पाहुणे साऱ्यांच्या हातात 'सेतू' चे अंक होते. आम्हा बॅक स्टेजवाल्यांच्या खाणाखुणा झाल्या आणि...

....प्रेक्षागृहातले दिवे मंदावले. आनंदी लयीचं सुरेख संगीत सुरू झालं. पडदा उघडला....रंगमंचावरच्या व्यक्तींच्या आकृत्या दिसत होत्या. पाठच्या विंगेवर उगवता सूर्य आणि डोंगर होते, थर्मोकोलचे. ते सोनेरी प्रकाशात उजळले, दुसऱ्या कोपऱ्यातलं इंद्रधनुष्य अन् झेपावणारं फुलपाखरू (तेही थर्मोकोलचं) झळाळलं...अन् प्रेक्षागृहातून टाळी घुमली,

माझं निवेदन सुरू झालं. 'अर्घ्य उगवतीला' हे शब्द उच्चारताच स्टेजचा पाठचा पांढरा पडदा, शीर्षकाच्या रंगीत स्लाईडने उजळला. त्याच स्क्रीनला संगीताची एक उत्तेजक धून.. पुन्हा टाळ्या. स्टेजचा एक कोपरा प्रकाशला. तिथे उभ्या असलेल्या गायिकेने 'ओम् नमोजी आद्या' सुरू केलं....स्वागत-प्रास्ताविक संपलं आणि सत्कारसमारंभ सुरू झाला. स्टेजच्या मध्यभागी एक सुशोभित विजयमंच होता. दहावीचे गुणवंत विद्यार्थी आधी ठरवलेल्या खुर्च्यांमध्ये बसवले होते....मी म्हटलं, 'आपले गुणवंत विद्यार्थी आपल्यातच बसले आहेत....अहो लाईटवाले जरा शोधा ना....' (हे आमचं 'क्ल्यू' चं वाक्य होतं) त्याचक्षणी प्रेक्षागृहातले लाईट कमी झाले आणि रंगीत लाईटस्चे मोठे गोल, प्रेक्षागृहात फिरायला लागले. (रंगायतनच्या 'कॅट वॉक' वरचे हे 'मून लाईटस्' फारसे कुणी वापरत नाहीत.)....मी गुणवंत विद्यार्थ्याचं नाव घेतल्याबरोबर प्रकाशाचा गोल त्याच्यावर स्थिर व्हायचा. उत्तेजक धून सुरू व्हायची. नकळत टाळ्या तालावर वाजायला लागायच्या. तो मुलगा स्टेजवर येईपर्यंत प्रकाशगोल त्याचा पाठपुरावा करायचा....सत्काराचं सामान आणण्यासाठी सुद्धा आम्ही, संगीताचा वापर करायचो. पाठचा पडदा रंगाच्या उधळणीने भरून जायचा अन् त्यातूनच अवतरल्यासारख्या भारतीय नृत्याचे रंगीत पोशाख घातलेल्या मुली तबकं घेऊन सामोऱ्या यायच्या, अगदी एशियाडसारख्या. शाळेत नोटीस लावून, नृत्याच्या क्लासना जाणाऱ्या वीस-पंचवीस मुलींना एकत्र केलं होतं आम्ही. त्या उत्साहाने, नटूनथटून आल्या होत्या....वेगवेगळ्या गुणवंत विद्यार्थ्यांना आम्ही रंगमंचाच्या वेगवेगळ्या भागातून 'एंट्रीज' ठरवून दिल्या होत्या....संगीत-प्रकाशाच्या संतुलनाचे गमतीदार प्रयोग चालले होते... सगळं प्रेक्षागृह 'इलेक्ट्रीफाय' झालेलं मला जाणवत होतं.

तिनईकरांचं सुरेख भाषण झालं....वसंत लिमयेने त्याच्या गिर्यारोहणाच्या स्लाईडस् दाखवल्या. प्रमोद पवारने त्याच्या अस्खलित स्वगतांनी प्रेक्षागृह कवेत घेतलं....पद्मजा फेणाणी सुरेख गायली....संजीव खांडेकर, निखिल वागळे मुलाखतीतून बोलले. प्रवीण पाटकराने स्लाईडस् दाखवल्या. मंजिरी चुणेकरांना, विद्यार्थी प्रतिनिधींनी चटपटीत प्रश्न

विचारले. कुमार सोहोनीने तर 'मुंबईची लावणी' सादर केली. हे सारं आधी ठरलेलं. पण उत्स्फूर्त वाटावं इतक्या चांगल्या रीतीने योजलेलं.... या 'रंगारंग' कार्यक्रमात लाईटवाले सुरेश मगरकर काय काय गमतीजमती करून रंगत आणत होते.

कार्यक्रम संपत आला. माझं समारोपाचं निवेदन करून मी विंगेत आलो.... स्टेजवरून पसायदान सुरू होतं. आणि अचानक दुखणाऱ्या पायांची आठवण झाली, अंग मोडायला लागल्याचं जाणवलं. चिटणीस सर खांद्यावर थाप मारत म्हणाले, 'सुटलास ना....'

मी हसलो. बेडेकर विद्यामंदिर नावाच्या माझ्या शाळेचं ऋण अंशतः तरी मोकळं झालं होतं....अक्षरशः स्वप्नात पाहिलेला एका कार्यक्रम, आज संपन्न होत होता. मला दुखऱ्या पायाशिवाय काय मिळालं होतं. या धावपळीतून....निर्मितीच्या समाधानाशिवाय दुसरं काहीच नाही.... पण....कल्पना केलेल्या कार्यक्रमापेक्षा कार्यक्रम जास्त छान होता. कारण ती निर्मिती फक्त माझी नव्हती. राऊतसर, विजय जोशी, सुरेश मगरकर, आठवले, ढगे आणि आमच्या साऱ्या बॅंक स्टेजवाल्यांची होती. चिटणीस सर आणि इतर शिक्षकांची होती. आणि शेवटी प्रेक्षकांचीही होती....एखादा निर्मितीचा क्षण एका मनात रुजतो अन् अनेक मनात फुलतो तेव्हा त्याचा गोडवा म्हणूनच जास्त असतो.



१. नमन

त्या दिवशी शनिवार होता.... ९ नोव्हेंबर १९८५. माझ्या वॉर्डच्या जवळच आमचे क्वार्टर्स आहेत. क्वार्टर्स म्हणजे एक खोली. त्यामध्ये मी आणि माझा पार्टनर डॉ. महेश गोसावी राहतो. दुपारी काम संपवून रूममध्ये आलो तर महेश, आढ्याला नजर लावून कॉटवर पडला होता.... 'काय रे काय झालं....काही कळलं का?' मी विचारलं. त्याने नकारार्थी

प्लस– नॉन प्लस

मान हलवली. त्या दिवशी गायनॅकॉलॉजीच्या एम्. डी. च्या प्रॅक्टिकल परीक्षेचा शेवटचा दिवस होता. महेश याच परीक्षेला बसला होता.... या एम्.डी. किंवा एस.एम.च्या परीक्षांनंतर येणारं रिझल्टचं टेन्शन जरा विचित्रच असतं. म्हणजे सुख असो वा दुःख, कॉलेजच्या दिवसांसारखं उन्मळून भोगता येत नाही. स्वतःच्याच मॅच्युरिटीची कुंपणं पडलेली असतात. या टेन्शनची तऱ्हाच काही और असते. गेले चार महिने मी महेशला 'घासताना' पाहत होतो. कॉटच्या एका बाजूला पुस्तकांचा मोठा ढीग.... त्याने अभ्यास तर छान केला होता. त्याचं प्रॅक्टिकल ज्ञानही उत्तम. पण परीक्षाही नाटकातल्या प्रयोगासारखी असते. परीक्षार्थी असतो नटासारखा. नुसतं ठाऊक असून चालत नाही. उत्तम 'परफॉर्मन्स' द्यायला लागतो. मी त्याआधी सहा महिन्यांपूर्वीच या दिव्यातून यशस्वीपणे पार पडलेलो, म्हणून वडीलकीच्या शब्दांत त्याला धीर देत होतो. एवढ्यात अजून एक मित्र, मायक्रोबायोलॉजीचा लेक्चरर चंदू पाटणकर येऊन सामील झाला. महेशचं टेन्शन कमी करण्यासाठी मी आणि चंदू करता येतील तितके विनोद (क्वचित् आचरट देखील) करत होतो....पण त्याचं टेन्शन ते शेवटी त्याचंच. ते वाटून घेता येत नाही, येणार नव्हतं.

या आमच्या परीक्षांमध्ये ग्रेडस् असतात, गायनॅकच्या चार पेपरांमध्ये मिळून १० हेडिंग्ज, प्रॅक्टिकल्समध्ये ६ हेडिंग्ज. तर या सोळा हेडिंग्जमध्ये

कुठेही 'एफ' म्हणजे 'फेल' शेरा मिळून चालत नाही. तसं झालं तर तुम्ही सरळ नापास. 'जी' शेरा म्हणजे गुड! 'पी प्लस' म्हणजे सरासरी गुणवत्तेच्या जरा वर; 'पी' म्हणजे 'पास' आणि 'पी मायनस' म्हणजे सीमारेषेवर पास (किंवा नापास). जास्त 'पी मायनस' मिळूनही चालत नाही. महेशची परीक्षा चार तारखेला संपली तेव्हा तो पूर्ण पास असल्याचा त्याचा विश्वास, आणि परीक्षकांच्या भोवताली भुंग्याप्रमाणे फिरणाऱ्या सुपरवायझर्सची बातमी! पण सात तारखेला एक सुपरवायझर मला कँटीनमध्ये म्हणाला होता, की महेशला तीन 'पी मायनस' आहेत म्हणून. मग एका ज्येष्ठ मित्राने, एक 'गूढ' फोन करून 'आतली बातमी' आणली की महेशला दोन 'पी मायनस' आहेत; पण बहुधा अशा उलटसुलट बातम्या-अफवांमुळे महेश अगदी दोलायमान अवस्थेमध्ये....शिवाय त्या दुपारची ताजी बातमी म्हणजे, डॉ. चंद्रकला पास होणार म्हणजे तूही पास होणार. ती चौथ्यांदा परीक्षेला बसलेली. ती पास होणार अशी कॉलेजातली अफवा. म्हणजे, गायनॅक डिपार्टमेंटमध्ये हे सारं उघड बोललं जात होतं. कॅम्पसमध्ये सुद्धा. पण त्याला वास्तवाचा आधार असा काहीच नव्हता. 'तुला काय करायचंय इतरांच्या रिझल्टशी? तू पास झालास की झालं!' असं मी आणि चंदू, महेशला सांगत होतो. वेळ जाताजाता संध्याकाळ व्हायला आली.

सगळ्या पदव्युत्तर परीक्षांची एक प्रथा असते. प्रॅक्टिकल परीक्षेच्या शेवटच्या दिवशी निकाल निश्चित झाला की परीक्षक तो निकाल विद्यार्थ्यांना 'अनधिकृत अधिकृतपणे' सांगतात. हे अनेक वर्षे चालू होतं. विद्यार्थी तसे संख्येने थोडे असल्याने हे सांगणं सोपं असतं. काही परीक्षकांमध्ये तर 'रँक्स' सुद्धा अशाच घोषित केल्या जायच्या. (आता हे सारं बंद झालं आहे.)

पण महेश काही स्वतः जाऊन निकाल ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. गायनॅक डिपार्टमेंटच्या कॉरीडॉरमध्ये अनेक उत्सुक आणि ताणलेले चेहरे. उगीचच भाव खात, लगबग करणारे सुपरवायझर्स. कोपऱ्यामधल्या एका छोट्या खोलीमध्ये चारही परीक्षक विचारविनिमय करत होते. त्यांच्या विचारविनिमयाचे ध्वनी मधूनच बाहेर पोचायचे; पण

कितीही कान लांब केले तरी त्या अस्पष्ट आवाजातून अर्थबोध व्हायची शक्यताच नव्हती. शेवटी मुख्य परीक्षक डॉ. रावळनी एक कागद सुपरवायझरच्या हातात दिला. आणि पाचच मिनिटांनी, पडलेल्या चेहऱ्याचा जयंत कॅन्टीनमध्ये दाखल झाला....महेश नापास. त्याला प्रॅक्टिकलमध्ये 'चार पी मायनस' होते. म्हणजे कठीणच. सारंच गौडबंगाल होतं. प्रथम कळलं होतं की महेशला एक 'पी मायनस;' मग त्याचे झाले तीन 'पी मायनस'....आणि आता तर चार 'पी मायनस.' हे सारं फक्त प्रॅक्टिकलमध्येच. कडीच झाली होती. चक्रावून टाकणारी परिस्थिती होती.

जड पावलांनी रूमवर येऊन महेश कोसळला. आणि अक्षरशः लहान मुलासारखा रडायला लागला. रूमच्या वाटेवरच त्याचा चेहरा ताणला जायला लागला होता. वाटेत भेटलेल्या सुपरवायझरला त्यानं विचारलं, 'ग्रेडशीटमध्ये फेल झालेल्या विद्यार्थ्यांसमोर शेरा काय लिहिलाय?....' तो म्हणाला, 'एफ....ज्यांना एक 'पी मायनस' मिळालाय त्यांनाच पास करणार आहेत. बाकीच्या सर्व 'पी मायनस' उमेदवारांपुढे 'एफ' लिहिलंय.'

'तिच्यासमोरसुद्धा?'

'अर्थात. तिलाही चार 'पी मायनस' आहेत.'

महेशला सांभाळणं हे खरंच कठीण काम होतं. इंटर्नशिपमध्ये आम्ही, राज्य नाट्यस्पर्धेमध्ये मी लिहिलेलं एक नाटक केलं होतं, 'मयसभा' नावाचं. उत्कृष्ट प्रयोग होऊनही हे नाटक अंतिम फेरीत आलं नाही, तेव्हा त्यात काम करणारा महेश अगदी असाच फुटला होता. त्याला नाटकाबद्दल अतिशय तीव्रपणे, आतपासून वाटायचं. यावेळी त्याला अभ्यासाबद्दलही तसंच वाटलं होतं.... पण शेवटी अपयशच आलं. प्रयत्नांची शिकस्त केल्यावर येणाऱ्या अपयशाचा विखार विलक्षण असतो. शेवटी चंदू, महेशला स्वतःच्या घरी घेऊन गेला.

त्यानंतरची दिवाळी त्याच्यासाठी दुःखाचीच गेली. चीड आणि खंत यांचं एक विलक्षण मिश्रण त्याच्या स्वभावात जाणवत जायचं. नेहमीचं बडबडणं नाही. उगीचंच ओढून ताणून हसणं. मी 'सायकिॲट्रिस्ट'

म्हणून 'डिप्रेशन'चं निदान करावं अशी परिस्थिती होती. त्याने कँटीनमध्ये जाणंही बंद केलं. आमच्या रूमवर महाभारताचे दहा खंड आहेत माझ्याकडे. ते वाचण्याचा त्याचा सपाटा चालू होता....आता कळतं की ती वादळापूर्वीची शांतता होती.

आम्ही त्याला धीर देत होतो की अजून काही रिझल्ट अधिकृत लागलेला नाही. एकोणीस नोव्हेंबरला परीक्षकांची शेवटची बैठक युनिव्हर्सिटीत होणार होती. त्या दिवसापर्यंत वाट पाहणं भागच होतं. आम्ही सारेच वाट पाहत होतो. १९ नोव्हेंबरची मिटिंग झाली. आणि बातमी आली की महेशला थियरीमध्ये सहा 'पी मायनस' व प्रॅक्टिकलमधले चार; असे एकूण दहा 'पी मायनस' होते. त्यामुळे अर्थातच अपयशावर शिक्कामोर्तब. पण 'ती' मात्र उत्तीर्ण. परीक्षकांच्या विश्वासातल्या सुपरवायझरच्यामार्फत काढलेली बातमीसुद्धा तशीच; तीच. महेश मला म्हणाला, 'मी निश्चितच तिच्यापेक्षा चांगले पेपर लिहिले आहेत.'

महेशच्या घरीसुद्धा सगळीच निराशा. तो बहिणीचं लग्न ठरलं होतं त्या कामाला लागला. १९ तारखेला कळलेली बातमी तशी 'अनधिकृतच.' अजून विद्यापीठाने निकाल घोषित केलेला नव्हता. तोपर्यंत काहीच करता येत नव्हतं. बरं, एम्. डी. च्या निकालपत्रात तुमच्या ग्रेड्स् लिहिलेल्या नसतात. फक्त 'पास-नापास' एवढंच लिहिलेलं असतं. मग थियरीतल्या सहा 'पी मायनस' वर तरी विश्वास कसा ठेवावा?.... सगळ्याच हवेतल्या गोष्टी. काहीतरी गडबड आहे. अधिकृत रिझल्ट लागला की मी युनिव्हर्सिटीत जाणार.

तीस नोव्हेंबरला यशावकाश रिझल्ट लागला. आणि महेश माधव गोसावी रीतसर अनुत्तीर्ण झाला. आम्ही दोघांनी केलेले सारे गमतीदार बेत धुळीस मिळाले. आम्ही दक्षिण भारताची ट्रीप काढणार होतो. महापालिकेच्या स्पर्धेत नाटक करणार होतो. महेश मोटारसायकल शिकणार होता. आणि माझ्या पुढच्या 'स्पंदन'च्या दिवाळी अंकाच्या कामाला मला 'ड्रायव्हर' म्हणून पळापळीमध्ये मदत करणार होता. सगळ्या बेतांवर अधिकृत बोळा फिरवला गेला. आमचा सारा कंपू उदास झाला. 'पुढल्या वेळी झटून अभ्यास कर. फेल तर फेल. फक्त सहा महिन्यांनी

तर पुढची परीक्षा आहे.' असं नेहमीचं सांत्वनदेखील करून झालं. मी महेशवर 'मानसोपचार' करावे अशीसुद्धा कल्पना निघाली. डिसेंबरात आमच्या हॉस्पिटलचा हीरकमहोत्सवी कॉलेज-वीक होता. त्याच्या नाटकात काम केल्याने डिप्रेशन जाईल म्हणून आम्ही सारे महेशच्या पाठी लागलो. रत्नागिरीमध्ये प्रॅक्टिस करणारा आमचा मित्र डॉ. वसंत जोशी खास महेशला धीर देण्यासाठी, दोन दिवसांकरता मुंबईत येऊन गेला. मात्र आमच्या साऱ्यांचा होरा चुकला होता. महेश 'डिप्रेशन' मध्ये नव्हताच, भरपूर 'अॅग्रेशन' मध्येच होता. त्याच्या मनात असंतोष खदखदत होता. आणि काहीतरी केलं पाहिजे एवढंच नाही नक्की केलं पाहिजे, त्याच्याही योजना त्याच्या मनात तयार होत होत्या. पण तोंडात तीळ न भिजण्याबद्दलची अस्मादिकांची ख्याती लक्षात घेता तो छान 'डिप्रेशन'चा बुरखा घालून होता.

आणि तीन डिसेंबरचा दिवस उजाडला.

२ : सैरभैर दिवस

(महेशच्या शब्दांमध्ये)

तीन डिसेंबरच्या सकाळी मी आणि माझे वडील युनिव्हर्सिटीच्या आवारात शिरलो. पहिला थांबा होता, चौकशी खिडकी. तिथून रिव्हॅल्युएशन डिपार्टमेंटमध्ये गेलो. तिकडच्या क्लार्कने स्वच्छपणाने सांगितले की एम्. डी. च्या परीक्षेत रिइव्हॅल्युएशन होत नाही. मी म्हणालो की तसा नियम मला पाहायचा आहे. म्हणून मग सुपरिंटेंडंटकडे गेलो. तिथेही समाधानकारक उत्तर मिळेना. म्हणून मग विद्यापीठाच्या 'परीक्षा विभागात.' तिथे या संदर्भात सेक्शन २३७ [ए] पाहायला मिळेल ही आशा. बऱ्याच मिनतवाऱ्या करून आणि बऱ्याच खोल्या फिरून शेवटी हा नियम मिळाला. संपूर्ण नियम मी माझ्या हस्ताक्षरात बसून लिहून काढला. या नियमामध्ये कुठेही, एम्. डी. किंवा एम्.एस्. च्या परीक्षेला फेरतपासणी नाही असं लिहिलेलंच नाही. हे मलाच धक्कादायक होतं. आता काय करावं मला समजेना. शेवटी एकाने मला सुचवलं की

'ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी' ना भेट. म्हणून मी प्रा. अरुणाचलम् यांच्याकडे गेलो. ते म्हणाले की असा नियम नसला, तरी तसा प्रघात म्हणजे कन्व्हेन्शन आहे. ते म्हणाले, 'मला काही दिवसांनंतर भेट. मी फेरतपासणी शक्य आहे का ते पाहतो.' मी म्हटलं की माझा परीक्षा क्रमांक आणि कोड नंबर यामध्ये तफावत नाही ना, एवढं तर पाहा. अरुणाचलम् मला प्रामाणिक आणि सिन्सियर वाटले. तीन ते एकोणीस डिसेंबर मी विद्यापीठाचे उंबरे झिजवत होतो. दुसरा छंद काहीच नव्हता. सकाळचा 'टाइम्स ऑफ इंडिया' मी अथपासून इतिपर्यंत वाचत असे. यात डिसेंबरच्या पेपरात एका खटल्याची बातमी आली होती. विद्यापीठाच्या संदर्भातल्या एका खटल्याच्या बातमीत एक नाव होतं, ॲडव्होकेट थोरात. माझी टयूब पेटली की माझा एक मित्र अमर सरडे याच्या मावसभावाचं नावही ॲड. थोरात. तोपर्यंत कोर्टाच्या पायरीवर जायचे विचार मनात यायला लागले होते. मित्राला घेऊन थोरातांच्या घरी गेलो. थोरात राहातात, आमच्या केईएम् हॉस्पिटलच्या पाठी परेल व्हिलेजमध्ये. तिकडे गेल्यावर कळलं की पेपरातल्या बातमीमध्ये होते ते व्ही. ए. थोरात आणि यांचं नाव व्ही. एम्. थोरात. मी म्हटलं, ठीक आहे. थोरातांशी बोललो. तर त्यांनी बराच धीर दिला. अर्थात् मी तोवर फक्त फेरतपासणीपुरतंच बोलत होतो.

थोरात म्हणाले की तो नियम मला आणून दे. आणि जर कागदपत्र सीलबंद झाले नाहीत तर गहाळ होण्याची किंवा त्यात पुन्हा फेरफार होण्याची शक्यता आहे.

जस्टीस भरुचांनी अर्ज अभ्यासला. तीस जानेवारीला सुनावणीला ठेवला. पण सीलिंग ऑर्डर दिली. आणि अर्धं ओझं उतरलं. जरी सीलिंग ऑर्डर मिळाली असली तरी ती लिखित स्वरूपात हाती पडायला बराच वेळ आणि प्रत्येक टेबलावरचं 'वजन' लागत असतं. आणि कोणत्याही परिस्थितीत युनिव्हर्सिटीचं कार्यालय बंद होण्याआधी तिथं पोहोचायचं होतं. पाच वाजून दहा मिनिटांनी महेश आणि थोरात अक्षरशः धावत हायकोर्टातून युनिव्हर्सिटीत शिरले प्रथम राजर्षी भेटले. ते म्हणाले, 'आता ऑफिस बंद होतंय. उद्या या.' पण महेश आणि थोरात तसेच

अरुणाचलम्च्या ऑफिसात गेले. अरुणाचलम्समोर पेपर सील झाले आणि ते महेशला म्हणाले, 'यंग बॉय, तू खूप घाई केलीस....मी इन्व्हिस्टिगेट करतच होतो.' पाच वाजून अठरा मिनिटांनी अरुणाचलम् यांच्या कार्यालयात पोहोचल्याचं सार्थक झालं. बारा मिनिटे उशीर झाला असता आणि विद्यापीठ बंद झालं असतं तर कदाचित दुसऱ्या दिवशीपर्यंत त्या कागदपत्रांचं काय झालं असतं कुणास ठाऊक!

ऑफिसमधून बाहेर पडताना अरुणाचलम महेशला म्हणाले, 'या केसमुळे तीन गोष्टी घडतील. एक तर विद्यापीठाच्या नावाला काळिमा लागेल. दुसरं, काही विद्यार्थ्यांना पुन्हा अनुत्तीर्ण केलं जाईल आणि तिसरं, यू मे बी व्हिक्टिमाइज्ड इन फ्यूचर.'

महेश फक्त हसला. एव्हाना या बाबतीतली मानसिक तयारीही झाली होतीच.

१९ डिसेंबरला मी अरुणाचलम्ना 'कोड नंबर' तरी ताडून पाहण्याचा अर्ज सादर केला. त्यांनी माझ्यासमोरच आमच्या निकालाचे कागदपत्र मागवले. मला तीन गोष्टींबद्दल उत्सुकता होती. एक तर माझा कोड नंबर, नंतर माझे थियरीमधले ग्रेडस् आणि तिसरी गोष्ट (जी मी आजपर्यंत माझ्या मनात ठेवली होती) म्हणजे तिच्या निकालासमोर आता काय लिहिलंय?

अरुणाचलम म्हणाले, "प्रॅक्टिकलमध्ये तुला चार 'पी मायनस' आणि थियरीमध्ये काही 'पी मायनस' मिळाले आहेत. माझी नजर ग्रेडशिटवरून फिरताफिरता एके ठिकाणी स्थिरावली. 'तिच्या' नंबरापुढे प्रथम लिहिलं होतं 'F' आणि मग त्याला एक अर्धचंद्र जोडून त्याचा केला होता 'P'...ती सारी मोठी खोली, मोठं टेबल, उजव्या बाजूचं झेरॉक्स मशीन, डाव्या बाजूचे लॉकर्स, खुर्चीपाठचे टेलिफोन्स....सारं माझ्याभोवती गरगर फिरायला लागलं. एअरकंडीशनचा एकसुरी आवाज कानात घुमायला लागला....समोरच्या काचेतलं माझ्या चेहऱ्याचं प्रतिबिंब वेगळंच दिसू लागलं....काचेवरची माझी बोटं घामाने ओली झाली.

मी त्या खोलीतून बाहेर पडलो तेव्हा माझ्या डोक्यात एक वादळ भिरभिरायला लागलं होतं. हे कसं घडलं याचा छडा लावायचा ठरवला.

जर मला प्रयत्नांनंतरही अपयश येतं आणि दुसऱ्या एखाद्या व्यक्तीवर सहजच मेहरनजर केली जाते यामध्ये दडलंय तरी काय?....आमच्या व्यवसायातील दांभिक राजनीती परीक्षेच्या निमित्ताने मी जवळून पाहिली होती. हुशार पण वजन नसलेल्या विद्यार्थ्यांच्या आयुष्यांची होरपळ मला जाणवली होती. अन्यायाविरुद्ध आवाज न उठवता, आत्महत्येचे दरवाजे ठोठावणाऱ्या शोकांतिकांचा मी साक्षीदार होतो. मनाशी निश्चय केला की हीच संधी आहे. दबून चालणार नाही.

मी आता थोडी गुप्तहेरगिरी करायची ठरवली. 'ती' सुद्धा केईएम-मध्येच. माझ्यासारखी, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मेडिकल ऑफिसर....तिची चांगली ओळख असलेल्या काही सहकाऱ्यांमध्ये मी घुसलो, आणि तिथे मला, माझा 'डीप थ्रोट' मिळाला. त्याने सांगितलेली गोष्ट विलक्षणच होती. मला असं कळलं की, जे घडलं ते सरळ-सोपं घडलेलं नाही. त्यामागे शक्तिमान व सत्ताधारी हात आहेत. 'ऑल दि प्रेसिडेंटस् मेन' या प्रसिद्ध पुस्तकातल्या वार्ताहर दुक्कलीला मदत करणाऱ्या अनामिक रहस्यमय व्यक्तीचं त्यांनी नाव ठेवलं होतं 'डीप-थ्रोट.' मीही माझ्या व्यक्तीचं गुप्त नाव तेच ठेवलं.

माझ्याबरोबर परीक्षेला बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या होती ५१. त्यातले पास झाले ३२. मात्र ज्या दिवशी चारही परीक्षकांनी मिळून एकत्र रिझल्ट लावला तेव्हा पास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या होती २३. म्हणजेच चारही परीक्षकांनी लावलेला निकाल व अंतिम निकाल यात तफावत होती. आणि या दोन घटनांच्या मध्ये डॉ. रावळ या परीक्षकांशिवाय दुसऱ्या कुणालाही हा निकाल बदलायची संधी मिळाली नव्हती. कारण निकाल 'मॉडरेट' करण्याचा निर्णय घ्यायला डॉ. रावळ एकटेच विद्यापीठात गेले होते, हे मला कळायला वेळ लागला नाही.

'डीप-थ्रोट' मला हळूच इकडे तिकडे पाहत म्हणाला, "यार महेश, चंद्रकलाने पहले वो पी. के. को कहा....फिर पी. के. ने रावळ को जाके बोला के चंदाको पास कर. पण रावळ म्हणाले की तसं आश्वासन मला खुद्द सी. एम. कडून मिळू दे, आणि तसा फोन आला सुद्धा. मग अर्थातच रावळसाहेब दबले....आणि तिला पास करायचं तर तिच्यापर्यंतच्या

सगळ्यांना नको पास करायला....मग झालं 'मॉडरेशन' अन् काय!'' तो हसला आणि म्हणाला, 'हे सांगू नकोस हं कुणाला....नायतर माझी गोची व्हायची.' यानंतर अनेकांनी याला दुजोरा दिला.

ही वातमी आणि अरुणाचलम्च्या ऑफिसात पाहिलेला F चा P या दोन्ही गोष्टींची लिंक लागली आणि निर्णय घेतला की लढायचं. खरं तर मी काही स्वत:ला फार तत्त्वाचा वगैरे माणूस म्हणवून घेणार नाही. मी व्यवहारी आहे. मी तडजोडही करतो वेळप्रसंगी. पण ही झुंज काही तरी वेगळीच होती. मी 'डीप थ्रोट' ला अर्थातच बोललो नाही, 'F-P' बद्दल. पण आता मला टेन्शन यायला लागलं होतं. मी यात पडलो तर खोल खोल जाणार हे दिसत होतं....कुठेतरी या प्रश्नासाठी लढावं असंही वाटत होतं. मी मध्यमवर्गीय कुटुंबातला एकुलता एक मुलगा; रस्ता क्रॉस करताना चारदा इकडे तिकडे पाहणारा....उडी फार मोठी असणार होती. सांगावं तरी कुणाला. पंच्याऐंशी सालचा ३१ डिसेंबर आला. तो चहा पिऊन साजरा केला. घरीच होतो. बरोबर बारा वाजता आनंदचा फोन आला....त्याने नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. त्या वरकरणी हसत स्वीकारल्या. टेन्शनची वाढती कमान होती, सहा जानेवारी १९८६ पर्यन्त. अजून युनिव्हर्सिटीकडून काहीही प्रतिसाद नव्हता. मी विजय थोरातांचा प्रामाणिकपणा पडताळला. या प्रकरणाला कोणताही राजकीय रंग येऊ नये असं मला वाटलं. म्हणाल तर ही लक्ष्मणच्या 'सामान्य माणसां'ची लढाई होती, आणि मला ती तशीच हवी होती. तेव्हा अशी केस घेणारा वकीलही दडपणांना न दवणारा हवा. शेवटी ७ जानेवारीला मी मला कळलेली सर्व माहिती थोरातांना सांगितली.

आणि मग विचारलं, 'आर यू स्टील रेडी?'

'यस!' ताडकन् उत्तर आलं.

अजूनपर्यंत घरच्यांनाही काही ठाऊक नव्हतं. आमच्या क्वार्टर्सच्या वर पहिल्या मजल्यावर राहणारा बाराबीतला उदय बापट, जयंत आणि आनंद यांनाच या भानगडीची खबर. उदय ताडकन् म्हणाला, 'साला, जाऊयाच कोर्टात!'

कोर्टात जायचं हे तर ठरलं. आणि मग घरी जाऊन घरच्यांशी

बोललो. आई आणि बहिणीला चेहऱ्यावरची काळजी लपवता आली नाही. वडील गंभीर पण खंबीर वाटले, आणि आजोबा म्हणाले, 'फाईट, वुई आर वुईथ यू!'

आणि लढाईला तोंड फुटलं!

३ : जमवाजमव

महेशच्या आणि थोरातांच्या बैठकी झडू लागल्या आणि 'रीट अर्ज' आकार घ्यायला लागला. मूळ प्रश्न होता, सीएमचं नाव या अर्जात समाविष्ट करावं की न करावं. आम्ही दोघांनी एक रात्र या विषयावर चर्चा करण्यात घालवली....करावं की न करावं. सत्य नुसतं ठाऊक असून चालत नाही. ते सिद्धही करून दाखवावं लागतं. या साऱ्या रीट अर्जात सी. एम. वरचे जेमतेम दोन परिच्छेद आहेत. पण ते असणं वा नसणं यामुळे केसचा सारा नूरच बदलत होता. हे सारं चालू असताना हॉस्पिटलमधला एक ओळखीचा डॉक्टर महेशला म्हणाला, 'रिझल्टके बारेमें क्या गडबड कर रहा है?....युनिव्हर्सिटीमें गया था नं?' महेश चमकला. पण हेही उमजला की युनिव्हर्सिटीत चक्रं हलायला लागली आहेत. थोडी चौकशी केल्यावर कळलं की अरुणाचलम्‌नी रावळांना बोलावून घेतलं होतं. त्यांच्याकडून खुलासाही मागवला होता.

त्याच सुमारास पास झालेल्या ए. एम. ओ. (ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मेडीकल ऑफिसर्स) मंडळींनी आपल्या सर्व सहकाऱ्यांना एक पार्टी दिली. महेशही या पार्टीला होता. चंद्रकला तर होतीच. महेश रात्री रूमवर आला आणि म्हणाला, 'त्यांना काय कुणकुण लागलीय का काय कोण जाणे!'

मी म्हटलं, 'का बरं?'

'मी डीप-थ्रोटला काहीच सांगितलं नाही. कोर्टाचं. पण तो सांगत होता की म्हणे डॉ. रावळ म्हणत होते की मी जो रिझल्ट लावलाय तो बरोबरच आहे, आणि 'डीप थ्रोट' च्या म्हणण्याप्रमाणे ते असंही म्हणाले की जो कुणी हे प्रकरण उकरायला पाहतोय तोही परीक्षेला बसणार आहे

पुरत....ही गर्भित धमकी की....'

'की डीप–थ्रोटची शेंडी....'

'नाही. त्याने सांगितलेलं सगळं खरं आहे.' महेश.

'कशावरून?' मी.

'पाहशीलच....'

दहा जानेवारीपर्यंत रीट अर्ज तयार झाला. अकरा तारखेला एका वर्कशॉपबद्दलची प्रेस–नोट द्यायला मी 'इंडियन एक्सप्रेस'च्या ऑफिसात गेलो. तिथे त्यांचा रिपोर्टर अभय मोकाशी भेटला. अभय, जुना मित्र आणि बातमी म्हटलं की बेभान होणारा. म्हणाला, 'काय, नवीन काय केईएममध्ये?'

मी हसू लपवत म्हटलं, 'आहे एक धमाल.'

'कुठली, डावळे प्रकरणाची का?'

आता उडायची पाळी माझी होती. पण त्याचबरोबर हा दिलासाही होता की दुसरी व्यक्ती, स्वतंत्र तपासणीनंतर त्याच निष्कर्षाला पोहोचली होती. १२ जानेवारीच्या 'इंडियन एक्सप्रेस' ला बातमी आली. मी ताबडतोब महेशला फोन केला....शत्रू सावध तर झाला नाही ना? आता घाई करणं भाग होतं. कागदपत्रांची 'उलाढाल' होण्याआधी ती सील करायला हवी होती.

जस्टीस भरूचांच्या कोर्टामध्ये रीट अर्ज दाखल करून घेण्यासाठी आला तेव्हा त्यांनी सुनावणीसाठी तारीख मुक्रर केली. पण ॲड. थोरात म्हणाले, 'या संदर्भातल्या उत्तरपत्रिका ताबडतोब सीलबंद व्हायला हव्यात....(Refer page No. 32)

आणि सतरा जानेवारीला पहिल्यांदा सर्व वृत्तपत्रांना तोंड फुटलं....

• डॉ. डावळेप्रकरणी उच्च न्यायालयाचा आदेश :
एम. डी. परीक्षेचे कागदपत्र सादर करा (महाराष्ट्र टाइम्स)

• आपली मुलगी उत्तीर्ण होण्यासाठी मुख्यमंत्र्यांचा दबाव (लोकसत्ता)

• कन्येस उत्तीर्ण करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी दबाव आणला (मुंबई सकाळ)

२० जानेवारीच्या 'लोकसत्ता'मध्ये एका विद्यार्थिनीने एक बोलकं पत्र लिहिलं. 'या जगात ज्याच्याकडे सत्ता आणि पैसा आहे असे हे लोक सत्तेच्या जोरावर वाटेल ते करू शकतात. मग माझ्यासारखे विद्यार्थी वर्षभर अभ्यास करून परीक्षा देतात, त्याचा फायदा काय?'

गंमत अशी की या पत्रावर ३१ जानेवारीला अजून एक पत्र आलं. 'अशी कच खाल्ली तर दिवसेंदिवस सत्ताधारी मुजोर बनून हुकुमशाही वाढेल व त्याला जबाबदार आपणच असू.' असं पत्रलेखक म्हणतो.

जनमानसामध्ये वादळं उठायला सुरुवात झाली होती. आता कच खाऊन भागणार नव्हतं.

४ : कॉक अन्ड बुल स्टोरी

जस्टीस भरूचांचं कोर्ट हायकोर्टामध्ये पहिल्या मजल्यावर रस्त्यालगत होतं. ज्याप्रमाणे बाहेरच्या रस्त्यावरच्या सिग्नलचे दिवे हिरवे–तांबडे व्हायचे त्या प्रमाणात बाहेरचा गोंगाट कमीजास्त प्रमाणात आत यायचा. भरुचांचा चेहरा एका शब्दात वर्णन करायचा तर, धारदार आणि तीक्ष्ण शब्दोच्चारांच्या लयकारीचा कणन्‌कण टिपणारी कुशाग्रता....कोर्टात गर्दी बरीच.

पहिल्यांदा ॲड. विजय थोरात बोलले. मग युनिव्हर्सिटीचे वकील श्री. राधाकृष्णन् उभे राहिले. युनिव्हर्सिटीचं प्रतिज्ञापत्र विलक्षण धक्कादायक आहे असं जस्टीस भरुचा म्हणाले. अर्जदाराने त्याच्या अर्जात केलेले आरोप प्रथमदर्शनी विचित्र वाटले तरीही विद्यापीठाच्या प्रतिज्ञापत्रामुळं त्याला पुष्टी मिळाली आहे असा शेरा त्यांनी मारला. विद्यापीठाच्या प्रतिज्ञा-पत्रानुसार एकूण बारा विद्यार्थ्यांचे निकाल बदलले गेले होते. त्यामध्ये चंद्रकला पाटील व स्मिता ठक्कर या दोन विद्यार्थिनींचा समावेश होता. काही ठिकाणी 'P' च्या पुढे वेगळ्या शाईत '+' ही खूण; तर काही ठिकाणी P' नंतरची '–' ही खूण खोडलेली. हे सारं करण्यासाठी इतर सर्व परीक्षकांनी आपल्याला परवानगी दिली आहे व आपण जे केलं ते नियमानुसारच केलं असं विद्यापीठाला कळवणारं डॉ. रावळ यांचं पत्रही

सादर करण्यात आलं. तर असा कोणताही हक्क आपण त्यांना दिलेला नसल्याचं पत्र, दुसरे परीक्षक डॉ. मुखर्जी यांनी विद्यापीठाला पाठवलं होतं. तेही कोर्टापुढं आलं. सी. एम. व चंद्रकला यांनीही इन्काराची प्रतिज्ञापत्रं सादर केली होती. डॉ. रावळ यांनी कोर्टापुढे, दिनांक २० जानेवारी व ३० जानेवारीला दोन वेगवेगळी प्रतिज्ञापत्रे सादर केली होती. पहिल्या प्रतिज्ञापत्रात त्यांनी आपल्यावरच्या आरोपांचा इन्कार केला; पण १९ नोव्हेंबरला विद्यापीठात त्यांनी केलेल्या निकालाच्या 'मॉडरेशन 'चा उल्लेखही केला नाही. चारही परीक्षकांनी तयार केलेल्या निकालात मी काहीच फेरफार केलेला नाही असंही ते म्हणतात. एवढेच नाही तर सर्व ग्रेडस् या चारही परीक्षकांनी एकमताने दिल्याचे ते म्हणतात. तीन जानेवारीला झालेल्या श्री. अरुणाचलम् यांचेबरोबरच्या भेटीचा उल्लेखही त्यात नाही. किती 'P' पर्यंत हेतूपूर्वक सवलत देण्यात आलेली आहे, याबद्दलही ते मौन पाळून होते. एवढंच नाही तर फेर-तपासणीचा हक्कच अर्जदाराला, म्हणजे डॉ. गोसावींना नाही असं ते म्हणतात.

दुसरं प्रतिज्ञापत्र मुख्यत्वेकरून विद्यापीठाच्या प्रतिज्ञापत्राला उत्तर देण्यासाठी होतं. पहिल्या व दुसऱ्या प्रतिज्ञापत्रात जमीन–अस्मानाचा फरक होता. या दुसऱ्या प्रतिज्ञापत्रात फरक होता. या दुसऱ्या प्रतिज्ञापत्रात त्यांनी कबूल केलं की ते मुख्य परीक्षक म्हणून त्यांना कायदेशीरपणे निकालात फेरफार करण्याचे हक्क होते. विद्यापीठाने त्यांना दिलेल्या नियमावलीनुसार ते वागले होते असा उल्लेख त्यात आहे. महेशच्या म्हणण्यानुसार अशी नियमावली मुळी अस्तित्वातच नाही. डॉ. मुखर्जींची परवानगी आपल्याला होती म्हणूनच आपण एकट्याने निकालात फेरफार केले असं ते म्हणतात. मात्र दोन्ही प्रतिज्ञापत्रात अर्जदाराचा अर्ज फेटाळून लावण्याची मागणी त्यांनी केली. खरं तर त्यांच्यासारख्या ज्येष्ठ डॉक्टरांकडून या प्रकरणाची संपूर्ण चौकशी होण्याची मागणी यायला हवी होती.

न्यायमूर्तींनी रावळांचे वकील ॲड. सतीश शहा यांना विचारलं, 'कोड नं. ३१५ ला (चंद्रकला) नक्की किती 'P –'?'

'चार, मिलॉर्ड.' शहा म्हणाले.

'मिलॉर्ड, खरं तर सात आहेत; पण तीन 'P –' चे 'P +' केले आहेत, एक रेघ ॲड करून.' मध्येच ॲड. राधाकृष्णन म्हणाले.

'आय डू नॉट आस्क क्वेश्चन्स अनलेस आय नो द आन्सर्स.' न्यायमूर्ती म्हणाले. त्यांनी ॲड. शहांना विचारलं, 'व्हॉट इज युवर सबमिशन ?'

'हा अर्ज फेटाळून लावावा अशी माझी विनंती आहे,' असे प्रतिपादन करताना ॲड. शहा बोलून गेले की, या अर्जात काही अर्थ नाही, कारण 'इट इज कॉक ॲंड बुल स्टोरी.'

'मि. शहा, डोन्ट यूज सच लँग्वेज इन माय कोर्ट.' न्यायमूर्ती गरजले, 'इफ धिस इज अ कॉक ॲंड बुल स्टोरी देन आय ॲम इम्प्रेसड बाय इट.'

मी आणि महेशने हळूच एकमेकांना टाळी दिली.

सी. एम. च्या बाजूने ॲडव्होकेट जनरल होते. ते म्हणाले की, सत्ताधाऱ्यांची नावे यात गुंतवून उगीचच सनसनाटी निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे, तेव्हा प्रतिवादी म्हणून मुख्यमंत्र्यांचं नाव वगळावं. त्यांनी बराच वाद घातला. पण न्यायमूर्ती म्हणाले, की या परीक्षेत बरेच घोळ झाले आहेत. त्यातला प्रमुख फायदा मुख्यमंत्र्यांच्या मुलीचा झाला आहे. आणि डॉ. रावळ यांचं वर्तन प्रथमदर्शनी संशयास्पद आहे. तेव्हा मुख्यमंत्र्यांचं नाव वगळता येणार नाही. तरीसुद्धा ॲड. जनरल बोलतच राहिले. तेव्हा न्यायमूर्ती म्हणाले, 'आय कॅनॉट स्टॉप यू फ्रॉम टॉकिंग' आणि चक्क खुर्ची मागे सरकवून ते रेलून बसले व त्यांनी समोरचे दुसरे कुठलेतरी कागद उचलले. मी आणि महेश ॲडव्होकेट जनरल काय म्हणतात ते ऐकत होतो. मध्येच न्यायमूर्ती म्हणाले, 'दॅट वुई वुईल सी ॲट द फायनल हिअरिंग....' आणि महेश आनंदाने फटकन खाली बसला. आता झालाच दाखल म्हणायचा अर्ज.

नंतर चंद्रकलासाठी ॲड. गुरुसहानी बोलले. ते म्हणाले की चंद्रकलाला नापास घोषित केली तरी चालेल. ती पुन्हा परीक्षा देईल. पण मुख्यमंत्र्यांचं नाव मात्र काढा.

ग्रामीण शैक्षण संशोधन संस्थेचे ग्रंथालय ठाणे

यावर न्यायमूर्तींचा शेरा, 'मि. ॲडव्होकेट जनरल हॅज ऑलरेडी टॉक अबाऊट हिम. यू प्लीज टॉक फॉर युवर क्लायंट.'

चंद्रकलाच्या वकिलांनी असंही म्हटलं की या प्रकरणाची चौकशी विद्यापीठात करावी, कोर्टाने करू नये.

न्यायमूर्ती म्हणाले, 'धिस मॅटर विल बी इन्व्हेस्टीगेटेड बाय कोर्ट. इट कॅनॉट बी लेफ्ट टू द युनिव्हर्सिटी.'

आणि अर्ज दाखल झाला.

'कॉक ॲण्ड बुल स्टोरी' आता सत्यात अवतरत होती. आम्ही भरुचांच्या कोर्टातून बाहेर पडलो. कोर्टातले पट्टेवाले वगैरे लगेच 'टीप' मागायला धावत येतात. त्यांना खूष करत कोर्टाच्या कॅन्टीनमध्ये आलो. तिथे सदा उकळत्या चहाचे कप घशात घालताना थोरात म्हणाले की, 'आपल्या केसची सुनावणी करणार आहेत, न्यायमूर्ती पेंडसे....'

मी म्हटलं, 'कसे आहेत ते?....'

थोरातांनी माझ्याकडे कींवभरल्या नजरेने पाहिलं....हा प्रश्न विचारणं म्हणजे शनिवारवाड्यात जाऊन रामशास्त्री कोण ते विचारण्यासारखं आहे हे नंतर मला कोर्टातल्या इतरांशी बोलताना कळलं.

पेंडसेंच्या कोर्टात प्रकरण संपूर्ण सुनावणीला येईपर्यंत अजून बरंच काही होणार होतं.

५ : भर वेगातल्या घटनांची चिकटवही

● चंद्रकला डावळे गुणवाढप्रकरणी सुनावणी तहकूब

(आमच्या प्रतिनिधीकडून)

मुंबई, सोमवार : मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी मुंबई विद्यापीठ आणि त्यांच्या मुख्य परीक्षकांवर दबाव आणून आपली कन्या डॉ. (श्रीमती) चंद्रकला डावळे यांना एम. डी. परीक्षेत उत्तीर्ण करविले या आरोपावरून करण्यात आलेल्या फिर्यादीची सुनावणी आज, येत्या ४ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आली.

(लोकसत्ता, २५ फेब्रुवारी)

• परीक्षा प्रकरणाच्या चौकशीवर विद्यापीठाचा हक्क

(आमच्या प्रतिनिधीकडून)

मुंबई, फेब्रुवारी २७ : डॉ. चंद्रकला पाटील व इतर बारा एम. डी. परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या प्रकरणाने एक नवीन विचित्र वळण घेतले आहे. मुंबई विद्यापीठाच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलने असा निर्णय घेतला आहे की, एम. डी. परीक्षा प्रकरणाची चौकशी, मुंबई विद्यापीठ कायद्यानुसार करण्याची विनंती, मुंबई उच्च न्यायालयाला करण्यात यावी. न्यायमूर्ती भरुचांनी फिर्याद अर्ज दाखल करताना, 'प्रकरणाची छाननी विद्यापीठाला करू देणार नाही' असे म्हटले होते. त्यावेळेपासूनच विद्यापीठ प्रशासनावर या प्रकरणाची चौकशी पुन्हा विद्यापीठाकडे घेण्याबद्दल जबरदस्त दडपण येत असल्याचे कळते.

(टाइम्स ऑफ इंडिया, २८ फेब्रुवारी)

• परीक्षाप्रकरणी मुख्यमंत्री अपिलात

मुंबई, फेब्रुवारी २८–मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. एस. पी. भरुचा यांनी डॉ. महेश गोसावी यांनी दाखल केलेल्या अर्जावर, अर्ज दाखल करून घेताना जी आज्ञा दिली त्याविरुद्धचे अपील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव पाटील–निलंगेकर यांनी आज दाखल केले. हंगामी मुख्य न्यायाधीश श्री. कानिया यांनी या प्रकरणाच्या सुनावणीसाठी, न्यायमूर्ती धर्माधिकारी व न्यायमूर्ती पुराणिक यांच्या खंडपीठाची नियुक्ती केली आहे. आपल्या अपिलात मुख्यमंत्री म्हणतात की, अर्जदाराने (डॉ. गोसावींनी) त्यांच्या प्रतिज्ञापत्रात केलेली विधाने चुकीच्या माहितीवर आधारलेली व संपूर्णपणे बिनबुड ची आहेत. आणि त्या संदर्भातल्या कोणत्याही मुद्दाबाबत मुख्यमंत्र्यांबद्दल आदेश देता येणार नाही. ते पुढे म्हणतात की, या खटल्यासंदर्भातले त्यांचे प्रतिज्ञापत्र त्यांनी या आधीच न्यायालयाला सादर केले असून त्यात आपला या प्रकरणाशी काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे.

• विद्यापीठाकडून मुख्यमंत्र्यांच्या वकिलाकडे विचारणा

मुंबई, फेब्रुवारी २८ : विद्यापीठाच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलने काल असा निर्णय घेतला की, एम. डी. परीक्षाप्रकरणी विद्यापीठाचे वकील

बदलण्याच्या संदर्भात ॲडव्होकेट जनरलांचा सल्ला घेण्यात यावा. यामुळे एक विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण या खटल्यातले एक प्रतिवादी मुख्यमंत्री शिवाजीराव निलंगेकर असून त्यांचं वकीलपत्र ॲडव्होकेट जनरल श्री. अरविंद सावंत यांनीच घेतलं आहे.

ॲडव्होकेट जनरलनी तावडतोब दुसऱ्या वकिलांचं नाव सुचवलं आहे. या खटल्यात विद्यापीठाकडून काम करत असलेले ॲड. राधाकृष्णन यांनी कौन्सिलचा निर्णय समजताच स्वत:हूनच राजीनामा दिला आहे.

(टाइम्स ऑफ इंडिया, १–३–८६)

● एक्झॅम ग्रेड ऑफ सीएम्स डॉटर अनचॅलेंज्ड

(बाय अ स्टाफ रिपोर्टर)

मुंबई, फेब्रुवारी २७ : ऑक्टोबर-नोव्हेंबर १९८५ मध्ये झालेल्या स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र शाखेच्या एम. डी. परीक्षेच्या दोन बहिर्गत (एक्सटर्नल) परीक्षकांनी इन्कार केला आहे की गुणपत्रिकेतील ज्या फेरफारामुळे मुख्यमंत्र्यांची कन्या पास केली ते फेरफार करण्यास, त्यांची मान्यता नव्हती.

सांगलीचे डॉ. एस. टी. वाटवे व मद्रासच्या डॉ. ए. नाफीसाबिबी यांनी विद्यापीठाला असं कळवलं आहे की, परीक्षेच्या निकालामध्ये कोणतेही फेरफार करण्याची परवानगी त्यांनी डॉ. रावळ यांना दिली नव्हती.

आज श्री. अरुणाचलम यांनी आपलं दुसरं प्रतिज्ञापत्र न्यायालयास सादर केलं. त्यांच्या म्हणण्यानुसार डॉ. रावळ हे फक्त मुख्य परीक्षक व परीक्षेचे संयोजक होते. (सिनीयर एक्झॅमिनर ॲन्ड को-ऑर्डिनेटर). आणि इतर परीक्षकांपेक्षा दुसरे कोणतेही हक्क त्यांना नव्हते.

'मॉडरेशन डझ् नॉट मीन चेंज ऑफ मार्कस् ऑर ग्रेडस् ॲन्ड रिझल्टस् बाय ए सिनीयर एक्झॅमिनर इन द इव्हेंट ही इज ए मॉडरेट' अरुणाचलम् प्रतिज्ञापत्रात म्हणतात.

३ जानेवारी १९८६ ला डॉ. रावळ यांनी श्री. अरुणाचलम् यांच्यासमोर सांगितलं होतं की गुणपत्रिकेतील फेरफार त्यांनीच (डॉ. रावळ यांनी) केले. कारण तसं करण्याचा त्यांना हक्क आहे. ही गोष्टही आपल्या प्रतिज्ञापत्रात श्री. अरुणाचलम यांनी पुन्हा स्पष्ट केली आहे.

डॉ. रावळनी श्री. अरुणाचलम यांना असंही सांगितलं होतं की, निकालात फेरफार करण्यासाठी दोनही बहिर्गत परीक्षकांनी त्यांना परवानगी दिली होती. (टाइम्स ऑफ इंडिया, २७–२–८६)

● कुलगुरू माधवराव गोरे यांचा राजीनामा

(रविवारची लोकसत्ता, २–३–८६)

● मार्कस् स्कँडल गेटस् मर्कीअर

मुंबई,मार्च १ : प्रस्तुत प्रतिनिधीला कुलगुरू गोरे यांच्याशी थेट संपर्क साधता आला नाही. तरीही खात्रीलायक गोटातून असं कळतं की, श्री. गोरे यांचा राजीनामा, मुख्यमंत्र्यांच्या मुलीच्या खटल्यात ज्या तऱ्हेने सरकारी दडपण आणण्यात येत आहे, त्याच्या निषेधार्थ आहे.

गेल्या आठवड्यात विद्यापीठाचे रजिस्ट्रार श्री. जी. एम. राजर्षी यांना राज्यपाल कोना प्रभाकर राव यांनी राजभवनामध्ये मार्कप्रकरणासंबंधी चर्चा करण्यास बोलावले. असे सांगण्यात येते की, खरे तर श्री. अरुणाचलम किंवा खुद्द कुलगुरू गोरे यांना सल्लामसलतीसाठी बोलावणे योग्य ठरले असते; परंतु काही अनाकलनीय कारणामुळे राजर्षींनाच बोलावण्यात आले. (सन्डे ऑब्झर्व्हर, २–३–८६)

● निलंगेकर रशेस टू डेल्ही—

मुंबई, मार्च २ : आज सकाळी मुख्यमंत्री अचानक दिल्लीला रवाना झाले. पक्षश्रेष्ठींनी त्यांना बोलावून घेतले की ते स्वतःहून गेले हे कळू शकले नाही. मार्कप्रकरणामुळे पक्षश्रेष्ठी मुख्यमंत्र्यांना मंत्रिमंडळाच्या वाढीसाठी परवानगी देत नाहीत असे कळते. नजिकच्या भविष्यकाळात श्री. निलंगेकर, निलंग्याच्या त्यांच्या मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. या मुद्यावरही दिल्लीत विचारविनिमय अपेक्षित आहे.

(टाइम्स ऑफ इंडिया, ३–३–८६)

● मार्कप्रकरणी विद्यापीठाची अभूतपूर्व कोंडी

(अल्वीन फर्नांडिस व सुनील नरुला यांजकडून.)

मुंबई, मार्च २ : असे कळते की दिनांक २१ फेब्रुवारी रोजी श्री. राजर्षी जेव्हा राज्यपालांना भेटावयास गेले तिथे त्यांची भेट ॲड-

व्होकेट जनरल श्री. अरविंद सावंत यांच्याशी झाली. श्री. सावंत यांनी श्री. राजर्षींना असे सांगितल्याचे कळते, की विद्यापीठाने आपले वकील श्री. राधाकृष्णन यांना बदलले पाहिजे. असेही कळते की विद्यापीठाने उच्च न्यायालयासमोर सादर केलेले प्रतिज्ञापत्र मागे घेण्यासही सांगण्यात आले. श्री. राजर्षी यांनी श्री. सावंत यांच्या सूचना डॉ. गोरेंना सांगितल्या. दुसऱ्या दिवशी सकाळीच डॉ. गोरेंनी राजीनामा लिहिला असे विश्वसनीय गोटातून कळते. राजीनाम्यावर विद्यापीठाची मोहोर लावून ते स्वतः राजभवनावर गेले व त्यांनी राजीनामा राज्यपालांना सुपूर्द केला. त्यानंतर थोड्याच कालावधीत श्री. अरुणाचलम यांनीही आपला राजीनामा सादर केला.

(टाइम्स ऑफ इंडिया, ३–३–८६)

• कोना स्टॉप्स गोरेज रेसीग्नेशन

मुंबई, ३ मार्च : आज रात्री झालेल्या राज्यपालांबरोबरच्या पाऊण तासाच्या बैठकीनंतर कुलगुरू श्री. गोरे यांनी वार्ताहरांना सांगितले की, त्यांच्या राजीनाम्याबाबतचा निर्णय अठ्ठेचाळीस तास पुढे ढकलण्यात आला आहे.

(टाइम्स ऑफ इंडिया, ३–३–८६)

• मुख्यमंत्र्यांचा अर्ज हायकोर्टाने फेटाळला

(आमच्या कायदा प्रतिनिधीकडून)

मुंबई, सोमवार– न्यायमूर्ती धर्माधिकारी व न्यायमूर्ती पुराणिक आपल्या निर्णयात म्हणतात– 'हा एकंदर प्रकार गंभीर असून या प्रकरणी खोलवर तपासणी होणे आवश्यक असल्यामुळे त्या खटल्याची सुनावणी होण्यामुळे नुकसान काहीच नाही. न्यायमूर्ती भरुचा यांचा आदेश म्हणजे कोर्टाचा निर्णय नव्हे, म्हणूनच अपील टिकू शकत नाही.

(लोकसत्ता, ४–३–८६)

• निलंगेकर–पंतप्रधान भेट

नवी दिल्ली, दि. ३ मार्च, (यू. एन. आय.)

• दबावाचा प्रश्नच नाही– निलंगेकर

नवी दिल्ली, दिनांक ३, (यू. एन. आय.)–मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम्. एस. गोरे यांच्या राजीनाम्याबद्दल पाटील–निलंगेकर म्हणाले, की विद्यापीठ ही स्वायत्त संस्था असल्यामुळे राज्य सरकारने विद्यापीठावर दबाब आणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मुख्यमंत्री श्री पाटील–निलंगेकर यांनी प्रारंभी तर असे सांगितले की, डॉ. गोरे यांनी राजीनामा दिल्याचेच माहीत नाही.

• मुख्यमंत्री रहाणारच !

(आमच्या वार्ताहराकडून)

मुख्यमंत्र्यांच्या निकटवर्ती गोटातून असे कळते की मार्क प्रकरणामुळे, मुख्यमंत्र्यांना राजीनामा देण्यास भाग पाडले जाईल असे वाटत नाही. तरीसुद्धा श्री. शरद पवार, श्री. वसंत साठे व श्री. शंकरराव चव्हाण यांच्या नावाची चर्चा होत आहे.

(द आफ्टरनून, ४–३–८६)

• पवार डिमान्डस रेसीग्नेशन

नवी दिल्ली, मार्च ३—(यू. एन. आय.) काँग्रेस (स) चे अध्यक्ष श्री. शरद पवार यांनी अशी मागणी केली की विद्यापीठावर दबाव आणण्यास जबाबदार असलेल्या सर्वांनी राजीनामे दिले पाहिजेत.

श्री. पवार पुढे म्हणाले की, १२९ वर्षांच्या जुन्या विद्यापीठाची प्रतिष्ठा व लाखो विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या पदव्यांची विश्वासार्हता दोन्ही धोक्यात असल्यामुळे, कुलगुरू डॉ. गोरे यांच्या राजीनाम्यामागची कारणे जाहीर करण्यात यावीत.

• या तिघांनाही हाकलावे

महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. कोना प्रभाकर राव. मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव पाटील–निलंगेकर व ॲडव्होकेट जनरल श्री. अरविंद सावंत या तिघांनीही क्षणार्धात राजीनामे द्यावेत इतके निंद्य व निषेधार्ह वर्तन त्यांच्या हातून घडले आहे.

(लोकसत्ता, संपादकीय : ४-३–८६)

६. आणि आता या कुठेही न आलेल्या बातम्या !

प्रकरण वाढत चाललं तसं पैशाचं सोंग आणणं कठीण होत चाललं होतं. महेशने ज्यांचे निकाल बदलले होते त्या बारा विद्यार्थ्यांनाही प्रतिवादी बनवलं होतं. रावळ, मुख्यमंत्री, चंद्रकला व विद्यापीठ हे तर प्रमुख प्रतिवादी होतेच. मूळ अर्जदार असल्याने, सर्व प्रतिवाद्यांच्या प्रतिज्ञापत्राच्या प्रती इतर सर्वांना देणं हे महेशचं काम. सर्व प्रतिज्ञापत्रांची मिळून अडीचशे-तीनशे पानं होती. त्यांच्या वीस प्रती काढायच्या झाल्या तर, झेरॉक्सचाच खर्च चार हजारांवर जायला लागला. 'आता आपण एक मशीनच घेऊ या, बँकेकडून कर्ज घेऊन.' जयंत घाडीगावकर म्हणायचा. 'भरपूर काम आहे. शिवाय केस सुप्रीम कोर्टात जाणारच. तिथपर्यंत वापरूच मशीन.' उदय बापट सांगायचा.

महेशने सर्व पावत्या वगैरे व्यवस्थित लावून ठेवायला सुरुवात केली होती. मग आम्ही महेशसाठी पैसे गोळा करायला लागलो. अक्षरशः पन्नास-शंभर रुपयांपासून. त्यातल्या कुणाचीच नावं देणं शक्य नाही. पण हे सारे आमचे मित्र, सहकारी, शिक्षक, अगदी एम. बी. बी. एस. च्या विद्यार्थ्यांपर्यंत.

डॉ. रवी बापट आमच्या इमारतीतच पहिल्या मजल्यावर राहतात. त्यांना आमची फार काळजी. सर खरं तर आमचे सर्जरीचे प्रोफेसर. परंतु आमच्या सर्व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये आमच्याबरोबर. त्या काळातले तीन-चार महिने सर रात्री-अपरात्री आमच्या रूमच्या खिडकीत येऊन हळूच आत डोकावून आम्ही शांत झोपलो आहोत की नाही पाहून जायचे. सकाळी पाच वाजता बॅडमिंटन खेळायला जातानाही आम्हाला पाहून जायचे. ते म्हणायचे, 'काय सांगता येत नाही रे या लोकांचं.... काहीही करतील. मला काळजी वाटते.' सरांचं धीर द्यायला येणं हा खूप मोठा आधार होता.

दुसरा आधार आमच्या एका मॅडमचा होता. त्याही आम्हाला एकेकाळी शिकवत, पण त्यांनी आम्हाला रसिकता, दिलदारपणा या गोष्टीही शिकवल्या. त्यांच्या काळजीची सावली तर आमच्या पाठी सतत होती.

तसं आमच्यावर सुद्धा ओझं होतं. मध्येच एकदा दोन विद्यार्थी कार्य-

कर्ते माझ्या ओपीडीत मला भेटायला आले. बोलताबोलता मला त्यांनी महेशबद्दल विचारलं. मी त्यांना आमच्या रूमवर आणलं. महेशच्या केस-मध्ये त्यांनी रस दाखवला. मग ते दोघेही या ना त्या कारणाने दोन-तीन वेळा खोलीवर येत राहिले. एक दिवस ते महेशला म्हणाले, 'एका पक्ष-कार्यकर्त्याला भेटायची तुझी तयारी आहे का?'

'कशासाठी?'....

'हे सारं प्रकरण मिटवण्यासाठी....'

माझी आणि महेशची डोळा-खूण झाली. महेश म्हणाला, 'बघतो....'

ते दोघे गेल्यावर मी महेशला म्हटलं, 'जाऊन तर बघू काय होतंय ते.... एक अनुभव, नातवंडांना सांगायला.'

दिवस ठरला. त्या दिवशी दादरच्या ग्रेट पजाब हॉटेलात महेश व पक्षकार्यकर्ता आणि मूळचे दोन विद्यार्थी कार्यकर्ते असे बसले.

पक्षकार्यकर्ते म्हणाले, डॉक्टरसाहेब, मला वाटतं या साऱ्यातून आमच्या पक्षाची प्रतिमा डागाळली जात आहे. मला काही रस नाही सत्तेच्या राजकारणात....पण पक्षासाठी जीव तुटतो.'

'मग मी करू तरी काय?' बेड पांघरून पेडगावला जात महेश म्हणाला.

कार्यकर्ते खुलले, 'काही नाही. सोपं आहे अगदी. तुम्ही केस चालवायची. अगदी सुप्रीम कोर्टापर्यंत. तुमचा सगळा खर्च आम्ही करणार. मात्र त्या रीट अर्जातून सीएमचं नाव तेवढं गाळायचं.... पुढल्या वेळी परीक्षेला बसणार ना. त्यावेळी परीक्षक कोण हवेत?' हसतखेळत ते म्हणाले.

'अजून काय मिळणार?' महेश 'भावडेपणी' म्हणाला.

ब्रीफकेस उघडत ते म्हणाले, 'पाच लाख पुरतील?'

आजवर अशा बॅगा महेशने फक्त हिंदी चित्रपटातच पाहिल्या होत्या महेश म्हणाला, 'मी वकिलाला म्हणजे थोरातांना विचारून सांगतो.'

दोन दिवसांनी पुन्हा ते विद्यार्थी कार्यकर्ते हजर. महेश म्हणाला, 'थोरात ऐकतच नाहीत.... नाहीतर माझं काय?' विजय थोरात व महेश यांनी ही योजनाच आखली होती. थोरातांवर कुणी दडपण आणलं की ते

म्हणायचे, 'मी किती समजावलं डॉ. गोसावींना, पण ऐकतच नाहीत. शेवटी पक्षकार म्हणेल तसं करावं लागतं वकिलाला.'

या सुमारास आमच्या खोलीवरची वर्दळ भरपूर वाढली होती. मुंबईतल्या आणि बाहेरच्या सर्व वृत्तपत्रं, साप्ताहिकं, मासिकांचे वार्ताहर आमच्याकडे यायचे. आमचा रूमचा चहावाला मी, कारण अमृततुल्य चहा (खऱ्या अर्थाने) बनवण्याबद्दल माझी ख्याती आहे. तेव्हा गप्पा व चर्चा यांनी रात्री गरम व्हायच्या. दुसऱ्या बाजूला पेपरातली कात्रणं काढणं व चिकटवणं हा एक उद्योग होता.

चार मार्च जवळ येत चालला होता.

'अब क्या होगा आगे?' हा प्रश्न आमच्या चेहऱ्यांवर कायमचा लिहिलेला असायचा.

७ : तिळा तिळा, दार उघड!

मंगळवार. ४ मार्च १९८६. मुंबई उच्च न्यायालयाची सहा नंबरची कोर्टरूम. अकरा वाजत आलेले. काळ्या डगल्यामधल्या वकिलांची लगबग. अर्जदार व पंधरा प्रतिवादी यांच्यासाठी काम करणाऱ्या पंचवीस वकिलांची न्यायासनासमोर गर्दी. प्रेक्षकांतही भरपूर गर्दी. साध्या वेशातल्या पोलिसांचीसुद्धा.

अकरा वाजले आणि न्यायमूर्ती पेंडसे न्यायालयात हजर झाले. किरकोळ कामकाजानंतर शिरस्तेदाराने नंबर पुकारला, 'वन् नॉट सिक्स ऑफ एटीसिक्स. डॉ. महेश माधव गोसावी व्हर्सेस युनिव्हर्सिटी ऑफ बॉंबे अँड अदर्स!'

अचानक शांतता.... अलीबाबाची गुहाच उघडत होती.

सील केलेल्या गुणपत्रिका व उत्तरपत्रिकांचे गठ्ठे कोर्टासमोर सादर केले गेले. ॲड. विजय थोरातांनी आपली बाजू मांडायला सुरुवात केली होती. काही मिनिटांतच न्यायमूर्तींनी गुणपत्रिकांची पुडकी फोडण्याचा आदेश दिला. त्यांच्या आदेशानुसार श्री. अरुणाचलम् त्यांच्या मदतीसाठी आले.

थिअरी परीक्षेच्या गुणपत्रिकेला न्यायमूर्तींनी 'ए' हे अक्षर दिलं. प्रॅक्टीकलच्या गुणपत्रिकेला 'बी' अक्षर, विद्यापीठाने 'ए' व 'बी' यावरून एकत्रित केलेल्या गुणपत्रिकेला 'सी' अक्षर मिळालं; तर १९ नोव्हेंबर रोजी डॉ. रावळ यांनी तयार केलेल्या पास-नापासाच्या यादीला 'डी' अशी संज्ञा देण्यात आली.

'सी' पत्रकामध्ये, 'F' चा 'P' झालेला न्यायमूर्तींनी पाहिला व लगेच इतरांच्या निदर्शनास आणला. मग त्यांनी थिअरीच्या उत्तरपत्रिका उघडल्या. त्यातून, प्रथम नापास झालेल्या, परंतु डॉ. रावळ यांच्या कृपेने पास झालेल्या बारा जणांच्या उत्तरपत्रिका वेगळ्या काढण्यात आल्या. त्यातल्या दोन विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका अधिक अभ्यासासाठी घेण्यात आल्या.... चंद्रकला पाटील व स्मिता ठक्कर या त्या दोन विद्यार्थिनी. चंद्रकला पाटील यांचा रोल नंबर १३० व कोड नंबर ३५१

(पान क्र. ३१, ३२, ३३ वर या गुणपत्रिका दिल्या आहेत.)

चंद्रकला पाटीलला थिअरीच्या उत्तरपत्रिकांनुसार एकूण दहा शीर्षकांखाली ग्रेडस् होत्या. त्या दहापैकी आठ 'P–' होते. मात्र 'ए' गुणपत्रिकेत होते चार 'P–' व तीन 'P+' व तीन 'P.' अर्थातच हे तीन 'P+' ही एका उभ्या रेषेची कमाल होती हे पान क्र. ३१, ३२, ३३ वरील 'ए' गुणपत्रिकेच्या अस्सल नकलेवरून (झेरॉक्स ऑफ ओरिजिनल डॉक्युमेंट) स्पष्ट होईल. याच गुणपत्रिकेला अंतिम शेरा 'F' आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. 'बी' गुणपत्रिका प्रॅक्टीकल परीक्षेचे गुण दाखवते. त्यात या विद्यार्थिनीला चार 'P–' आहेत व अंतिम शेरा अर्थातच 'F'. आता सर्वांत महत्त्वाची ती 'सी' गुणपत्रिका. यामध्ये थियरी व प्रॅक्टीकल्स यांचा एकत्रित निकाल आहे. बारकाईने पाहिल्यास 'F' चा 'P' कसा झाला आहे हे लक्षात येईल. 'F' हे अक्षर जाड असून पुढचा अर्धचंद्र मात्र पुसट व दुसऱ्या पेनाने केल्याचे लक्षात येते. आणि 'डी' या अंतिम निकालपत्रात कोणतीही खाडाखोड न करता चंद्रकलेला यशाची चंद्रकोर मिळाल्याचे दिसते. त्यांचे विद्यापीठातले अधिकृत नाव, 'पाटील चंद्रकला शिवाजीराव' असेच असल्याचे लक्षात येते. सौ. चंद्रकला अरुण डावळे नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

थोडक्यात, खाडाखोड झालेली न्यायमूर्तींना स्पष्ट दिसली. उत्तरपत्रिका व गुणपत्रिका यातील तफावतही दिसली. 'F' चा 'P' बनवण्यातली कलाकुसरही उघड्या डोळ्यांना जाणवली. तरीही न्यायमूर्तींनी एक जाड भिंग मागवून त्यातून पाहिले व आपले निरीक्षण पक्के केले. 'ए' ग्रेडशी बरोबरचे सर्व 'P–' फिकट निळ्या शाईत होते; तर जे 'P+' करण्यात आले, त्यातली उभी रेघ काळसर निळ्या शाईत होती. संशयास जागा राहू नये म्हणून न्यायमूर्तींनी श्री. रावळ यांचे वकील ॲड. अंध्यारुजीना यांना न्यायासनाजवळ बोलावून घेतले व त्यांच्या निदर्शनास वरील गोष्टी आणून दिल्या. तिथून परतताना अंध्यारुजीनांच्या चेहऱ्यावरचा धक्का अंधुकसा का होईना, पण जाणवत होता. ॲड. अंध्यारुजीनांनी न्यायमूर्तींना अशी विनंती केली की, डॉ. रावळ यांच्यासमवेत ही कागदपत्रे त्यांना पुन्हा पाहण्यास द्यावी. त्याचवेळी अन्य प्रतिवादींच्या वकिलांनीही ही मागणी केली. पण न्यायमूर्तींनी फक्त श्री. अंध्यारुजीना यांची विनंती मान्य केली. न्यायमूर्तींना संशयाचं सावट ठेवायला नको होतं, हेच यातून जाणवत होतं.

जस्टीस पेंडसेंनी समस्येची निरनिराळी अंगं, मुद्देसूदपणे बांधली. पहिला प्रश्न असा, खाडाखोड झाली आहे की नाही ? तसेच प्रत्यक्षात कमी प्रतीच्या ग्रेडस्चं रूपांतर उच्च प्रतीच्या ग्रेडस्मध्ये झालं किंवा नाही ?

दुसरा प्रश्न, ही खाडाखोड कुणी केली ?

आणि तिसरा प्रश्न, का केली ?

त्यानंतर न्यायमूर्तींनी या प्रश्नांची उत्तरे शोधण्यास प्रारंभ केला. ते म्हणाले, 'निकालातील 'P–' चे 'P+' हा बदल जर डॉ. रावळ यांच्या पश्चात झाला असेल तर तो त्यांच्या नजरेतून सुटलाच कसा ?... जर हे फेरफार त्यांनी केले नाहीत तर पाहताक्षणीच त्यांनी याची चौकशी का केली नाही ?....हे सारं करताना, डॉ. रावळ यांना मुख्यमंत्र्यांच्या कन्यकेवर व डॉ. स्मिता ठक्कर यांचेवर कृपादृष्टी ठेवायची होती म्हणून त्यांनी असे केले का ?'

न्यायमूर्तींना पुढे असा मुद्दा मांडला की चंद्रकलाला प्रत्यक्षात एकूण बारा 'P–' मिळालेले आहेत. त्यातल्या तीन 'P–'चे 'P+' नंतर

केलेले नाहीत असे गृहीत धरले, तरीही तिच्याकडे नऊ 'P–' राहतातच. आणि डॉ. रावळनी तर त्यांच्या प्रतिज्ञापत्रात असे म्हटले आहे की जास्तीत जास्त सहा 'P–' पर्यंतच विद्यार्थ्याला उत्तीर्ण करण्यात येईल.

आता डॉ. रावळनी प्रथमच एक नवी 'थिअरी' आपल्या डोक्यात पक्की केली व अंध्यारुजिनांच्या कानात सांगितली. मग अंध्यारुजिना म्हणाले की, जरी नऊ 'P–' असले तरीही आता तीन 'P+' (म्हणजे नवे) त्यातील तीन 'P–' ना छेद देतात (न्यूट्रलाईज). म्हणून शेवटी सहा 'P–' उरतात व म्हणून चंद्रकला उत्तीर्ण होते.

सहा 'P–' पर्यंत मुभा देण्याचा अधिकार श्री. रावळ यांना असल्याचा दावा ॲड. अंध्यारुजिनांनी केला. त्यासाठी त्यांनी डॉ. जे. सी. पटेल, डॉ. प्रमिला सांखोलकर व डॉ. विद्या आचार्य या तीन, इतर वैद्यकीय शाखांमधील परीक्षकांनी, डॉ. रावळ यांच्या वतीने दिलेल्या प्रतिज्ञापत्रांचा दाखला दिला.

न्यायमूर्ती म्हणाले, 'सहा 'P–' पर्यंत पास करण्याची परीक्षकांना मुभा असते, असं सर्वसाधारण विधान करून चालणार नाही. कुठल्या परीक्षकांनी कुठल्या परिस्थितीत, कुठल्या परीक्षेला असं वर्तन केलं याचा सज्जड पुरावा मिळायला हवा.'

हे तर खरंच होतं. कारण डॉ. पटेल परीक्षक होते, १९४५ ते १९५० या कालखंडात. म्हणजे इसवी सनापूर्वीच! त्यानंतर बरंच पाणी वाहून गेलं होतं. डॉ. सांखोलकर हे सरकारी नोकर व मुख्यमंत्री प्रतिवादी असल्याने त्यांच्या प्रतिज्ञापत्रावर कसा विश्वास ठेवावा?.... डॉ. आचार्य या तर डॉ. रावळ यांच्या केईएममधल्या सहकारी. त्यांच्यावर तरी विश्वास कसा ठेवावा? (हे सारे न्या. पेंडसेनी त्यांच्या निकालपत्रात स्पष्टपणे लिहिले होते. पुढे खंडपीठासमोर डॉ. सांखोलकर व डॉ. आचार्य परीक्षक असतानाचे कागदपत्र जेव्हा सादर केले गेले तेव्हा त्या दोघींनीही सहा 'P–' च काय, एका 'P–' लाही पास न केल्याचं दिसून आलं)

नंतर अंध्यारुजिना म्हणाले, '१९ नोव्हेंबरच्या मिटिंगसाठी दुसरे परीक्षक डॉ. मुखर्जी येऊ न शकल्यानंच, परिस्थितीवशात् डॉ. रावळ

यांना काही गोष्टी कराव्या लागल्या.'

न्यायमूर्ती : 'इट इज ऑलवेज दॅट द क्राऊन हॅज टू वेअर इट.'

प्रत्यक्ष पुराव्याच्या छाननीनंतर न्यायमूर्तींना जाणवलं, की ज्या गोष्टी बाहेर आल्या त्यापैकी कशाचाही उल्लेख डॉ. रावळनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात केला नव्हता. तसे त्यांनी बोलूनही दाखवले.

मध्येच अंध्यारुजीना आक्रमक बनले आणि म्हणाले की, ही सर्व माहिती अर्जदाराला, म्हणजेच डॉ. गोसावींना मिळालीच कशी?

यावरची न्यायमूर्तींची टिप्पणी : 'कशी मिळाली याला महत्त्व नाही, ती खरी किंवा खोटी याला महत्त्व आहे.'

या केसचे महत्त्व सांगताना, गोरे–अरुणाचलम्–लिमये यांच्या राजिनाम्याचा संदर्भ देत न्यायमूर्ती म्हणाले, 'थ्री मे कम ॲण्ड थ्री मे गो, बट इट इज अवर डयूटी दॅट नेक्स्ट जनरेशन वुईल नॉट ब्लेम अस ॲज द युनिव्हर्सिटी वुईल रिमेन फॉरएव्हर.'

हे सर्व नाट्य कोर्टात घडत असतानाच त्या दिवशीच्या वर्तमानपत्रातील बातम्यांची ही काही शीर्षकं : (५–३–८६).

—दिल्लीचे मुंबईकडे डोळे. मुंबईचे दिल्लीकडे कान (लोकसत्ता)
—मुख्यमंत्र्यांची पंतप्रधानांशी भेट
—सीएम कमीएर्स फाईलस इन ए हरी (फ्री प्रेस बुलेटीन)
—कोना ॲक्सेप्टस गोरेज रेसीग्नेशन (टाइम्स ऑफ इंडिया)
—डॉ. चंद्रकला डावलेप्रकरणी संसदेत जोरदार गदारोळ.
—सत्तेचा गैरवापर, निलंगेकरांवर आरोप (मुंबई सकाळ)
—शिवाजीराव निलंगेकर यांचा लवकरच राजीनामा? (महाराष्ट्र टाइम्स)
—आमदार निवास एकाएकी गजबजले (लोकसत्ता)

सुनावणीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे ६ मार्चला, ॲड. अंध्यारुजीना यांनी एक नवीनच कल्पक मुद्दा मांडला. ते म्हणाले की, या परीक्षेच्या निकालाविषयीची परीक्षकांनी तयार केलेली गुणपत्रिका डॉ. रावळ यांनी ११ नोव्हेंबर १९८५ ला विद्यापीठाला सादर केली. त्यानंतर १९ नोव्हेंबरला डॉ. रावळ यांनी अंतिम निकालपत्र तयार करीपर्यंतच्या काळात कोणीतरी गुणपत्रिकेत फेरफार केले असावेत.

मुंबई विद्यापीठावर चिखलफेक करून डॉ. रावळ यांना त्यांच्या जबाबदारीतून मुक्त करता येणार नाही, असे उद्‌गार काढून न्यायमूर्ती पेंडसेंनी, विद्यापीठातील कर्मचारी व अन्य तीन परीक्षक यांनी हे फेरफार केल्याची शक्यता नगण्य असल्याचे दाखवून दिले.

'परीक्षकांनी जेव्हा मूळ श्रेणीपत्रिका तयार केली तेव्हा परीक्षकांना विद्यार्थ्यांचे केवळ कोड नंबर्स ठाऊक होते. डॉ. रावळ यांनी एकट्या नेच, १९ नोव्हेंबरला अंतिम पत्रिका तयार केली, तेव्हा प्रथमच विद्यार्थ्यांची नावे उघड झाली. इतर तीन परीक्षक यावेळी उपस्थित नसल्यामुळे, डॉ. चंद्रकला पाटील यांच्या श्रेणी कोणत्या आहेत हे त्यांना कळणे ठाऊकच नव्हते.' न्यायमूर्ती गणित मांडत होते.

मुंबई विद्यापीठाच्या अनेक कर्मचाऱ्यांना गुणपत्रिकेची प्रत तयार करताना श्रेणीपत्रिकेत बदल करण्याची संधी होती, हे खरे असले तरी नेमके कोणते बदल करायचे हे डॉ. रावळ यांनी सांगितल्याशिवाय त्यांना कळणे शक्य नव्हते. डॉ. रावळ यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रकातच म्हटले आहे की सहा 'P–' पर्यंत विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्याचा निर्णय मी १९ नोव्हेंबरलाच, सर्व गुणपत्रिका पाहूनच घेतला. 'जो निर्णय डॉ. रावळ यांनी १९ नोव्हेंबरला घेतला तो, त्या आधीच विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना कळला असे आपल्याला म्हणायचे आहे काय,' असा सवाल न्यायमूर्तींनी केला.

ॲड. अंध्यारुजीनानी शेवटचं अस्त्र बाहेर काढलं. ते म्हणाले की, मुळात 'P–' च्या श्रेणी 'P+' केल्याचा डॉ. रावळ यांचेवर आरोप असला तरी त्यासाठी कोणताही प्रत्यक्ष पुरावा नाही. यावर 'तसा पुरावा असता तर त्यांना तुरुंगातच जावे लागले असते.' न्यायमूर्तींनी ठणकावले.

सकाळचे पावणेबारा वाजत आले होते. अचानक कोर्टाच्या एका अधिकाऱ्याने न्यायमूर्तींच्या हातात एक कागद दिला. प्रसन्न वाटणारे न्यायमूर्ती एकदम गंभीर झाले. अर्ध्या तासासाठी कोर्ट तहकूब करत आहोत असे सांगून ते न्यायालयातून बाहेर पडले. मात्र जाताना, सर्व पुराव्याचे कागदपत्र बरोबर न्यायला विसरले नाहीत. लगेच न्यायालयात गणवेषधारी व साध्या वेषातले पोलीस शिरले. सर्व प्रेक्षकांना बाहेर

काढण्यात आले. अधिक विचारणेनंतर कळलं की एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांना फोन करून सांगितले की या न्यायालयात बॉम्ब ठेवण्यात आला आहे. गूंगूं करणाऱ्या तीन वायरलेस गाड्या, प्रशिक्षित कुत्र्यांचे पथक व राकट चेहऱ्यांचे पोलीसतज्ज्ञ अचानक अवतरले. सारं न्यायालयच पिंजून काढलं गेलं. या साऱ्या नाट्यानंतर बारा वाजून पन्नास मिनिटांनी जणू असे काही घडलेच नाही या थाटात न्यायमूर्तींनी पुन्हा सुनावणी चालू केली.

आतापर्यंत पहिल्या दोन मूलभूत प्रश्नांची उत्तरे मिळाली होती. निकालात फेरबदल झाले हे नक्की. ते डॉ. रावळ यांनीच केले असावेत, आणि आता तिसरा प्रश्न, हे बदल कोणाच्या सांगण्यावरून करण्यात आले?

या प्रश्नाबद्दल आपल्याला काहीच सांगायचे नाही अशी भूमिका विद्यापीठाच्या वकिलांनी घेतली. मुख्यमंत्र्यांच्या वतीने बोलताना ॲडव्होकेट जनरल अरविंद सावंत म्हणाले की, मुख्यमंत्र्यांवरील बेजबाबदार आरोपांच्या पुष्टीसाठी अर्जदार कोणताही पुरावा देऊ शकलेला नाही. उलट, प्रत्येक संबंधित व्यक्तीने या आरोपाचा इन्कार केला आहे, याकडे न्यायमूर्तींचे लक्ष त्यांनी वेधले. मुख्यमंत्र्यांविरुद्धच्या अशा स्वरूपाच्या आरोपांची प्रथमदर्शनी दखल घेण्यासाठीही पुराव्याचे कठोर निकष लावले पाहिजेत, असा त्यांचा युक्तिवाद होता.

ॲडव्होकेट जनरल म्हणाले, 'अर्जदार डॉ. गोसावीने मुख्यमंत्र्यांवर केलेले आरोप संदिग्ध व बिनबुडाचे असून त्यांना ही माहिती कुठून व कोणाकडून मिळाली, त्यांची नावे त्यांनी दिलेली नाहीत.'

यावर न्यायमूर्ती उद्‌गारले, 'मिअरली बिकॉज ही हॅज नॉट बिन एबल टू प्रूव्ह द ॲलीगेशन्स, डझ नॉट मीन दॅट द कोर्ट वुईल लूज इटस् आईज.'

महेशच्या बाजूने प्रतिवाद करताना ॲड. चंद्रकांत सावंत म्हणाले, 'मुख्यमंत्री, तसेच त्यांच्या मुलीवरील आरोपाबाबत आपण प्रत्यक्ष पुरावा देऊ शकत नाही हे मला मान्य आहे. मात्र उपलब्ध पुराव्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की निकालातील फेरफार, उच्च पातळीवरील दडपणा-

शिवाय शक्य होणार नाहीत. इथे बसलेल्या कुठल्याही वकिलाच्या मुलीसाठी हे सारे झाले असते काय?....तेव्हा गोष्ट सिद्ध होत नसली तरीही रावळ यांचे वर्तन व त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या कन्येला झालेला फायदा याचा अन्योन्य संबंध लावला तर, मुख्यमंत्र्यांचा यात हात होता असा ठोस निष्कर्ष काढता येतो. व असा निष्कर्ष काढण्याची मुभा कायद्याला आहे.'

डॉ. चंद्रकलाच्या बाजूने ॲड. नारी गुरुसहानी उभे राहिले. ते म्हणाले, 'चंद्रकला ही मुख्यमंत्र्यांची मुलगी आहे, एवढ्याच आधारावर तिने मुख्यमंत्र्यांचा प्रभाव वापरून स्वतःच्या निकालात बदल करवले असे म्हणता येणार नाही. डॉ. चंद्रकला याआधी तीन वेळा परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्या. त्यावेळीही श्री. शिवाजीराव मंत्रिमंडळात होते. त्यावेळी त्यांनी अधिकाराचा गैरवापर केला नाही, तर यावेळी तसा विचार ते कसा करतील?'

'एव्हरी एक्झॉमिनर इज नॉट ॲज अनूस्क्रूपलस ॲंड ओब्लायजिंग ॲज डॉ. रावळ.' न्यायमूर्ती.

पुढे न्यायमूर्ती म्हणाले, 'ज्या विद्यार्थिनीच्या श्रेणी सर्वात कमी आहेत तिला गुणपत्रिकेत बदल करून पास करण्याचा धोका एखादा शहाणा परीक्षक सर्वसामान्य परिस्थितीत घेईल का?'

'डॉ. रावळ यांनी कदाचित हे स्वतःहूनच केले असेल.'–इति ॲड. गुरुसहानी.

'हे तुम्ही कोर्टाला खरंच गंभीरपणे सुचवता आहात काय?'.... मिश्कीलपणे न्यायमूर्ती म्हणाले.

'इट वॉज नॉट जस्ट दॅट ओन्ली चंद्रकला वॉज फेव्हरर्ड. देअर वेअर इलेव्हन अदर्स'–गुरुसहानी.

'व्हेन यू आर आऊट टू डू मिस्चिफ, यू डोन्ट हॅव टू रिस्ट्रीक्ट टू बन स्टूडंट'–न्यायमूर्ती.

आधी डॉ. रावळ यांच्या बाजूने बोलताना, ॲड. अंध्याजीरुनानी असेच एक विधान केले होते. ते म्हणाले होते, 'वेल, वुई कॅन से दॅट धिस वॉज डन् टू फेव्हर सीएम्.स डॉटर. बट व्हॉट अबाऊट अदर

कॅंडीडेट ? व्हाय, हर ग्रेडस् वेअर आल्टर्ड फ्रॉम थ्री 'P–' टू थ्री 'P+' ?'

यावर न्यायमूर्तींचे उत्तर मोठे मासलेवाईक होते, 'इट इज जस्ट द मोडस् ऑपरेंडी ऑफ अ पर्सन टू मेक द मॅटर 'पक्का'....'

यातली गोम अशी की ज्या शीर्षकामध्ये चंद्रकलाचे 'P–' पी प्लस झाले त्याच शीर्षकांमध्ये स्मिताचेही 'P–' चे पी प्लस झाले.

हे सारे होईपर्यंत दुपारचे तीन वाजून गेले होते. न्यायमूर्ती पेंडसेंच्या झपाट्याने सुनावणीचे काम पूर्ण झाले होते. आम्ही न्यायालयात बसून होतो. हातात पेपरांची चळत होती.

—पंतप्रधानांचे स्पष्टीकरण :
हायकोर्टाच्या निकालानंतरच मुख्यमंत्र्यांबद्दल निर्णय
(महाराष्ट्र टाइम्स, ६–३–८६)

—राजिनामा न देण्याचा ज्येष्ठ मंत्र्यांचा सल्ला
(महाराष्ट्र टाइम्स, ६–३–८६)

—निलंगेकरांची हकालपट्टी करा,
(मुंबई सकाळ, ६–३–८६)

—'क्विट ? फॉर हॉट ?–' सीएम
(इंडियन एक्सप्रेस, ६–३–८६)

—'आय ॲम नॉट क्विटिंग'
(डेली, ६–३–८६)

कोर्ट संपताच रूमवर आलो आणि रोजची कात्रणे कापून त्यांची फाईल करण्याच्या दैनंदिन कामाला लागलो. हे सारं करताना सारखा विचार येत होता, उद्या काय होणार ? उद्या तर निकालाचा दिवस.

८ : निकालाचा दिवस

रात्री अडीच वाजेपर्यंत जाग्रण करूनही सकाळी लवकर जाग येते.... आठवतं की एम. डी. च्या थिअरी परीक्षेच्या पहिल्या दिवशीसुद्धा नेमकं असंच झालं होतं. पेपरांचा रतीब येऊन पडलेला असतो. सारी खोली

म्हणजे एक अस्ताव्यस्त पसारा. पेपरांचा खच. कपडे धुवायचे राहिलेले. छताच्या भिंतीच्या एका कोपऱ्यात जळमटं साठून त्यातून एक नागाचा आकार तयार झालेला....पंख्याच्या वाऱ्यावर तो सारखा डुलत असतो.... आज काय होणार ?....जरासं टेन्शन येतं. खरं म्हणजे बरंच येतं. मग मुद्दाम मोठ्याने, खुल्या आवाजात गाणं म्हणून, आंघोळ करताना टेन्शन घालवण्याचे प्रयत्न. महेश आंघोळीला जातो. एवढ्यात एक विद्यार्थिनी येते. आमच्या कॉलेजातली, 'सर, डॉ. महेश गोसावींना भेटायचंय.'

'कशासाठी ?'

'माझे मेव्हणे डॉक्टर आहेत. कांदिवली मेडिकल असोसिएशनतर्फे आर्थिक मदत करायची आहे त्यांना या खटल्यासाठी.'

चांगला शकुन, असं म्हणत मी त्या डॉक्टरांचा फोन नंबर घेतो. आर. एस. ओ. मेसमध्ये चहा घेताना तेच प्रश्न, 'अरे, आज क्या होगा ?'....'ऑल द बेस्ट....' वगैरे वगैरे.

परीक्षेला आम्ही दोघे जसे बरोबर निघायचो तसे बाहेर पडतो. महेश म्हणतो, 'वकिलाकडे जाऊ या....' आम्ही परळ-व्हिलेजच्या दिशेने. 'लॉंगकट पडला तरी याच रस्त्याने जाऊ या....बरं असतं आसं गेल्याने.' महेशचा हळवा आदेश.

लॉंगकट घेऊन ॲड. थोरातांच्याकडे जातो तर तिथेही तेच टेन्शन. मग ते घालवण्यासाठी त्यांच्या छोट्या मुलींबरोबर खेळणं.... 'हे बघा डॉक्टरसाहेब, वुई डिड अवर बेस्ट....आता निकालाचा विचार नाही करायचा.' समजावत थोरात म्हणतात. पण त्यांनासुद्धा टेन्शन आल्याचं जाणवतं. महेशच्या हातातल्या फाईलवरची पकड नकळत घट्ट !.... काल त्याने सगळी कागदपत्र लावलेली. वर आम्ही नावं दिलं असतं, 'आर्का-इव्हज ऑफ द रीट पिटीशन.'....

आदल्या दिवशी रात्री डोक्यात एक कल्पना आलेली असते. रूमच्या एका भिंतीवर मी एक उघडं, मोठं कपाट काढलेलं....त्याचं दार उघडं. त्याच्यातून तीन सांगाडे बाहेर पडताहेत. प्रत्येकाच्या डोक्याच्या ठिकाणी पेपरातून कापलेले अनुरूप चेहरे. कपाटाला टेकून महेश उभा आहे. त्याचाही चेहरा पेपरातून कापलेला. पार्श्वभागी विद्यापीठाचा राजाबाई

टॉवर आणि हायकोर्ट....खाली वाक्य, 'स्केलेटन्स आऊट ऑफ द कबर्ड ॲट लास्ट'....वर एका आश्चर्यचकित माणसाचा चेहरा. तो विचारतोय, 'ये क्या हो रहा है?'....रात्री महेश म्हणाला होता, 'जास्त उडू नकोस उगाच.'....

आम्ही टॅक्सीत बसतो. टॅक्सी हायकोर्टाच्या दिशेने....आता माझ्या चेहऱ्यावर 'बॉडीगार्ड'च्या चेहऱ्यावर असतात तसे भाव. पाठच्या काचेतून पाहणं की आम्हाला 'टेल' आहे का?.... शेपटीच्या गाड्या पाहण्याची सवय 'मार्ड'च्या संपापासूनची. शेपटीच्या गाडीचं वैशिष्ट्य म्हणजे ती कधीच मागच्या चारपाच गाड्यांमध्ये नसते. त्याहून पाठी असते. आणि जे अंतर असतं ते कायम ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न असतो.

तर हायकोर्टात उतरतो....बरेच आधी पोहोचलो होतो. कोर्टाच्या कँटीनमध्ये चहासाठी. 'डॉक्टरसाहेब, तुमचा रिझल्ट ना आज?....' चहा आणणाऱ्या तरतरीत हसऱ्या मुलाचा, उत्तर ठाऊक असलेला प्रश्न. चहा झाल्यावर, तोंडात चघळायला हॉल्सच्या गोळ्या आणायला समोरच्या बारक्या दुकानात जातो, तर तो माणूस महेशला चक्क कन्सेशनमध्ये हॉल्स देतो....त्यालाही ठाऊक असतो, आजचा निकालाचा दिवस. कोर्टाच्या कॉरीडॉरमधले वकील महेशला ओळख देतात, बेस्ट लक देतात. आम्ही कोर्टरूममध्ये जाऊन मोक्याची जागा पकडतो. जवळच बसलेला एक पत्रकार मित्र ठामपणे सांगतो, 'मुख्यमंत्र्यांवर कुठलेही शेरे मारले जाणार नाहीत निकालात'....महेश त्याच्याशी पैज लावत असतो. एवढ्यात महेशचे वडील आत येऊन बसतात. ते कोर्टाच्या प्रत्येक दिवशी येऊन असेच शांतपणे बसत असतात. 'नीट... सांभाळून....' असा जपणुकीचा सल्ला देत असतात. पण त्यांच्या येण्याने महेशला नक्कीच आधार मिळत असणार.

एम. डी. मध्ये नापास घोषित केलेला मुलगा, फेरतपासणीची मागणी घेऊन विद्यापीठात जातो काय आणि त्यातून चालू झालेलं प्रकरण येतं कुठपर्यंत. 'लोक डोंगर पोखरून उंदीर काढतात. आमच्या हातात तर फक्त उंदराची शेपटी होती.'...हे महेशचं वाक्य. शेपटीपासून शेवटी

तयार झालेल्या डोंगरांचं काय होणार हा प्रश्न....तो शांत असतो....मला त्याचं कौतुक वाटतं दोन गोष्टींसाठी. एक तर, त्याने अन्याय सहन करायचा नाकारला म्हणून. त्याच्याशी लढायचं ठरवलं म्हणून. आणि दुसरं, या प्रकरणाला जसं महत्त्व येत गेलं, तसतसं त्याला ज्या दडपणांना तोंड द्यावं लागलं, त्याला तो बधला नाही म्हणून....आणि हे सर्व, त्याचा स्वतःचा निकाल बदलणार नाही याची जवळजवळ खात्रीच असताना....आमच्यापाठी इतक्या जणांचा राजकीय वरदहस्त असल्याच्या बातम्या होत्या की त्या ऐकून आम्हाला गंमत वाटायची. केवळ एक व्यक्ती, आपल्या इवल्याशा सामर्थ्यावर प्रस्थापितांशी टक्कर द्यायची हिंमत करते हीच गोष्ट किती दुर्मिळ झाली आहे. पाठीमागे कुणी असल्याशिवाय हे होणारच नाही असं आपण सहज म्हणतो....व्यक्तीला 'कळसूत्री बाहुली' बनवतो....पण यावेळी तसं नव्हतं, सारं तो एकटाच भोगत होता. इतका एकटा, की अर्ज दाखल करायची फक्त चार दिवस आधी त्याने पहिल्यांदा मला बातमी दिली की मी निकालाविरुद्ध कोर्टात जायची तयारी केली आहे. मला वाटतं, आतापर्यंत पहिल्यांदाच त्याने एवढी महत्त्वाची बातमी आम्हा जवळच्या मित्रांपासून लपवून ठेवली असेल....

माझे विचार थांबतात. कारण कोर्टरूममध्ये गणवेषातले व साध्या वेषातले अनेक पोलीस येतात. आम्हाला सर्वांना बाहेर काढलं जातं. कारण बॉम्बसाठीची तपासणी, मेटल डिटेक्टर, कुत्रे वगैरे वगैरे.

बाहेर दारापाशी भरपूर गर्दी. दार उघडल्यावर जागा पकडण्यासाठी. भरपूर पत्रकार....पायऱ्यांवर फोटोग्राफर्स. दरवाजा उघडतो आणि फक्त खटल्याशी संबंधित, वकीलवर्ग व पत्रकार यांनाच आत जायला परवानगी. म्हणजे आम्ही बाहेरच....मी बाहेर घोटाळतो. काय करावं कळत नाही बरोबर केईएमचाच एक डॉक्टर असतो. मी ठरवतो, काहीही करून आत घुसायचं. त्याला म्हणतो, 'तुझ्याकडे आठ आण्याचं नाणं आहे?' त्याचं नाणं घेऊन एक फोन फिरवतो, 'अहो, माझ्याकडे माझं आयडेंटिटी कार्ड नाही आहे....ओळख पटवल्याशिवाय ते आत सोडत नाहीत.' मी माझी अडचण योग्य कानावर घालतो. दहा मिनिटांत मला कोर्टरूममध्ये ओळख पटवून प्रवेश मिळतो; पण ज्याच्या नाण्यानं फोन केला तो

मात्र बाहेरच लटकतो.

आतमध्ये गर्दी तर भरपूर असते. दबल्या स्वरातल्या चर्चा. कारण न्यायमूर्ती स्टेनोला निकालपत्र सांगत असतात. जिवाचे कान केले तरी त्यांचा आवाज ऐकायला येत नाही. त्यांच्या टेबलासमोर, कागदाच्या खुणा घातलेली, कायद्याची पुस्तकं असतात. ती ते मधूनच उघडत असतात. आणि त्यातले संदर्भही देत असावेत असा अंदाज येतो. माझ्या शेजारी, एक तरुण सॉलिसिटर आणि एक तरुण वकील. तो वकील महेशला, कॉलेजपासून ओळखणारा. 'कशाला करतोय हा सगळं? काय मिळणार आहे त्याला यातून?' त्याच्या तिप्पट वयाच्या एखाद्या, निराशावादी व्यक्तीने विचारावे असे प्रश्न तो विचारत असतो. मी त्याला स्पष्टीकरण देण्याच्या भानगडीत पडत नाही. त्याचा सॉलिसिटर मित्र चांगलाच बोलका व विनोदी असतो. 'बारीकसारीक तक्रारींसाठी आता डॉक्टरांकडे जायला नको. काय माहिती, 'पी मायनस' आहे की 'पी प्लस' ते....'

माझ्या बाजूच्या दोन डॉक्टर मुली त्याच्यावर बऱ्यापैकी खसकतात. त्यामुळे तो अधिकच फॉर्मात येऊन, कुजबुजत्या स्वरात शेजारच्या दुसऱ्या वकिलाला मुद्दाम, ॲसिडीटीवर कोणती गोळी चांगली ते सांगू लागतो....त्याच्यामुळे वेळ चांगला जातो. माझ्या दुसऱ्या बाजूला, एका पेपरचा सिटी एडीटर असतो. मार्ड-संपापासून ओळखीचा. 'तू नाहीस ना त्या बारा जणांत?' तो विचारतो. 'नाही रे बाबा....मी आणि अर्जदार खूप वर्षांपासून सख्खे दोस्त व रूम-पार्टनर आहोत...'

त्याच्या शेजारचा एक सावळासा, उंच माणूस त्याला–त्या पत्रकाराला आपलं कार्ड काढून देतो, ते मी हळूच पाहतो. तो विद्यापीठाचा सीनेट मेंबर असतो. एका कोपऱ्यात ओळखीच्या चेहऱ्याचे (अर्थात फोटोत पाहिलेल्या) एक आमदार असतात....कोण कोण लोक आले आहेत? शेजारच्यांच्या खांद्यावरून बघतो, तर थंड नजरेचे एक मिशीवाले, सफारीतले गृहस्थ. कोण बरं हे?....त्यांची करडी नजर उत्तर देते.

हातातल्या वर्तमानपत्रावर मी बसल्याबसल्या काही वाक्ये लिहायला लागतो. माझ्या दृष्टीने, 'प्रोफाऊंड विसडम्'ची वाक्ये असतात ती. उदाहरणार्थ, 'एखादी व्यक्ती म्हणून जेव्हा वाईटाविरुद्ध झगडायला उतरते

तेव्हा 'रजनी' बनवणाऱ्यांची किती कींव येते. तिथं कसं सारंच सोपं आणि मस्त असतं.' किंवा, 'फायटिंग द सिस्टीम अशारस् इन अ लॉट ऑफ ॲन्झायटीज बिकॉज मिअर एक्झिस्टन्स ऑफ सच अ जायंट इज इनफ टु मेक युअर ब्रिदिंग लेबोरिअस', किंवा 'वेगवेगळ्या क्षेत्रांत झगडणारे माझ्या पिढीतले दोनशेजण तरी मला प्रत्यक्ष ठाऊक आहेत. मग आमची पिढी 'वाया गेलेली' का समजतात? आम्हाला लढता येत नाही असं का समजतात? हं....असं असावं, की प्रत्येक पिढीमध्ये झोकून देणारे संख्येने सारखेच असतात. झोकून देणाऱ्यांना झेलणारे किती हा महत्त्वाचा प्रश्न आहे.'....

असं काहीबाही लिहिताना, जवळ बसलेली एक वकील मुलगी वर्तमानपत्र मागते. आता तिलाही बातम्यांबरोबर, मोकळ्या जागांमधली ही सुभाषितं वाचायला लागतात.

भिंतीवरचं घड्याळ टिकटिकत चालत असतं. सकाळचे अकरा ते एक वाजून वीस मिनिटे एवढा वेळ हा असा जातो. न्यायमूर्ती निकाल वाचून दाखवायला सज्ज होतात आणि सारी कोर्टरूम नकळतच आकुंचन पावते. प्रत्येकजण न्यायमूर्तींच्या जवळात जवळ जाण्याच्या गर्दीत. निकालाचं वाचन सौम्य, शांत शब्दांत चालू असतं. माझ्या पाठीवर कुणीतरी डोकं टेकलेलं असतं. तो महेश असतो. तीन मिनिटांत वाचन संपतं आणि आम्ही दोघं एकमेकांना एक क्षणभर समाधानाने मिठी मारतो. आणि लगेच महेश, आभनंदनाच्या गराड्यात हरवतो. कोर्टरूममधून बाहेर पडतक्षणी कॅमेराचा क्लिक्क्लिकाट सुरू होतो. मुलाखतीसाठी पत्रकार येतात. ओझं उतरल्याचा आनंद....पण थोडा वेळच, कारण अजून प्रकरण संपलेलं नसतं, संपणार नसतं, तरीपण समाधान. एक व्यक्ती मनात आणलं तर काय काय करू शकते याचं....अजूनही आपल्या समाजात मदतीचा हात देणारी, पाठिंबा देणारी आणि निःस्पृहपणे मत व्यक्त करणारी माणसं भरपूर आहेत म्हणून....'सिस्टीम'चा एक चिरा निखळला म्हणून....'सिस्टीम'चा एखादा चिरा निखळू शकतो याचा दिलासा मिळाला म्हणून.

ॲड. थोरात म्हणतात, 'आपण पोरापोरांनी खेळ चालू केला त्याची कसोटी मालिकाच झाली की'....गर्दीमध्ये कुणीतरी म्हणतं, 'अरे, कोर्टात शेवटी बॉम्ब फुटला बरं....'

काही पत्रकार सुहृदांकडून, टेलिप्रिंटरवर आलेल्या निकालाच्या बातमीच्या झेरॉक्स प्रती घेऊन आम्ही आमच्या हॉस्पिटलच्या क्वार्टर्समध्ये परत येतो. खोलीच्या दारावर लगेच या प्रती चिकटवल्या जातात...खोलीवर दोस्तांचा ओघ, गप्पांचा लोंढा आणि हसण्याचे फवारे....

एक मित्र भेटतो, 'अन्यायाला वाचा फुटते हे ठाऊक होतं; पण इथं तर अन्यायाला लाऊडस्पीकरच फुटला'—त्याची प्रतिक्रिया.

अशा अनेक प्रतिक्रिया. आमचे सिक्युरिटी गार्डस्सुद्धा आनंदाने कडक सलाम ठोकतात. कँटीनचे मॅनेजर, राजकारण्यांच्या कातडीविषयीची आपली निदानं ऐकवतात. फोन खणखणतात. वेळ कापरासारखा भुर्रर्रकन् उडून जातो.

रात्री जेवण झाल्यावर पान खायची हुक्की येते म्हणून आमच्या नेहमीच्या, केईएमसमोरच्या पानवाल्याकडे येतो. पानं तयार करताकरता चंदू पानवाला म्हणतो, 'गरीब पण श्रीमंतांना अद्दल घडवू शकतात बघ....अरे., आपण लोक पैशाने नसलो तरी मनाने तर श्रीमंत आहोत.' म्हणून तो गुलकंदाचा चमचा पानात रिकामा करतो.

'अजूनही अगदी सारंच काही हातावाहेर गेलेलं नाही,' असं म्हणायला लावणारे क्षण, समाजजीवनात अलीकडे थोडे येतात हे खरं.... पण येतात हे काय कमी आहे...एकूण हवेमध्ये, प्राणवायूचं प्रमाण टक्केवारीने तसं कमीच असतं की, पण म्हणून काय त्याचं महत्त्व कमी होतं?

उपोद्घात

न्या. पेंडसेंचा निकाल टेलिप्रिंटरवर टकटकत असतानाच मी आणि महेश एका वृत्तपत्राच्या कचेरीत होतो. एकाने पटकन् स्टाफ-फोटो-

ग्राफरला बोलावून महेशला फोटोसाठी पोझ द्यायला लावली. तिथले वृत्त-संपादक म्हणाले, 'बघा, आम्हा पत्रकारांना गणपती लागत असतो. दहा दिवस नाचवायचा. मग विसर्जित करायचा. की मग नवा गणपती.... तसं आहे या साऱ्या प्रकरणांचं.'

हे तर खरंच. पण फक्त निकालावर प्रकरण थांबलं नाही. दुसऱ्या दिवशीच 'महाराष्ट्र टाइम्स'ने अग्रलेख लिहिला : निलंगेकरांचा 'निकाल.' त्या अग्रलेखात संपादक म्हणतात, 'ज्या सहा नंबरच्या कोर्टात अंतुले यांना न्यायाधीश श्री. लेन्टिन यांनी दोषी ठरवले त्याच कोर्टात पेंडसे यांनी निलंगेकर यांच्यावरही आपल्या मुलीच्या परीक्षेतील निकालात फेरबदल करण्यासाठी प्रभाव पाडल्याचा निष्कर्ष काढण्यास पुरेशी जागा आहे असे सांगून मुख्यमंत्र्यांवर ठपका ठेवला.' पुढे संपादक म्हणतात, 'एका माधवरावांच्या राजीनाम्यामुळे राज्यपालांच्या अनैतिक हालचाली उजेडात आल्या, तर दुसऱ्या माधवरावांच्या (पेंडसे) निर्णयामुळे केवळ मुख्यमंत्र्यांचाच नव्हे, तर राज्यपालांचाही निकाल लागला.'

सहा मार्चला जेव्हा हा अग्रलेख लिहिला जात होता, त्याच वेळी, मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात 'गो बॅक चॅन्सेलर', 'नही चलेगा भ्रष्टाचार' अशा घोषणा देत निदर्शकांनी धमाल केली होती. या विद्यार्थ्यांना बाहेर काढल्यावर राज्यपालांनी 'चारित्र्यसंवर्धनानेच राष्ट्र मोठे होते' असा विद्यार्थीजनांना उपदेश केला.

दरम्यान विरोधी पक्ष मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करतच होते. लोकक्षोभ वाढत होता. शेवटी शुक्रवार ७ मार्चला शिवाजीरावांनी राजीनामा दिला. मंत्रिमंडळ बरखास्त झालं.

निलंगेकर, डावळे, डॉ. रावळ यांनी खंडपीठासमोर अपील दाखल केलं. त्याच वेळी, राज्यपालांच्या राजीनाम्याचे ढग गोळा होऊ लागले होते. १० मार्चला शिक्षकांच्या संघटनेने राज्यपालांच्या राजीनाम्यासाठी विद्यापीठापुढे धरणं धरलं. २४ मार्चला मुंबई विद्यापीठाच्या सीनेटने एक अभूतपूर्व बैठक घेऊन राज्य सरकारने विद्यापीठावर आणलेल्या दबावाचा निषेध केला. २७ मार्चच्या, 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या अग्रलेखाचं

शीर्षक होतं, 'गव्हर्नर मस्ट गो.' आणि अठ्ठावीस मार्चला राज्यपालांनी 'प्रकृतीच्या कारणास्तव' राजीनामा दिला.

न्या. पेंडसेंचा निकाल आला त्याच्या दुसऱ्या दिवशी मी आणि महेश ठाण्याला घरी जाण्यासाठी लोकलमध्ये शिरलो, तर लोकांनी आम्हाला चक्क बसायला जागा वगैरे करून दिली. दोन दिवसांतच आमच्या रूमवर पत्रांचा एक बारीक ढीग साचला. त्यातलं एक पत्र कुणा गोस्वामी नामक व्यक्तीचं होतं. ही व्यक्ती गोस्वामी आडनावाचा इतिहास लिहीत होती. आणि तुम्ही आजचे गोसावी म्हणचे पूर्वीचे गोस्वामीच– तेव्हा तुमचा 'बायो-डाटा' पाठवा, असं ते आग्रहाचं पत्र होतं.

अर्थात, खंडपीठासमोर हे प्रकरण आलं. शिवाजीरावांवरचा 'निष्कर्ष' या निकालानंतर निव्वळ 'शेऱ्यांच्या' पातळीवर उरला. डॉ. रावळ यांच्या दोषामधून जरी त्यांची मुक्तता झाली नसली, तरी त्यांना परीक्षक म्हणून कायमचे बाद करण्याचा खालच्या कोर्टाचा निर्णय खंडपीठाने विवक्षित कालावधीपुरता मर्यादित ठेवला. नापास झालेल्या बारा विद्यार्थ्यांपैकी दहा जणांना पास करण्यात आलं. दरम्यान महेशवर 'परज्यूरी'ची केस लावण्यात आली व खंडपीठाच्या निर्णयाविरुद्ध शिवाजीरावांनी सर्वोच्च न्यायालयात अपील केलं. पुन्हा तेच टेन्शन. तसेच पैसे जमवणं. महेशच्या दिल्लीच्या वाऱ्या सुरू झाल्या.

आज हा मजकूर लिहितांना सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा यायचा आहे. दरम्यान, हे सारं प्रकरण सुरू झाल्यापासून परीक्षा झाल्या, त्यांना महेश बसू शकलेला नाही. त्याला अजून एम. डी. व्हायचं आहेच.

तेव्हा आता हे सारं कुठं संपणार कुणास ठाऊक!

सप्टेंबरात महेश दिल्लीला जायला निघाला तेव्हा आदल्या रात्री एक खादीधारी, वृद्ध कार्यकर्ते भेटायला क्वार्टर्सवर आले. ते महेशला म्हणाले, 'आता खूप झालं डॉक्टर. कशाला जाताय तुम्हीसुद्धा कोर्टात....मिटवून टाका. नाहीतर तुम्ही सुप्रीम कोर्टात लढू नका. मगच आपल्याला तुमच्यावरची परज्यूरीची केस मागे घेण्याबद्दल काहीतरी करता येईल.'

'का, असं का?' महेश.

'त्यांच्या प्रेस्टीजचा प्रश्न आहे तो! ते म्हणाले.

'प्रेस्टीज फक्त त्यांना आहे आणि मला सामान्य माणसाला नाही?....' महेश उसळून म्हणाला.

महेशच्या केसांमधला एक हिस्सा चक्क पांढरा दिसायला लागला आहे. सगळे कपडे त्याला सैल व्हायला लागले आहेत. अधूनमधून तोही कंटाळतो. पण जिद्द अजूनही आहे. दिल्लीमध्ये रहाताना पैसे वाचवण्यासाठी तो केळी खाऊन रहातो आहे. या साऱ्यातून कुठं मला त्याला 'हीरो' बनवायचा नाही आहे....सामान्य माणसामधली असामान्य वृत्ती प्रज्वलित होण्याच्या काही वेळा असतात. तसं इथं झालं. आणि प्रत्येक टप्प्यावर ते मी जवळून पाहिलं. लोक म्हणतात की एक इतिहास घडला. कदाचित हे फारच अतिशयोक्तिपूर्ण असेल. पण एका माणसाचा लढा इतरांना बरेच काही शिकवून जाणारा असतो, एवढे जरी आपल्याला जाणवलं तरी खूप आहे.....नाहीतर नेहमीचा राग, नैराश्य आणि ताल कृतिशून्यता आहेच सोबतीला.

(टीप : या लेखातील सर्व माहिती, न्यायालयापुढे सादर झालेले साहित्य, वृत्तपत्रे व मासिके यांची कात्रणे व संबंधित व्यक्तींच्या मुलाखती यांवर आधारित आहे.)

थ्री चिअर्स फॉर हिप्पोक्रॅटिस !

साठीच्या पुढे वय झालेल्या त्या भव्य, दगडी इमारतीला पाहिल्या-वरच त्याच्या छातीत धडकी भरली. लांबच लांब पॅसेजमध्ये येणारा प्रकाश अंधाराला अधिक गडद करत होता. पॅसेजच्या लांबच लांब कमानी आणि दगडी कट्टे. कट्ट्यावर जिकडे तिकडे मुलामुलींची टोळकी होती... बरं झालं, बरोबर येताना बाबांना घेऊन आलो ते. त्याने फी भरली. या काउंटरवरून त्या काउंटरवर भटकून 'आय-कार्ड' ताब्यात घेतलं....नवीन विद्यार्थ्यांसाठी सूचना लिहिली होती....थिएटर नंबर तीनमध्ये लेक्चर सुरू झालेलं होतं. रेल्वेचं कन्सेशन घेण्यात अजून थोडा वेळ गेला. वडिलांना तळमजल्यावरच थांबवून तो दुसऱ्या मजल्यावरच्या थिएटर नंबर तीनकडे जायला निघाला. नेहमीच्या दुप्पट असलेल्या जिन्यांमुळे ती इमारत जास्तच अंगावर येत होती. दुसऱ्या मजल्यावरच्या शिपायाने त्याला हटकलं. 'ते....थिएटर नंबर तीन....' तो चाचरत म्हणाला. शिपायाने बोटानेच दरवाजा दाखवला. तो दरवाजापाशी गेला. त्याने दरवाजा उघडला....आणि....

तो जबरदस्त दचकला. घामाघूम व्हावं इतका दचकला...तो त्या थिएटरच्या एका उंच टोकाला उभा होता. उतरत खाली जाणाऱ्या खुर्च्यांच्या रांगा त्याच्यासमोर होत्या आणि अगदी तळाशी, पांढराशुभ्र ॲप्रन घातलेले भेदक डोळ्यांचे एक प्रोफेसर अस्खलितपणे काहीतरी बोलत होते....हे असंच सारं त्याने निदान तीनदा तरी या आधी स्वप्नात पाहिलं होतं....काय बरं दिसलं असावं? त्याच्या अंगावरचा काटा अजून निवला नव्हता. तो कसातरी शेवटच्या खुर्चीत टेकला....मेडिकल कॉलेजातला त्याचा पहिला दिवस हा असा सुरू झाला....

लहानपणापासूनच तो, 'डॉक्टर व्हायचंय मला....' असं सांगायचा. पण खरं म्हटलं तर त्याने यापेक्षा जास्ती काहीच विचार केला नव्हता.

मेडिकलला येणारी मुलं त्यावेळेला अगदी जाणीवपूर्वक किंवा विचारपूर्वक ही लाईन घेत असतील यावर त्याचा विश्वास नव्हता....त्याला खारे शेंगदाणे आवडायचे. म्हणून त्याचा मोठा भाऊ त्याला लहानपणी चिडवायचा की, हा डॉक्टर झाल्यावर दवाखान्यात शेंगदाण्यांची बरणी भरून ठेवणार म्हणून...त्याला गप्पा मारणारे डॉक्टर आवडायचे. अगदी लहानपणी 'लंबर पंक्चर' करण्यासाठी त्याच्या कमरेत घुसवलेली सुई आणि डॉक्टर त्याला पक्के आठवत होते. ती आठवण अर्थातच फारशी सुखद नव्हती. मुलांशी खेळू शकणारे डॉक्टर्स संख्येने नेहमीच कमी का असतात ? असे अनेक प्रश्न घेऊनच तो त्या आवारात शिरला होता.

लेक्चर संपलं. मराठी मिडियमच्या मुलाला, उच्च इंग्रजीतलं लेक्चर जेवढं कळेल तेवढं ते त्याला कळलं होतं....त्यात हिप्पोक्रॅटिस हा वैद्यकशास्त्राचा आजोबा होता हे एक त्याच्या पक्कं ध्यानात बसलं होतं.... जिन्यावरून उतरताना फॉर्मेलीनचा वास नाकात घुसला आणि त्याला मळमळायला लागलं. या 'ॲनेटॉमी डिसेक्शन 'बद्दल त्याला लोकांनी सांगितलं होतं....बेवारशी शवांचं विच्छेदन करणं हा भाग फारसा आवडणारा नव्हताच.

ॲनेटॉमीतले शिपाई त्या संभारात सहजतेने वावरत होते. एका कोपऱ्यात पिंपे होती मोठी. त्यात चांगले 'डिसेक्ट' केलेले 'बॉडी पार्टस्' ठेवलेले....अगदी पहिल्यांदा ज्याने हे सारं विच्छेदन केलं असेल त्याचं धैर्य किती मोठं असेल....मायकेल ॲंजेलो आणि लिओनार्डोसारखे कलाकारही विच्छेदन करायचे हे त्याने वाचलं होतं...त्याला गंमत वाटली. वैद्यकशास्त्र आणि चित्रकला, या दोघांनाही 'ॲनेटॉमी 'ची गरज भासावी.

त्यानंतर आठ दिवसांनी 'ग्लोव्हज' वगैरे घालून त्याने डिसेक्शनला स्वतःला रुळवून घेतलं. दोन महिन्यात, ग्लोव्हजशिवाय हाताने तो अवयव सहज हाताळायला लागला....कधीकधी अगदी धसमुसळेपणी.... 'ॲब्डोमेन 'मधल्या भागांना एकमेकांपासून दूर करण्याच्या प्रयत्नात तो असताना, एकदा पाठीवर थाप पडली. मागे त्याचे प्रोफेसर उभे होते,

'वुईथ अ डेलीकेट टच माय बॉय...' ते म्हणाले.

'इटस् अ डेड बॉडी सर....' त्याचा पार्टनर पचकला.

'हाऊ विल यू रिस्पेक्ट अ लिव्हींग बॉडी, इफ यू डोन्ट रिस्पेक्ट द डेड ?....' या सरांना डोळे मिचकावून हसण्याची सवय होती. ते हसले आणि त्यांनी अगदी नाजूक बोटांनी त्याला हवा तो भाग, सुटा करून दिला . मग तो त्या मृत शरीराकडे बराच काळ पाहत राहिला.

'सोशल' नावाच्या प्रकाराबद्दल उत्सुकता म्हणून तो, त्या संध्याकाळी नेहमीच्या कपड्यातच एका हॉलवर पोहोचला. तर सारेजण कसे झकपक पोशाखात होते. मुलामुलींचं खेळीमेळीचं वागणं त्याला नवीन होतं. ओळखीचे झालेले चारदोन चेहरे; त्यांच्या बळावर तो एका खुर्चीत बसला. पाश्चात्य संगीत आणि त्याच्या तालावरचा धांगडधिंगा नाच हा प्रकार सुरू झाला. त्यांच्या कॉलेजात, आंग्लाळलेल्या मुलामुलींना 'स्यूडस्' म्हणायचे. 'स्यूडो' म्हणजे 'खोटे'! त्याला ते नाव आवडलं. हातात आलेल्या पेपर डिशमधले पदार्थ त्याने आज्ञाधारकपणे खाल्ले, थम्स–अप प्याला. मग कंटाळून ते दोघेचौघे जण बाहेर पडले. आणि सरळ हॉस्टेलला आले....

हॉस्टेलच्या खोलीतला त्याचा पार्टनर त्याला साडेचार वर्षे सिनिअर होता. त्याची इंटर्नशिप चालली होती. ती संपली की तो साऊथ आफ्रिकेमध्ये पळणार होता. हा माणूस भयंकरच एकलकोंडा होता. तरीही त्याने सवयीने त्याला बोलका केला. त्याच्याकडून एकंदरच कॉलेजबद्दलच्या 'टिप्स' मिळायच्या....'ये सोशल–बिशल अपने लिए नहीं है' तो म्हणायचा. कॉलेजची गेल्या दहा वर्षांची नियतकालिकं त्याच्याकडे होती. ती वाचताना, त्याला 'मराठी वाङ्मय मंडळ' नावाचं मंडळ कॉलेजात असल्याचं कळलं. अंधाऱ्या कोपऱ्यातला मराठी 'भित्तिपत्रका-' चा बोर्डही सापडला. त्यावर लावलेली एका वक्तृत्व स्पर्धेची नोटीस त्याने वाचली. नाव पाठवून दिलं....त्यांच्या टीमला चक्क बक्षीसही मिळालं आणि त्याचा पहिला लेख भित्तिपत्रकावर लागला तेव्हा याला जरा बरं वाटलं.

आपापल्या शाळा–कॉलेजात खूप हुशार म्हणून गणली जाणारी

सगळीच मुलं या कॉलेजात एकत्र आल्यावर, प्रत्येकालाच प्रॉब्लेम यायचा. आपलं स्वतंत्र अस्तित्व टिकविण्यासाठी अभ्यासातली स्पर्धा सुरू व्हायची....तो या स्पर्धेतून, भाग न घेताच रिटायर्ड झाला. एकदा बोअर लेक्चर चालू असताना त्याने बसल्याबसल्या एक स्केच काढलं. ते शेजारच्या मुलाला खूप आवडलं. तो ह्याचा मित्र बनला. कुणीतरी त्याचा लेख वाचला. तो दोस्त झाला...अभ्यासात भरपूर स्पर्धा आहे म्हणून आपण 'शेल'मध्ये घुसता कामा नये एवढं त्याला पक्कं कळलं होतं. तो माणसं जोडत सुटला. हॉस्टेलच्या टी. व्ही. रूममध्ये बसताना तो शेजारच्याशी ओळख काढून बोलायचा.

त्याच्यावरची 'इनहिबिशन्स' हॉस्टेलमध्ये कमी होत असल्याचं त्याला स्वतःलाच जाणवायला लागलं. 'आयला–च्यायला' अशा शब्दांनी दचकायचे दिवस मागे पडायला लागले होते....गणपतीचे दिवस होते. हॉस्टेलमधल्या ग्रुपने नवीन टूम काढली की या वर्षी अनंतचतुर्दशीच्या गर्दीत नाचायला जायचं. चतुर्दशीच्या दिवशी सगळे पंधरा–सोळाजण बाहेर पडले. सगळ्यांनी कपाळाला अन् कमरेला सारख्या रंगाच्या रंगीत रिबिनी लावल्या होत्या....त्यांच्यातले चार-पाचजण खरोखरच अफलातून नाचणारे होते. कुठल्याही टूकसमोरच्या जमावात घुसून बॅन्जोच्या तालावर नाचायला सुरुवात करायची. गर्दीला चेहरा नसतो हे त्याला त्या दिवशी कळलं. हजारो लोकांच्या समोर भर टिळक पुलावर आपण नाचू शकतो....सोशलमधल्या त्या संगीतापेक्षा याची लय त्याला जाम आवडली होती.

रात्री दमून आल्यावर त्याला फार हलकं वाटलं. त्याच्याचसारखा त्याचा एक नवखा मित्र होता, पूर्ण शाकाहारी. त्यालाही तसंच हलकं वाटलं असणार. कारण त्याने रात्री हॉटेलात, आयुष्यात प्रथमच मटणाचा रस्सा चापला.

कॉलेजात येऊन वर्ष पूर्ण झालं आणि ज्युनियर्सची नवी बॅच दाखल झाली. आता, सिनियर झाल्याच्या आवेशात तो, नवीन दिसणाऱ्यांपैकी, खास गोड चेहरे शोधायला लागला....अजून मुलींशी मैत्री वगैरे नव्हती तरी

ओळखी बऱ्याच जणांशी झाल्या होत्या. त्याच्या मित्रांनी, एका ज्युनियर मुलीला पाहून, त्याला 'चढवायला' सुरुवात केली आणि कुणीतरी चढवायची वाटच पाहत असल्यासारखा हा चढलादेखील. ती आणि तिची मैत्रीण यांना कँटीनमध्ये नेल्यावर त्याची नजर सारखी इकडेतिकडे भिरभिरत होती. लोकांनी आपल्याला पाहिलं तर, वगैरे वगैरे....ती सेंट्रल रेल्वेनेच येते-जाते हे कळल्यावर तो नेमकी तीच गाडी पकडण्यासाठी धडपड करायला लागला. याच सुमारास त्याचे अभ्यासाचे दिवस यायला लागले होते आणि हा, तिच्या एका हसण्यासाठी धडपडत, कॅरिडॉरमधून इकडून-तिकडे भटकत असायचा. अभ्यासाची परिस्थिती 'बरी' होती एवढंच. बाकी बराचसा वर्ग अभ्यासाला लागलेला. त्याला ॲनेटॉमी अन् फिजीओलॉजीत 'लिमिटेड इंटरेस्ट' वाटत होता. त्याच्या दृष्टीने ही फक्त प्रवेशद्वारं होती. तो फार खोलात शिरून, परीक्षेसाठी फारसं काही पाठ करायचा नाही. त्यात तिच्या आठवणींनी त्याचं लक्ष उडायचं....

प्रिलीमचे रिझल्ट लागले आणि आठ दिवसांतच रमाकांतला हॉस्पिटलाच्या आर्टिफिशीयल किडनी युनिटमध्ये ॲडमिट केलं गेलं. रमाकांत एकदम शांत आणि स्कॉलर होता. तो 'गोल्ड मेडल' मिळवणार असं सगळ्यांना वाटत होतं....तो फारसा कुणाच्यात मिसळायचा नाही. रमाकांतचं म्हणे त्याच्याच वर्गातल्या एका मुलीवर प्रेम बसलं होत. तिने नकार दिला म्हणून त्याने कुठल्याशा गोळ्यांचा ओव्हरडोस घेतला होता. डॉक्टर होणाऱ्याने मनाचा एवढा कमकुवतपणा दाखवावा....त्याच्यापुढे प्रश्न पडला. रमाकांतला, धोक्यातून बाहेर पडल्यावर, सायकीॲट्री वॉर्डमध्ये ट्रान्सफर केला होता. तिथून बाहेर पडून त्याच डेसमध्ये येऊन रमाकांत कँटीनसमोरच्या कट्ट्यावर सिगारेट पीत बसायचा....डोळे इतके निस्तेज झाले होते की त्याच्याकडे पाहणं मुश्कील व्हायचं....

रमाकांतला कट्ट्यावर बसलेला पाहिल्यावर एक परिणाम चांगला झाला होता.... तिचे विचार सगळे धुतले जाऊन त्याने अभ्यास सुरू केला होता.

परीक्षा झाल्यावर, म्हणजे जवळ जवळ दोन महिन्यांच्या गॅपनंतर ती दिसली तेव्हा त्याला काहीच 'वाटलं' नाही....दॅट वॉज इनफॅच्युएशन!

सेकंड एम्‌बीबीएस्‌ म्हणजे धमालीचं वर्ष....पहिल्यांदा हॉस्पिटलच्या इमारतीमध्ये प्रवेश केल्यावर त्याला धन्य धन्य वाटलं. आता त्यांची बॅच वीस-पंचवीस मुलामुलींची होती. वेगवेगळ्या विषयांच्या 'क्लिनिकल टर्मस्‌' असायच्या. एखाद्या पेशंटला; अमुक काही आहे म्हटल्यावर त्या पेशंटवर सारे झुंडीने चाळून जायचे. तो यात मागे-मागेच असायचा. तपासणी करताना हे लचके तोडणं त्याला आवडायचं नाही. कुणीच पेशंटशी गप्पा मारायचे नाहीत. त्याला लोकांशी बोलायला आवडायचं. अर्धांग झालेला पेशंट जेव्हा त्याच्या आजारपणाबद्दल बोलतो तेव्हा, त्याच्या डोळ्यांना पाण्याची किनार येते हे त्याला समजायचं.

पेशंटना हे लोक असे 'केसेस' म्हणून का वागवतात?....मग, त्याला आवडणारे शिक्षक ठरवताना, ज्ञानाबरोबर नकळत पेशंटशी हा शिक्षक कसा वागतो याचाही तो विचार करायला लागला. वॉर्डामध्ये केसेस 'प्रेझेंट' करायला लागणं हे फार अवघड वाटायचं. एवढं सारं इंग्रजी बोलणं आणि तेही सहजतेने; फार कठीण जायचं....त्याने प्रथम 'ॲक्सेंट' मारून इंग्रजी बोलायचा प्रयत्न केला. अर्थातच तो जबरदस्त फसला....मग त्याने बराच काळ विद्यार्थी-डॉक्टर्स इंग्रजी कसं बोलतात हे निरखून पाह्यला सुरुवात केली आणि त्याचा उपयोग झाला.

दरम्यान, मराठी वाङ्मय मंडळाचं चिटणीसपद (दुसरा कोणीच उमेदवार नसल्याने) त्याला अन्‌ त्याच्या रूम-पार्टनरलाच मिळालं. हा नवा पार्टनर त्याच्याच वर्गातला, एकदम व्यवस्थित!....पावसाळ्याचे दिवस होते. ते दोघे आणि त्यांचा एक तिसरा, कडक्या मित्र हॉस्टेलच्या रूमवर वाङ्मय मंडळाच्या योजनांबद्दल बोलत होते. कडक्या कधीमधी सिगारेट ओढायचा. तशी त्याने सिगारेट शिलगावली. तो आणि पार्टनर, दोघांच्याही मनात, एकाच वेळी, एकच इच्छा झाली. त्यांनी कडक्याकडे सिगारेट मागितली...कडक्या खोलीच्या दाराला कडी लावायला जातोय तेवढ्यात पार्टनरने सिगारेट पेटवून दम हाणलादेखील....पार्टनरला अजिबात खोकला न आलेला पाहून कडक्या म्हणाला, 'याने आधी ओढली असणार...' ते असो. तर अशा तऱ्हेने आयुष्यातली पहिली सिगारेट त्याने ओढली...त्यावेळी त्याला भयंकर, स्वतंत्र वगैरे

काही वाटलं नाही....जगावेगळंही वाटलं नाही. खोटं कशाला बोला, त्याला सिगरेटची चव थोडी आवडली देखील....

त्याने आणि पार्टनरने वाङ्मय मंडळाच्या भित्तिपत्रिकेचं स्वरूप बदलूनच टाकलं. त्याने नेहमीच्या ठुकार कविता-लेखकांच्या जागी, अगदी आजूबाजूच्या कॅम्पस्मधल्या विषयांना हात घालून, त्यावर खास अंक काढायला सुरुवात केली. कॅम्पस्मधल्या 'चेन स्मोकर' डॉक्टर्सवर त्यानी अंक काढला, 'काही अग्निहोत्री'! जे प्रेमप्रकरणात प्रस्थापित होते त्यांच्यावर अंक काढला, 'काही प्रेमवीर'....बुवाबाजी, अंधश्रद्धा इथपासून टेस्टट्यूब बेबीपर्यंत वेगवेगळ्या विषयांवर कॅम्पस्मधल्या व्यक्तींनाच लिहायला सांगितलं....त्याने स्वतः 'आकाशभाषिते' नावाचं सदर सुरू केलं आणि नोटीस बोर्डासमोर गर्दी जमताना पाहून, पार्टनर अन् तो कृतकृत्य झाले. संपूर्ण वर्षात त्यानी पंचवीस अंक काढले. त्या अंकातल्या उत्तम साहित्याचं एक 'डायजेस्ट' त्यांनी सायक्लोस्टाईल्ड स्वरूपात चार-चार आण्यांना विकून वर्षभरात भित्तिपत्रकावर झालेला खर्चही भरून काढला.

सेकंड एम्बीबीएसला आल्या आल्या त्याची ओळख सरांशी झाली. अत्यंत 'अभ्यासू' वातावरणाच्या हॉस्पिटलात, त्याची बॅच काहीतरी नवीन करतेय म्हटल्यावर सरांना मनापासून आनंद झाला होता.... सरांच्या खूप ओळखी होत्या. मंडळाच्या कार्यक्रमांसाठी, मोठ्या व्यक्ती आणण्यासाठी तो आणि पार्टनर सरांबरोबर इथे-तिथे जायला लागले.

अण्णांच्या घरी कार्यक्रम ठरवायला ते गेले तेव्हा तो अन् पार्टनर पुरते दबून गेले होते....शांत संध्याकाळ होती. सुरेख हवेशीर गच्ची होती. गच्चीच्या एका टोकाला पाण्याची टाकी होती. आणि त्यावर रिकाम्या बाटल्यांची रास होती....'ये बच्चोंके लिए ऑरेंज ज्यूस....' असं म्हणून अण्णांनी त्यांच्या हातात ज्यूसचा ग्लास दिला. तो कोपऱ्यात बसून शांतपणे ती मैफल निरखीत होता. मधूनच अण्णा मनस्वीपणे बोलायचे. छान बोलायचे. त्या बैठकीत त्याच्याहून वयाने थोडा मोठा असा एक मुलगाही होता. एका प्रसिद्ध गायकाचा मुलगा तो. गायक असणारा. हळूहळू दारूने त्या मुलाला कार्बाज केलं....'मला लोक

माझ्या वडिलांच्या नावाने ओळखतात. का ? माझ्यातसुद्धा कला आहे....' सगळेजण त्या मुलाला समजावण्याच्या प्रयत्नात.

तो सगळ्यांना निरखत होता....क्रिएटिव्ह माणसांची दुखणी पाहत होता.. क्रिएटिव्ह माणसांचे मूड पाहत होता.

कार्यक्रमाला अण्णा आले. मुलाखत घ्यायला तो आणि अजून एक मुलगा, एक मुलगी होती. स्वभावानुसार अण्णांनी मध्येच त्या दोघांना काहीतरी धारदार बोलून गप्प बसवलं. त्याला घाम फुटला. पण अण्णांचे मूड सांभाळत, सगळे प्रश्न स्वतःच विचारत त्याने कार्यक्रम तडीला नेला.

दुसऱ्याच दिवशी एका प्रतिष्ठित मासिकाने त्याची लघुकथा स्वीकारल्याचं पत्र आलं. फार्मेकॉलॉजीच्या टेस्टमध्ये दांडी उडाल्याचं निकालपत्रही त्या दिवशी नोटीस बोर्डावर लागलं.

लेका, तू काय लिहिलं आहेस, तुला ठाऊक आहे का ? तू एक सुरेख एकांकिका लिहिली आहेस !' विजयसर त्याला म्हणाले. त्याने सहज म्हणून, प्रथमच लिहिलेली एक एकांकिका भीत-भीत विजयसरांना वाचून दाखवली होती. विजयसर एका मोठ्या कंपनीतले मॅनेजर. पण ते हौशी रंगभूमीवरचे दिग्दर्शक होते. तो त्यांना जाऊन भेटला होता. अन् मेडिकल कॉलेजात त्याने विजयसरांचं पंधरा दिवसांचं नाट्यशिबिर ठेवलं होतं. त्यांचा पूर्ण ग्रुप आता नाट्यप्रेमाने ओथंबला होता.... तर ते नाटक इंटर-कॉलेजिएटला करायचं ठरलं. कॉलेजात, दरवर्षी एकांकिका-नाटकं करणारा अजून एक ग्रुप होता. त्यांनाही एकांकिका करायची होती. त्या मानाने तो, पार्टनर हे सारेच नवशिके. शेवटी असं ठरलं, एका स्पर्धेत ह्यांच्या ग्रुपने नाटक करायचं, दुसऱ्या स्पर्धेत त्यांच्या ग्रुपने. आता त्याला (आणि याच्या ग्रुपला) अशी आव्हानं पेलायला मजा वाटायला लागली होती. त्या ग्रुपचं नाटक फायनलला आलं, पण तिथे गळलं. ह्याचं नाटकही फायनलला आलं.

फायनलच्या प्रयोगाच्या संध्याकाळी त्याला प्रचंड टेन्शन आलं.... प्रयोग चालू असताना तर तो पडद्यामागे येरझारा घालत होता. त्या

अंधारात, त्याने कुणीतरी तिथे ठेवलेले काचेचे ग्लाससुद्धा फोडले. स्टेजवर चाललेल्या हालचाली, संवाद त्याला ऐकू येत होते, कळत होते....त्याने निर्मिलेलं काहीतरी चांगलं लोक पाहत होते.

टाळ्यांचा कडकडाट झाला. नाटकानंतरच्या आवराआवरीला सुरुवात झाली आणि मग, त्यांच्या कॉलेजचा सगळा घोळका प्रेक्षकात एकसंधपणे बसला. इंटर कॉलेजिएट स्पर्धांचे निकाल जाहीर होतानाचं औत्सुक्य आणि तणाव जबरदस्त असतो....जल्लोष तर त्याहून जबरदस्त आणि स्पर्धा अतिशय आक्रमक.

त्याच्या नाटकात मुख्य कलाकार तीन.... त्यातल्या दोघांना बक्षिसं जाहीर झाली. ह्याला लेखनाचं अन् दिग्दर्शनाचं बक्षीस मिळालं....मग नाटकाची बक्षिसं जाहीर व्हायला लागली. तिसरा नंबर जाहीर झाला, दुसरा नंबर....आणि आता सर्वोत्कृष्ट एकांकिका....त्याचे ठोके थांबल्यागत झाले आणि....पुढल्या क्षणी त्याच्याभोवती प्रचंड जल्लोष होता. त्याचं नाटक पहिलं आलं होतं.

अक्षरशः वाजत-गाजत, चषक घेऊन ते हॉस्टेलवर आले. झोपायला दोन वाजले. सकाळी उठून जर्नल्स पूर्ण करायला तो बसला. पेडिॲट्रीक्सची टर्म चालू होती. तिथले मुख्य डॉक्टर खूप सिनियर, म्हातारे होते. त्याच्या लहानपणी तो त्यांच्याकडे एकदा पेशंट म्हणून पण गेला होता. असं त्याच्या आई-वडिलांनी त्याला सांगितलं. ओपीडीमध्ये त्यांच्या बॅचमधले विद्यार्थी इतर डॉक्टरांच्या डोक्यावरून, पेशंटसचं निरीक्षण करायचे. एखादी केस घेऊन नंतर ती केस मोठ्या डॉक्टरांना 'प्रेझेंट' करायचे....टर्मच्या शेवटच्या दिवसापर्यंत त्याने अशा चार-पाच केसेस, मोठ्या डॉक्टरांना प्रेझेंट केल्या होत्या. एक केस होती, स्वप्नांमुळे दचकून उठणाऱ्या सात वर्षांच्या छोट्याची, दुसरी होती अंथरुणात शू करायची सवय लागलेल्या आठ वर्षांच्या बेबीची, तिसरी होती छातीत धडधडतं असं सांगणाऱ्या बारा वर्षांच्या मुलाची आणि चौथी नखं खाण्याची अनिवार सवय असलेल्या छोट्याची....त्याला या सगळ्या मुलांबरोबर, त्यांच्या पालकांबरोबर बोलताना खूप मजा आली. त्याने त्या केसेस व्यवस्थित इंग्रजी बोलून 'प्रेझेंट' ही केल्या. टर्मच्या शेवटच्या दिवशी,

ते मोठे डॉक्टर, त्यांच्या बॅचला शेवटचं लेक्चर देत होते. लेक्चरनंतर त्याला बाजूला बोलवत ते म्हणाले, 'बॉय, आय वॉज गिव्हिंग यू स्फेसिफीक केसेस फॉर लास्ट वन मन्थ....डिड यू अंडरस्टॅन्ड ?'

त्याने मान हलवली.

'तुला काय वाटतं, का दिल्यात मी या केसेस तुला....'

'मला वाटतं सर, या सगळ्या केसेसमध्ये त्या मुलीचा विश्वास संपादन करणं, त्यांच्याशी बोलणं खूप महत्त्वाचं होतं.'

'दॅटस् इट....आय ऑब्झर्व्हड, पीपल ओपन अप व्हेरी इझीली इन फ्रंट ऑफ यू...डेव्हलप धिस क्वालिटी....' त्यांनी त्याच्या खांद्यावर थोपटलं....त्याला स्वतःबद्दल काहीतरी नवीन कळल्याची जाणीव झाली.

त्यांच्या वर्गात 'सिक्रेट क्लिनिक्स'ची फॅशन मूळ धरू लागली होती. ओळखीच्या रजिस्ट्रार-लेक्चररला गाठून फक्त आपल्या मित्रांपुरती गुप्त लेक्चर्स ठरवणे याला म्हणतात 'सिक्रेट क्लिनिक्स'.... त्याच्या वर्गात 'सर्जरी' हा विषय आवडणारी मंडळी भरपूर. साहजिकच तिथे प्रचंड स्पर्धा. तिथल्या क्लिनिक्सचा खास जोर....सर्जरी टर्म करत असताना शस्त्रक्रिया पाह्यला मिळावी, यासाठी सगळ्यात चांगली जागा मिळवायला सगळे धडपडायचे. त्याला मात्र ऑपरेशन थिएटरचं ते वातावरण मोठं वेगळं अन् मजेदार वाटायचं. सर्जन-ॲनेस्थेटिस्ट थिएटरमध्ये मोठ्याने हसतात, विनोद करतात, गाणी म्हणतात हे सारं त्याला नवं होतं. ऑपरेशनचं दृश्य हिंदी चित्रपटात सुरू होतं तेव्हा पाठचं गंभीर संगीत नेहमीच टुरटूर करत असतं. इथे गंमत होती. एवढं करत असूनही काम करणारी बोटं हलत नाहीत, टाके चुकत नाहीत. एक सर तर कोपऱ्यामध्ये कॅसेट टेपरेकॉर्डरच लावून ठेवायचे.

एका सकाळी, ऑपरेशनसाठी म्हणून पेशंटला टॉलीवर घालून थिएटरमध्ये आणलं. तो पेशंट काकुळतीने डॉक्टरांना म्हणाला, 'एक विनंती मान्य कराल....आज ऑपरेशन करू नका. मला असं का वाटतं ते सांगता येत नाही. पण आज ऑपरेशन झाल तर मी काही वाचत नाही....' तो पाहात होता. डॉक्टरांनी त्याला चक्क परत वॉर्डात पाठवलं.

'चांगली केस फुकट गेली' म्हणून त्याच्या बॅचमधली काही डोकी चुटपुटली, आणि 'दुसऱ्या टेबलावर थायरॉईड आहे' हे कळल्यावर तिथे पळाली.

तो डॉक्टरांच्या मागे उभा होता. डॉक्टर वळताच त्याने विचारलं,

'सर, तुम्ही हा निर्णय का घेतलात....'

डॉक्टर हसले, म्हणाले, 'मी असं पाहिलंय की जेव्हा पेशंट इतक्या काकुळतीने ऑपरेशन पोस्टपोन करायला सांगतो, तेव्हा तसं करणं चांगलं....'

'पण का....'

'जर आपण ऑपरेशन केलं तर पोस्ट ऑपरेटिव्ह रिकव्हरीत काही ना काही अडचण येतेच....काहीतरी कॉम्प्लिकेशन होतंच.'

तो पाहतच राहिला.

'ही अंधश्रद्धा समजू नकोस. जगण्याची इच्छा, जीवनेच्छा, धिस वुईल ट्रू लिव्ह, जागवणं हे आपलं कर्तव्य आहे. आता मी या पेशंटबरोबर संध्याकाळी बसून त्याला मानसिक दृष्टीने शांत करेन. मग आहेच ऑपरेशन....धिस वुईल ट्रू लिव्ह, ऑलवेज कॉंट्रिब्यूट्स इन पोस्ट ऑपरेटिव्ह रिकव्हरी.'

खूप काही कळल्यासारखी त्याने मान हलवली.

त्याच रात्री, 'इमर्जन्सी' म्हणून तो रात्रभर वॉर्डात इकडेतिकडे फिरत होता, पाहात होता. बारा वाजता त्याच्या मित्रांनी टूम काढली, 'चला, कॅज्युअल्टीत जाऊन केसेस पाहू या.'

निरंतर सेवेचा हा अपघात विभाग दिवसाचे चोवीसही तास गजबजलेला असायचा. तिकडे कॅज्युअल्टी मेडिकल ऑफिसर (सी. एम्. ओ.) आणि इंटर्नशिप करणारे डॉक्टर असायचे. रात्रीचे बारा वाजलेले. दणादणा आवाज करणाऱ्या एका ट्रॉलीवर एका माणसाला घालून, ट्रॉलीवाल्यांनी कॅज्युअल्टीत प्रवेश केला. त्या माणसाला श्वास घ्यायला त्रास होत होता. सी.एम्.ओ.ने तपासलं ....अचानक 'कार्डिॲक ॲरेस्ट.' पेशंटची हृदयक्रिया बंद पडली. सी.एम्.ओ.ने इंजेक्शने दिली. कार्डिॲक मसाज केला....पण, पेशंट ट्रॉलीवरच दगावला. खूप प्रयत्न, धावपळ

करावी आणि ती निष्फळ ठरल्यावर एकदम कमनशिबी शांततेने साऱ्यांना घेरावं असं झालं....फक्त त्या पेशंटची बायको मात्र जणू काही झालेलंच नाही अशा खरात त्या पेशंटला उठवायचा प्रयत्न करत होती, बोलत होती. नवरा मृत्यू पावला आहे हे वास्तव तिने नाकारलं होतं....तिचं ते 'नॉर्मल' बोलणं त्याला असह्य झालं. तो हळूच सी.एम्.ओ.ला म्हणाला, 'त्याला वाचवता येणं शक्य होतं?'

'कुणाला, मला?....हे बघ, आपण देव नाही. आपण प्रयत्नात कसूर करायची नाही....बरे होणार असलेले पेशंट बरे होतातच, आपण फक्त त्यांना बरं व्हायला मदत करतो....ते आपल्याला देव मानतात हा त्यांचा मोठेपणा. आपण स्वतःसुद्धा जर तसंच मानायला लागलो स्वतःला तर गल्लत होईल!'

त्यांचे बॅचमेटस सी. एम्. ओ. ला इन्ट्रॉकार्डिॲक ॲड्रीनॅलीनबद्दल विचारत होते. ते सारं त्याच्या कानावरून जात होतं. 'ती' ट्रॉली पुन्हा खोलीबाहेर गेली. तिचा आवाज नाहीसा झाला. तरीही तो ट्रॉली पाहतच होता.

फॉर्मेकॉलॉजीच्या थिअरीमध्ये दांडी बचावली आणि सेकंड एम. बी. बी. एस. पार पडलं. बाकीच्या विषयांमधले मार्क्स निःसंशय 'चांगले' म्हणता येण्यासारखे होते. थर्ड एम. बी. बी. एस. ची फर्स्ट टर्म म्हणजे, अजूनही अवांतर हालचालींचा भर ओसरलेला नव्हताच.... पाऊसकाळ आला अन् लोक विचारायला लागले, 'काय नाटककंपनी, काय करणार?' तो पुन्हा गिरमीट लावून बसला....खूपखूप वर्षांपूर्वी, एकदा त्याने त्याचा एक नातेवाईक मुलगा अन् त्याचा एक मित्र यांची वागणूक सतत दोनतीन दिवस पाहिली होती. त्याची स्मरणशक्ती फोटोसारखी असायची. त्यावेळी, त्या दोघांच्या वागण्यातला त्याला खूप ॲबनॉर्मल असं काहीतरी जाणवलं होतं. आता कळायला लागलं होतं, की ते दोघे होमोसेक्शुअल होते....भूतकाळातली आठवण उसळी मारून वर आली. त्याला एकांकिकेला विषय मिळाला. मग या विषयावरचे सारे मेडिकल रेफरन्सेस त्याने पालथे घातले. सायकीॲट्रीचा रजिस्टार होता डॉ. कुमार.

त्याच्याबरोबर चर्चा केली. ट्रिटमेंटला येणाऱ्या होमोसेक्शुअल पेशंटस्‌-बरोबर तो बोलला....अशा वेळी, आपण मेडिकलला आल्याचं जाम समाधान वाटायचं त्याला. आपण पुस्तकात वाचतो, पेशंटना तपासतो, त्यातून सृजन फुलणं हा अनुभव खूप मस्त वाटायचा.

त्याचं 'स्क्रिप्ट' तयार झालं....त्याचा मित्र चंदू हा चांगला 'दिग्दर्शक' होता. (असं चंदूचं, त्याचं आणि साऱ्या ग्रुपचं म्हणणं होतं.) पहिल्या एकांकिकेचं दिग्दर्शन त्याने केलं होतं तरी चंदू असायचाच. त्या वेळीच त्याला कळून चुकलं की आपण फक्त लेखक आहोत, दिग्दर्शक नाही. दिग्दर्शकाची ताकद, समज वेगळी असते. तेव्हा आपण 'ले. दि.' न होता फक्त 'ले.' राहावं. त्याची ही एकांकिकाही यशवंत ठरली. तीन पात्रं, दिग्दर्शक अन्‌ लेखक. साऱ्यांना बक्षिसं मिळाली. एका स्पर्धेत मिळालेला मोठा चषक घेऊन, ग्रुप रात्री हॉस्टेलवर आला.... 'अरे हे चषक पूर्वी कशाला वापरायचे ठाऊकाय.... शँपेन प्यायला' कुणीतरी म्हणालं.... चकाकणारा तो चषक समोर होता आणि शँपेनच्या किंमती-बद्दल, 'ती महाग आहे' एवढंच ठाऊक होतं.

'यात बियरच्या बाटल्या ओतल्या तर....' एक डोकं. लगेच सूचना उचलली गेली. त्या चषकात थंडगार बियरच्या सहा बाटल्या ओतल्या गेल्या. (चषक खरंच मोठा होता आणि मग साऱ्या ग्रुपने तोंडात 'स्ट्रॉ' धरले. एकाच वेळी दहा मुंडकी खाली वाकली आणि 'स्ट्रॉ' ने बियरपान सुरू झालं. चकाकत्या चषकावर बियरचं थंडगार दंव, बाहेरून दिसत होतं. त्याची पातळी हळूहळू उतरत गेली.

पैशाची कडकी असायची म्हणून, नाहीतर ते दुसऱ्या दिवशीही बियर प्याले असते. त्यांच्या वर्गाचा 'सी. आर.' म्हणून तो बिनविरोध निवडून आला होता, त्याने अर्ज भरलाय म्हटल्यावर इतर दोघं जण अर्ज भरणार होते त्यांनी ते मागे घेतले. आता त्याचा बराच वेळ वॉर्डात जायचा.

सेकंड एम्‌. बी. बी. एस. ला असताना, त्यांना 'पोस्ट-मॉर्टेम' पाहून त्यांचा अभ्यास करायचा असायचा. त्या 'प्रेतागारात' काम करणारा एक शिपाई, त्याला सर्जरीच्या वॉर्डात ॲडमिट झालेला भेटला. त्याच्या

पोटात पाणी झालं होतं. पोटातलं पाणी तपासण्याच्या सर्व तपासण्या, त्याच्यावर छान करता यायच्या म्हणून त्याच्या बॅचमेटसचा, त्या पेशंटच्या पोटावर डोळा असायचा. 'पर्कशन', 'फ्लुईड थ्रील' वगैरे नीट तपासता यायचं....तर त्याने त्या शिपायाला ओळखलं.. हा माणूस वीस वर्षे त्या प्रेतागारात काम करायचा. बाहेर पडलं तरी नाकपुड्यांमध्ये तोच तो कुजका वास घर करून राहणार. काम करणं अशक्य व्हायचं. कुणी-तरी सांगितलं की, 'नवटाक मार. वास जातो.' तिथपासून जे सुरू झालं ते वाढतच गेलं. दारूच्या वाढत्या प्रमाणाबरोबर, शरीराची दुर्दशा. लिव्हरला सूज आणि पोटात पाणी... केस प्रेझेंट करताना आपण म्हणणार, 'अल्कोहोलीक फॉर फिफ्टीन इयर्स.' पण तो का मद्यपाशात अडकला, याचा वैद्यकीय हिस्टरीशी संबंध नाही... शरीरावरच्या सर्व खाणाखुणा, तपासण्या नीट करता यायला हव्यात, त्यापेक्षा खोलात जायचं नाही. त्याची एकंदर बॅच याच विचाराची होती. तो गप्प बसायचा. मात्र एव्हाना त्याचं इंग्रजी त्याने प्रयत्नपूर्वक सुधारलं होतं. त्यामुळे शिक्षकांसमोर 'इंप्रेशन' बरं पडायचं.

त्याची टर्म नसली, आणि कुठल्याही वॉर्डात, इंटरेस्टिंग माणूस ॲडमिट झाला की तो तिथे धाव घ्यायचा. त्याचे सर्जरीचे आवडते सर एखादा 'बोलण्या' सारखा पेशंट आला तर त्याला ताबडतोब सांगायचे. त्यामुळे त्याचा संचार सर्वत्र असायचा. वृद्धत्वाच्या वेगवेगळ्या व्याधींनी ग्रस्त असलेले एक जुने कवी, त्याचे दोस्त बनले. ते त्यांच्या साध्या-सोप्या, रसाळ रचना त्याला ऐकवायचे. कच्च्या मिरच्या खाणारे पण उत्कटपणे कविता अभ्यासणारे, पहाडी आवाजाचे एक रचनाकार त्याच्या ओळखीचे झाले....रहस्यकथा लिहिणारे, कलंदर लेखक भेटले....नाटकाच्या जगात, स्वतःची लिव्हर पिंजून गेलेले नटवर्य पाहिले....गोड संगीतरचना करणारे पण पार थकून गेलेले संगीत-दिग्दर्शक त्याला भेटले.... अगदी मृत्यू-शय्येवरसुद्धा स्वतःच्या 'शिष्यिणीं'चा स्पर्श आधाशासारखा शोषून घेणारे महंतही त्याने पाहिले....हॉस्पिटलचं ते जग त्याला खूप शिकवून जात होतं.

कॉलेजच्या 'जनरल सेक्रेटरी' आणि जिमखान्याच्या इतर पोस्टच्या निवडणुका घोषित झाल्या अन् लोकाग्रहास्तव (आणि स्वतःलाही खुमखुमी होती म्हणून) त्याने 'जनरल सेक्रेटरी' च्या पोस्टसाठी अर्ज भरला.... अगदी नकळतच त्याला, त्याच्या प्रभावाचा अनुभव येत चालला. त्याच्यासाठी काम करायला, त्यांचा संपूर्ण वर्ग एक झाला होता. त्याचं संपूर्ण प्रचाराचं बजेट शंभर-दीडशे रुपयांपेक्षा जास्त नव्हतं. उरलेली सगळी रक्कम मित्रांनी पाच-पाच रुपये घालून उभी केली.

त्यांच्या कॉलेजातल्या निवडणुका खूप छान आयोजित केल्या जात. सर्वोत्कृष्ट प्रचार, सर्वोत्कृष्ट पोस्टर्स यांना बक्षिसं असत आणि त्या वर्षी तर जी. एस. (जनरल सेक्रेटरी) ची निवडणूक खासच रंगणार होती. त्याच्याविरुद्ध अजून दोन उमेदवार होते. दोघेही त्याच्यासारखेच स्वच्छ प्रतिमेचे अन् नॉनकॉन्ट्रव्हर्शियल' होते. प्रचाराच्या पहिल्या दिवसापासून, पोस्टरयुद्धाला सुरुवात झाली. प्रत्येक कागदी दगडावर त्याची एकएक 'ॲचिव्हमेंट' लिहून त्यांनी 'वॉल ऑफ ॲचिव्हमेंट' तयार केली, तर ताबडतोब प्रतिस्पर्ध्यांनी तसाच पण 'ब्रिज ऑफ ॲचिव्हमेंट' करून 'वॉल' च्यावर टांगला. त्याच्या ग्रुपने एक्कावन्न पत्ते रंगवून खाली, 'द मिसिंग एस....' असं लिहून त्याचं नाव लिहिलं....लगेच प्रतिस्पर्ध्यांनी त्या पोस्टरजवळ एक मोठ्ठा इस्पिक एक्का, प्रतिस्पर्ध्याचं नाव घालून लिहिला.

सकाळी नऊ वाजता आंघोळ-दाढी करून तो कॉलेजच्या कॅरिडॉरमध्ये उभा राह्यचा, मतदारांना भेटत. मग वर्गावर्गांत फिरायचा. संध्याकाळपासून नवी पोस्टर्स करणे, मित्रांबरोबर 'स्ट्रॅटेजी' आखणे, ही कामे मध्यरात्रीनंतरही चालू असायची. पार्टनरकडे सर्व मतदारांची यादी होती, त्यातले 'तरंगणारे' मतदार शोधून काढणं, त्यांच्यावर हृदयपरिवर्तनासाठी कुणाला बोलायला पाठवायचं यावर खल व्हायचे, हॉस्टेलच्या रूमला निवडणूक ऑफिसचं स्वरूप आलेलं.

फिजिओथेरपीच्या वर्गामध्ये तो एका मित्राबरोबर गेला. मुलींचा एक गट डबा खात बसला होता. त्यातल्या एका मुलीशी तो बोलत होता. 'मीच जी. एस. व्हायला का योग्य आहे' हे सगळं मुद्देसूदपणे सांगून

झाल्यावर त्याने तिचं नाव विचारलं....तिने नाव सांगितलं मात्र, त्याला एक कोडं सुटलं. या मुलीचा चेहरा ओळखीचा का वाटतो ते त्याला कळलं.

'तू लहानपणी जळगावला शाळेत होतीस?....

ती आश्चर्यानं 'हो' म्हणाली.

'तू तिसरीत अन् मी चौथीत असताना आपण एकत्र गाणं म्हटलं होतं, आठवतंय तुला ..?'

आता तिचा अगदी 'आ' वासला गेला होता. तेरा-चौदा वर्षांनंतर अचानकपणे भेटल्यावर त्याने तिला ओळखावं, पंधरा वर्षांपूर्वीचे सगळे संदर्भ व्यवस्थित द्यावे, याचं तिला भयंकर अप्रूप वाटलं. चांगल्या दहा मिनिटं गप्पा केल्यावर तीच त्याला म्हणाली, 'आता माझ्या ग्रुपबद्दल तू चिंता करू नकोस....'

बरोबरचा मित्र म्हणाला, 'तुझी मेमरी अगदी योग्य वेळी मदतीला आली.'

थोडक्यात, या ना त्या कारणाने तो माणसं जोडत पुढे जात होता. अन् प्रत्येक जोडल्या जाणाऱ्या माणसाबरोबर त्याचा आत्मविश्वास बळावत होता.

मतदानाच्या दोन दिवस आधी, मोठ्या लेक्चर हॉलमध्ये 'मॅनिफेस्टो स्पीचेस' व्हायचे. अध्यक्ष सरांनी, चुरशीची जागा जी. एस. ची म्हणून ती भाषणं, इतर जागांच्या नंतर ठेवली होती. त्यामुळे सारा हॉल खचाखच भरला होता. आद्याक्षरांच्या क्रमानुसार उमेदवारांना भाषणाला बोलवायचे. भाषण आवडलं नाही तर, कॉमेंटस्, बाण यांचा मारा व्हायचा. त्याचा एक प्रतिस्पर्धी त्याच्याआधी बोलला. उत्तम बोलला. त्याचं भाषण चांगलं ऐकलं गेलं. त्याचं नाव पुकारलं गेलं.

तो स्टेजवर, पोडियमसमोर उभा राहिला. शांत स्वरात, त्याची इंग्रजी भाषा अस्खलितपणे ओघ घेत होती....त्याला जाणवलं की तो सारा हॉल त्याच्या वाणीने कवेत घ्यायला सुरुवात केली होती. हॉलमधल्या प्रत्येकाला वाटत होतं, तो त्याच्याशीच बोलतोय म्हणून. त्याच्यातली एक नवीच ताकद तो अनुभवत होता. भाषण संपवता-संपवता तो शहारला.

एक सेकंद तसाच गेला. अन् मग टाळ्यांनी सारा हॉल दणाणला. त्याच्यानंतर बोलण्यासाठी म्हणून, दुसरा प्रतिस्पर्धी स्टेजवर आला तेव्हा अर्धा हॉल रिकामा झाला होता....'आता या भाषणानंतर ऐकण्यासारखं काही राहिलेलंच नाही' अशी प्रतिक्रिया.

मतदानाचा दिवस उजाडला. चकाचक दाढी घोटून तो मतदार-केंद्राच्या दाराशी सकाळपासून उभा होताच. संध्याकाळी एका बाजूला मतमोजणी सुरू असताना, दुसरीकडे, हिंदी चित्रपट दाखवला जायचा. प्रत्येक रिळाच्यानंतर, 'इलेक्शन बुलेटीन' दिले जायचे. त्यामुळे पिक्चर-साठी खचाखच गर्दी.

पिक्चर सुरू झालं, मतमोजणी सुरू झाली. तो एकटाच रूमवर आला. शांतपणे कॉटवर पडला. का कोण जाणे, त्याला लख्खपणे असं वाटलं की यश त्याचं होतं. त्याने कोपऱ्यातला ड्रॉईंग पेपर घेतला आणि त्यावर 'थँक यू, व्होटर्स' असं एक पोस्टर बनवलं. त्या पोस्टरची गुंडाळी काखेत मारून तो परत हॉलकडे आला, तेव्हा तो ऐंशी मतांनी आघाडी-वर असल्याची बातमी त्याची वाट पाहत होती. चुरशीची म्हणता म्हणता, तो शेवटी 'एकशे अठ्ठ्याऐंशी' च्या फरकाने निवडून आला.

त्याला अक्षरशः उचलून, जल्लोष करत कॉलेजच्या लॉनसवर मिरवत होतं सारं पब्लिक, तेव्हा त्याला आठवत होतं, साडेतीन वर्षांपूर्वी याच कॉलेजात केलेला कोकरासारखा प्रवेश....

'डॉक्टर, यू न्यू द डाएग्नोसीस बिफोर हँड' नजरेने त्याला जाळत त्या बाई म्हणाल्या. पांढऱ्या ॲप्रनच्या आड तो घामाने भिजत चालला होता. 'नो मॅडम....' क्षीणपणे त्याने निषेध नोंदवायचा प्रयत्न केला.

त्याच्याच हॉस्पिटलमध्ये, त्याची थर्ड एम. बी. बी. एस. ची, मेडिसीन विषयाची परीक्षा चालली होती आणि एक्झॅमिनर बाईचं म्हणणं असं होतं की सुपरवायझर्सनी त्याला हवी ती केस बहाल केली होती अन् निदानही सांगितलं होतं.. गेल्या तीन महिन्यातली घासूगिरी त्याच्या नजरेसमोरून फिरत होती. खरं म्हणजे, मेडिसीन विषयातली त्याची

तयारी बऱ्यापैकी चांगली होती. पण हे काहीतरी विचित्रच घडत होतं.

तोंडी परीक्षेच्या टेबलवरही, चाळीस मार्कांसाठी, पुन्हा त्याच बाई. त्यांची तशीच नजर....त्यानं शक्यतोवर तोल सावरत उत्तरं देण्याचा प्रयत्न केला. हे मेडिसीनच प्रॅक्टिकल, त्याच्या परीक्षेतला शेवटचा टप्पा होता. सर्जरी अन् गायनॅक, या दोन्ही विषयांच्या परीक्षा बऱ्या गेल्या होत्या. मेडिसीनमध्ये चांगले मार्क मिळतील ही अपेक्षा, तर हे काहीतरी वेगळंच घडत होतं.

परीक्षा संपवून तो बाहेर पडला तेव्हा काहीतरी चुकल्याची पाल चुकचुकत होती. पण त्यामुळे वारं प्यायल्यागत मोकाट सुटणं काही सरणार नव्हतं. थर्ड एम्. बी. बी. एस. ची परीक्षा हे दीडशे मण वजनाचं ओझं उतरल्याचा आनंद कसा असतो हे अनुभवल्याशिवाय कळणार नाही.

त्याची परीक्षा संपली. अन् त्याचे वडील नोकरीतून निवृत्त झाले. त्याला एक बरं वाटलं की, आता आपण डॉक्टर बनतो आहोत, तेव्हा प्रश्न येणार नाही....खरं म्हणजे अजून चार-पाच वर्षे तरी, घरी मदत देण्यासारखी परिस्थिती असणारच नव्हती....पण निदान, इंटर्नशिपपासून स्वतःचा खर्च तरी निघेल.

रिझल्टच्या दिवशी सकाळी घरी मित्राचा फोन आला की रिझल्ट लागलाय म्हणून. तो हॉस्टेलवर गेला तर दोघा-तिघांनी त्याची नजर चुकवली. कॅरिडॉरमधल्या शेकडो नजरांना आरपार फाडत तो भिरभिरत नोटीस बोर्डाकडे गेला....त्याचा नंबर उत्तीर्ण झालेल्यांमध्ये नव्हताच....

तो आयुष्यात पहिल्यांदाच एवढा सुन्न झाला. आतापर्यंतची हुशारीने गाजवलेली कारकीर्द, शेवटच्या टप्प्याला ही अशी घसरायची होती.... कोमेजायची होती. एकटाच रूमवर बसून राहिला. भसाभसा दोन सिगारेटी ओढल्या. 'जगात न बावरल्यासारखं वाटणारी' एक भावना त्याला जाणवत होती. मनाला मुंग्या आल्या होत्या. फक्त मेडिसीन प्रॅक्टिकलनेच घात केला होता. मेडिसीनच्या थियरीत सत्तर टक्के मार्क अन् प्रॅक्टिकलमध्ये नापास. जय एक्झॅमिनर बाई! सर्जरीमध्ये चांगले मार्क तर गायनॅकमध्येसुद्धा बऱ्यापैकी मार्क होते....सहा महिने फुकट गेले होते, पण

त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, त्याची अवस्था इसापाच्या बेडकिणीसारखी झाली होती. कॉलेजातलं नाव, आजवरचं कमावलेलं सारं, त्याला माती-मोल वाटायला लागलं.

तो कसाबसा लोकलमध्ये बसला अन् घरी आला. 'माझा नंबर नाही आहे रिझल्टमध्ये' असं सांगितल्यावर घरातसुद्धा सुन्न शांतता पसरली. त्याच्या छोट्या पुतणीबरोबर खेळण्यात त्याने वेळ घालवायला सुरुवात केली. कॉलेजमध्ये जायलाही शरम वाटत होती. जुनेजुने रीडर्स डायजेस्टचे अंक घेऊन त्याची पारायणं करणं हा एकच उपाय....घरचे कुणी शक्यतो या विषयावर बोलायचे नाहीत. पण एका संध्याकाळी काहीतरी संदर्भ निघाला आणि तो ढसढसा रडला. अर्धा तास फुटून रडल्यावर त्याला हलकं वाटलं....त्याने परत हॉस्टेलला जाऊन राह्यचं ठरवलं.

आता अभ्यास करायचा होता तो फक्त 'मेडिसीन' या एकाच विषयाचा....त्याला जाणवलं की अभ्यास करतानाची ईर्षा, त्याच्यामध्ये प्रथमच निर्माण व्हायला लागली होती. त्याने अभ्यासाचा आवाका लक्षात घेऊन अगदी योजनाबद्धपणे सुरुवात केली. यावेळी, फक्त जरुरीपुरतं ज्ञान मिळवायचं नव्हतं. प्रत्येक गोष्ट अगदी मूळापासून लक्षात घ्यायची होती. संपूर्ण दिवस तो खोलीवर असायचा. कॉरिडॉरमधून चकरा मारायचा. पॅसेजमध्ये खुर्च्या टाकून बसायचा. संध्याकाळी वॉर्डात जाऊन पेशंटस् पाह्यचा, तपासायचा. पास झालेल्या मित्रांबरोबर अभ्यासाची चर्चा करायचा.

बराबर, तीन महिने असं स्वतःला कोंडून घेताना त्याला जाणवलं की स्वतःचा आत्मविश्वास आणि स्वत्त्व परत मिळवण्याचा तो एकच उपाय होता. शनिवार-रविवारी तो घरी यायचा. तिथे मात्र संपूर्ण आराम करायचा.

त्याच्या थियरीच्या परीक्षेचं सेंटर, एल्फिन्स्टन कॉलेजात होतं. थियरीचा पहिला पेपर हातात पडल्यावर त्याला एक विलक्षण अनुभव आला. सगळा पेपर त्याला व्यवस्थित येत होता. निबंध लिहिण्यात रंगावं तसा तो रंगून गेला. वर्गाच्या छतावर बसलेल्या कबुतराच्या आवाजाने तो

भानावर आला तेव्हा, तीन तासातले अडीच तास संपले होते. पेपरही बराचसा लिहून झाला होता. त्याला खूप बरं वाटलं.

थियरीचे दोन पेपर संपले आणि मग प्रॅक्टिकल परीक्षा. त्याची परीक्षा दुसऱ्या मेडिकल कॉलेजात होती. खरं तर त्याला भीती वाटायला पाहिजे होती. पण यावेळी तो रणोत्सुक योद्ध्यासारखा होता...समोर एक्झॅमिनर आले आणि त्यांनी प्रश्न विचारले की त्याच्या तोंडाचा पट्टा चालू व्हायचा. एखाद्या केसमध्ये प्रश्न विचारताना, एक्झॅमिनर अगदी 'लेटेस्ट अॅडव्हान्सेस' पर्यंत जेव्हा येऊन पोचतात तेव्हा ते चांगले खूष असतात. त्याचा अर्थ असा की तुम्ही 'स्कोअरिंग' करताहात.

हे असं परीक्षेमध्ये मजबूत दांडपट्टा चालवून पुढे घुसण्याचं समाधान त्याला यापूर्वी मिळालं नव्हतं. प्रश्न आला की तो सेकंदभर थांबायचा. मानसिक जुळवाजुळव करायचा आणि मग शांत स्वगत, हसऱ्या चेहऱ्याने उत्तराला सुरुवात करायचा....शेवटच्या तोंडी परीक्षेपर्यंत तर तो पुरता 'रिलॅक्स' होऊन गेला होता.

त्या दिवशी रविवार होता. पण परीक्षा सुरू होती. दुपारी तो परीक्षा आटपून बाहेर पडला .... आयुष्यात याआधी इतकं हलकं कधी वाटलं नव्हतं त्याला !

घरी जाऊन, रात्री तो पुन्हा हॉस्टेलवर आला. त्याच्या परीक्षेचं वर्तमान ऐकण्यासाठी, त्या खोलीत, त्याचे पंचवीस मित्र गोळा झाले होते. त्यातले वीसजण सहा महिन्यांपूर्वीच पास झालेले .... गाण्यांची मैफल रंगली. कोपऱ्यातल्या बादल्या बडवल्या गेल्या. सगळे पूर्ण जोशात असताना रूमच्या दाराची कडी वाजली. एकाने 'कोण आहे रे' म्हणून दरवाजा उघडला, तर दारात हॉस्टेलचे वॉर्डन !

'काय मासळीबाजार वाटला ?...किती वाजले रात्रीचे ?'

'सर, आज परीक्षा संपली ना म्हणून.' तो म्हणाला.

वॉर्डन खोलीत शिरले. खोलीभर बसलेली पंचवीस टाळकी, अजिबात टेन्स न होता, चक्क गमतीनेच त्यांच्याकडे पाहत होती.

'सगळ्यांची नावं लिहून द्या....'

कुणीच काही बोलेना, हलेना.

'ऐकू येतंय ना....टेक् अ पेपर, अँड अ पेन टू.'

पावलं जड झाली आहेत असं दाखवत तो उठला. कागद काढला. स्वतःचं नाव लिहिण्याआधी दुसऱ्या टोकाला बसलेल्या एका मित्राचं नाव लिहिलं. कारण तो हॉस्पिटलातल्या एका प्रख्यात डॉक्टरांचा मुलगा. कागद फिरतफिरत शेवटी जेव्हा त्या मित्राच्या हाती आला तेव्हा शिरोभागी स्वतःचं नाव बघून चमकला. मित्र मुठी आवळून दाखवत होता. बाकीचे हसू दाबत होते. वॉर्डनचा चेहराही बरचं नाव बघून, भातात अचानक खडा मिळावा तसा झाला होता. वॉर्डन गेले, पण एव्हाना सारा ग्रुप संथ झाला होता.

'चला, कॉलेजच्या पायऱ्यांवर जाऊन बसू या.' तो म्हणाला.

मग ते सारे कॉलेजच्या भव्य, दगडी इमारतीच्या पोर्चच्या पायऱ्यांवर जाऊन बसले. मध्यरात्र झाली होती. पोर्चसमोरच्या बागेतल्या झाडांच्या सावल्या अस्ताव्यस्त पसरल्या होत्या. पोर्चमध्ये टांगलेल्या, झुंबरासारखा जुन्या दिव्याचा, फिकट पिवळा प्रकाश पसरला होता.

पायऱ्यांवर बसलेल्या प्रत्येकाला, पाच वर्षांमधल्या गमती आठवत होत्या. पाच वर्षांपूर्वी आपण एकटे या कॉलेजात आलो आणि आज फक्त आपली परीक्षा संपणार म्हणून हे पंचवीस जण ठिकठिकाणांहून आले; तो विचार करत होता.

सुरकुतलेल्या दगडावर हात फिरवताना, त्याला पहिल्यांदाच डॉक्टर झाल्यासारखं वाटलं. त्या इमारतीने दिलेल्या उबेची जाणीव झाली....पाच वर्षांमध्ये डॉक्टर होणं फारसं कठीण नव्हतंच कधी. पण या पाच वर्षांत त्याला, तो स्वतः, गवसला होता. आणि ते ग्रुप महत्त्वाचं होतं....

रात्र उतरत होती....पोर्चजवळच त्यांच्या कॉलेजचं बोधचिन्ह धुरकट दिसत होतं....हिप्पोक्रॅटिस आजोबा ते त्यांचा ग्रुप. कालचक्राच्या अफाट सामर्थ्याला मनोमन दाद देत तो पुटपुटला, 'थ्री चियर्स फॉर हिप्पोक्रॅटिस!'

❀

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर


REFBK-0025745